

म ग्रं सं ठाणे
विषय : ...प्रवास
सं. क्र ५८८

# ऑस्ट्रेलियाचा शोध

RFFBK-0022000



विश्वसंशोधन माला :

# ऑस्ट्रेलियाचा शोध

ह. अ. भावे

REFBK-0022000

सरिता प्रकाशन

'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

प्रकाशक :

सौ. मंदाकिनी भावे
सरिता प्रकाशन
३९७/१ 'वरदा', सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६.

प्रथमावृत्ति . दीपावली, नोव्हेंबर १९७७.

© ह. अ. भावे

किंमत तेरा रुपये

मुखपृष्ठ : अनंत सालकर

मुद्रक:

सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ, पुणे २.

# प्रस्तावना

भौगोलिक दृष्ट्या ऑस्ट्रेलिया हे जगातील सर्वांत जुने खंड आहे. पण सतराव्या शतकापर्यंत दक्षिणेकडील या प्रचंड भूमीची माहिती कोणालाच नव्हती। तेथे वस्ती करून असलेला मानवसमाज अश्मयुगीन जीवन जगत होता सर्व प्रथम डच नाविकानी ही भूमी शोधली व त्याला 'न्यू हॉलंड' असे नावही दिले कॅप्टन जेम्स कुक त्यानतर शभर वर्षांनी तेथे गेला कॅप्टन कुकने व इग्रजांनी ऑस्ट्रेलियात वसाहती स्थापन केल्या त्यामुळे ऑस्ट्रेलियाचा सशोधक कॅप्टन कुकच आहे असा अनेकांचा समज असतो, पण ते खरे नाही

ऑस्ट्रेलियाच्या विस्तीर्ण भूमीचा शोध व नकाशे तयार करण्यासाठी अनेक सशोधकाचे श्रम व प्राणही खर्ची पडले आहेत त्यांचे धाडस व वीरवृत्ती कोलबसाच्याच तोडीची होती त्या अनेक सशोधकांची कहाणी या पुस्तकात सांगितली आहे त्याचप्रमाणे अगदी नव्या भूमीवर पहिल्यापासून श्रीगणेशा करून नव्या सस्कृतीचे बीजारोपण कसे करण्यात आले हेही या पुस्तकात सांगितले आहे

ऑस्ट्रेलियाची विस्तीर्ण भूमी इग्लडने व युरोपियनांनी गोऱ्या कातडीच्या लोकासाठीच राखून ठेवली आहे तेथील स्थानिक आदिवासी जमाती नष्टप्राय झाल्या आहेत जगात निरनिराळ्या पातळीवर विषमता कशी मूळ धरत असते याचे ऑस्ट्रेलिया हे जिवत उदाहरण आहे

ऑस्ट्रेलियाचा शोध हा पृथ्वीचे सपूर्ण ज्ञान होण्याच्या मोहिमेतील एक टप्पा आहे. विश्वसशोधन मालेतील हे महत्त्वाचे पुस्तक वाचकाना सादर करीत आहोत

१७–१०–१९७७

वरदा, सेनापती बापट मार्ग, ह अ भावे

पुणे–१६

# अनुक्रमणिका


| प्रकरण | कथेचे नाव | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १. | शोधाची सुरुवात | ५ |
| २. | इग्रजांचे सशोधन | १६ |
| ३. | पहिली वसाहत | २४ |
| ४. | फिलडर्सचे संशोधन | ३२ |
| ५. | पश्चिमेकडील विस्तार | ४६ |
| ६. | विकासाची सुरुवात | ५४ |
| ७. | नवीन वसाहती | ६८ |
| ८. | अतर्भागातील विस्तार | ८२ |
| ९. | नवीन वसाहतवाले आणि मेंढपाळ | ९२ |
| १०. | सोन्यासाठी धाव | ९८ |
| ११. | अतर्भागातील वाळवट व अज्ञात प्रदेश | १०८ |
| १२. | दरोडेखोरीचा शेवट | ११७ |
| १३. | ऑस्ट्रेलियाचे राज्यसंघटन | १२२ |

## प्रकरण पहिले

# शोधाची सुरुवात

ऑस्ट्रेलियाचे खरे शोधक म्हणजे तेथील आदिवासी. आदि-वासींचे तेथे दोन वंश नांदत होते. ते वीस हजार वर्षांपूर्वी उत्तरे-कडून आले असावेत. हे लोक कोठून आले असावेत, याविषयी शास्त्रज्ञात दोन मते आहेत. एका मताप्रमाणे ते लोक न्यू गिनी व मलेशिया या बेटातून आले असावेत. दुसऱ्या एका तर्काप्रमाणे हे लोक दक्षिण हिंदुस्थानातून आले असावेत. ऑस्ट्रेलियात जे दोन वंश आले त्यांच्यात बरीच सरमिसळ झाली. तरीही ते एकमेकांचे शत्रू होते. त्यांच्यामध्ये युद्धे होऊन शेवटी एका वंशाला टास्मा-निया बेटावर पळून जावे लागले असावे असे दिसते.

त्यावेळी टास्मानिया हा ऑस्ट्रेलिया खंडाचा भाग असावा. किंवा ते होड्यातून पळून गेले असावेत. दोनशे वर्षांपूर्वी गोऱ्या मनुष्याचे आगमन होईपर्यंत हे लोक तेथे राहिले. गोऱ्यांचा संपर्क आल्यापासून शंभर वर्षांतच या आदिवासी लोकांचा निर्वंश होऊन गेला. सुरुवातीला गोऱ्यांनी या आदिवासींची रानातल्या जनावराप्रमाणे शिकार केली! नंतर दारूचे व्यसन आणि पाश्चात्यांनी आणलेले अनेक रोग यामुळे ते झपाट्याने मरू लागले. विसाव्या शतकात आदिवासींच्याबद्दलचा गोऱ्या लोकांचा

दृष्टिकोन बदलला व ते त्याना सहानुभूतीने वागवू लागले त्यामुळे आदिवासींपैकी शिल्लक राहिलेले लोक आता टिकून आहेत आणि त्यांची संख्या वाढते आहे

उत्तर ऑस्ट्रेलियाच्या काही भागाना चिनी मच्छीमारी जहाजांनी पधराव्या शतकात भेट दिली असावी मलायातील कोळी तर शेकडो वर्ष आस्ट्रेलियाच्या किनाऱ्यापर्यंत जात असावे

ज्यावेळी पृथ्वी गोल आहे हे तत्त्व युरोपात मान्य होऊ लागले त्यावेळी उत्तर गोलार्धाप्रमाणे दक्षिण गोलार्धातही एक भूखड असावे असा तर्क लढविला गेला त्यामुळे युरोपियन लोक दक्षिणेकडील खंडाच्या शोधातच होते. आस्ट्रेलिया खडाच्या जवळपास प्रथम पोर्तुगीज लोक पोहोचले. मलाया, इडोनेशिया या भागात सोळाव्या शतकात पोर्तुगीजांचेच वर्चस्व होते. पोर्तुगीजानी ऑस्ट्रेलियाला भेट दिली होती की नाही याबद्दल नक्की पुरावा मिळत नाही पण त्या काळातील नकाशे व अहवाल यातील उल्लेखावरून असे मोठे खड अस्तित्वात असल्याबद्दल त्यांनी माहिती होती हे नक्की कागारूसारख्या प्राण्याचे चित्रही सन १५९७ मधील एका पोर्तुगीज पुस्तकात पाहावयास सापडते.

फ्रॅन्सिस ड्रेकने १५७७ ते १५८० पर्यंत आणि थॉमस कॅडव्हिशने १५८६ ते १५८८ पर्यंत पृथ्वीप्रदक्षिणा केल्या ते दोघे ऑस्ट्रेलियाच्या उत्तर किनाऱ्याजवळून गेले. ऑस्ट्रेलिया खडाची व त्याची चुकामूक अगदी थोडक्यात झाली उत्तर गोलार्धातील भूखडाला तोलून धरायला दक्षिण गोलार्धात तसेच मोठे भूखड असावे अशा कल्पनेने दोन स्पॅनिश नाविक दक्षिण पॅसिफिक महासागरात सशोधन करीत होते. त्यापैकी अल्वारा-द-मेन्डोना याने १५६८ मध्ये सालोमन बेटे शोधून काढली. आणि पेड्रो-द-क्वीरोस

ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेकडच्या न्यू हेब्रिडस बेटावर सन १६०५ मध्ये पोचला 'द क्विरोस' याला असे वाटले की आपण नवीन भूखंड शोधले आहे त्याने या भूखंडाचे नाव 'ऑस्ट्रेलिया डेल एस्पिरिटू सान्टो' असे ठेवले पण त्याच्या जहाजाचा कॅप्टन लुईस वाझ-द-तोरेस याला खात्री होती की हे केवळ बेट आहे. सध्या त्या बेटाला फक्त सॅन्टो असे म्हणतात तोरेसने आपल्या धन्याचा निरोप घेतला आणि तो पश्चिमेकडे प्रवास करू लागला. त्याने न्यू गिनी आणि ऑस्ट्रेलिया याना विभागणाऱ्या तोरेस समुद्र-धुनीत प्रवेश केला त्याला ऑस्ट्रेलियाची मुख्य भूमी दिसली की नाही, हे सागता येणार नाही पण तो या सामुद्रधुनीत जाण्या-पूर्वीच तीन महिने सन १६०६ मध्ये विल्हेम झान्स हा डच नाविक ऑस्ट्रेलियाच्या मुख्य भूमीवर उतरला होता.


## डचांचे संशोधन

१६ व्या शतकाच्या शेवटी डचांचे आरमारी सामर्थ्य वाढत होते १६०६ मध्ये अतिपूर्वेच्या बेटातून डचानी पोर्तुगीज वर्च-स्वाला शह दिला त्यानी दक्षिण आफ्रिकेच्या टोकावरील केप ऑफ गुडहोप येथे आपले ठाणे स्थापन केले होते. त्याचप्रमाणे जावा बेटात बटाव्हिया येथे लष्करी ठाणे ठेवले होते, आणि व्यापारा-साठी वखारही टाकली होती. हे बटाव्हिया म्हणजे सध्याचे इंडोनेशियाची राजधानी असलेले जकार्ता शहर. त्यावेळी अति-पूर्वेकडील ही बेटे मसाल्याची बेटे म्हणून प्रसिद्ध होती. त्यावर डचानी कब्जा मिळविला, आणि त्याची जहाजे जपानपर्यन्त जाऊ लागली

डचांना नवीन ओसाड भूमीत काहीच रस वाटत नसे. तेथे

व्यापारासाठी कच्चा माल मिळत असेल तरच ते काही धाडस हाती घेत. १६०६ च्या सुरुवातीला जावा बेटातील बॅन्टम येथून विल्हेम झान्सला न्यू गिनीच्या दक्षिणेकडे काय आहे याचा तपास घ्यायला पाठविले. तो दक्षिण पश्चिमेच्या दिशेने निघाला आणि सामुद्रधुनीतून न जाता ऑस्ट्रेलियन मुख्य भूमीच्या उत्तर टोकाला पोहचला. सध्या त्या प्रदेशाला केप यार्क द्वीपकल्प असे नाव आहे तेथील प्रदेश उजाड व ओसाड होता तेथे काहीच मिळण्यासारखे नव्हते तो तेथून परत वळला. परत येताना सध्याच्या वेनलॉक नदीच्या मुखाशी थोडे थांबून काही खलाशाना पाणी आणायला त्यांनी जमिनीवर उतरवले तेव्हा त्याच्यावर तिथल्या आदिवासींनी हल्ला केला आणि त्यात एक खलाशी ठार झाला झान्सने डचाना अहवाल दिला की ही नवीन भूमी ओसाड आहे आणि तेथील आदिवासी हल्लेखोर आहेत त्यामुळे डचांनी ऑस्ट्रेलियाच्या मुख्य भूमीकडे काही वर्षे अजिबात लक्ष दिले नाही

डच नाविक अतिपूर्वेकडच्या बेटाकडे जाताना केप ऑफ गुड होपपासून उत्तरपूर्वेच्या दिशेने निघत. मादागास्कर बेटाचा किनारा सोडून हे नाविक भर हिंदी महासागरात शिरले की तेथे त्यांना शांत हवेचा प्रदेश किंवा ज्याला इग्रजीत डोलड्रम्स म्हणतात तेथून जावे लागे वारा कुठेच वाहत नसल्याने या शांत सागरावर जहाजाना कित्येक आठवडे कठावे लागत हे डोलड्रम्स टाळण्यासाठी हेनड्रिक ब्राडवेर याने एक नवीनच मार्ग शोधला. १६११ मध्ये तो केप ऑफ गुड होपपासून सरळ पूर्वेकडे निघाला आणि ४८०० किलोमीटर तसाच जाऊन मग उत्तरेकडे वळला व बटाव्हियाला पोहोचला. अनुकूल वारे व अनुकूल सागरी प्रवाह यामुळे त्याच्या या प्रवासाला कमीतकमी वेळ लागला. डच ईस्ट इंडिया




**डचांचा जुना मार्ग व ब्राउवेरने शोधलेला नवा मार्ग**

कपनीच्या अधिकाऱ्याना हा नवा मार्ग फारच पसत पडला. याच मार्गाने नेहमी जावे अशा आज्ञा त्यांनी आपल्या सर्व जहाजांच्या कप्तानांना दिल्या.

केप ऑफ गुड होप आणि ऑस्ट्रेलियाचा पश्चिम किनारा जवळ जवळ एकाच अक्षाशावर येतो हे नकाशाकडे पाहिल्यास लगेच समजेल. या दोन्ही ठिकाणांतील अतर ६९०० किलोमीटर आहे. पाच हजार किलोमीटर पूर्वेकडे गेल्यानंतर कप्तान जर उत्तरेकडे वळायचे विसरला तर तो सरळ पुढे जाऊन ऑस्ट्रे-लियाच्या पश्चिम किनाऱ्याला लागेल हे उघड होते. याप्रमाणे अनेक डच कप्तान ऑस्ट्रेलियाला पोहचले. यापैकी पहिला नाविक

डिर्क हार्टोग नावाचा होता. तो ऑक्टोबर १६१६ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याला लागला. त्याने ४०० किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीची पाहणी केली आणि मग जवळच्या एका बेटावर त्याने मुक्काम केला. त्या बेटावर आपल्या भेटीसंबंधी त्याने एक स्मृतिशिला बांधली. ते बेट आज हार्टोगच्याच नावाने ओळखले जाते त्याने नवीन भूखडाला 'एन्द्राच्याट भूमी' असे नाव दिले त्याच्या या शोधाची बातमी हॉलंडला पोहचली. डचाना वाटले की मार्कोपोलोने वर्णन केलेली दक्षिणेकडील सुवर्णभूमी हीच असावी तेव्हा डचानी आपल्या कप्तानाना या नव्या भूमीचा शोध घेण्याबद्दल आज्ञा दिल्या. हार्टोग पूर्वी तेथे जाण्यापूर्वीही 'झेवूल्फ' आणि 'मॉरिशस' ही दोन जहाजे ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याला लागली होती.

जुलै १६१९ मध्ये फ्रेडरिक-द-हाऊटमन याच्या नेतृत्वाखाली दोन जहाजे, हार्टोग पोहचला होता त्याच्या दक्षिणेकडे स्वान नदीजवळ पोहचली हाऊटमनला ती भूमी म्हणजे द्वीपकल्प वाटले. वास्तविक ते राऊटनेस्ट नावाचे बेट होते. तेथेच त्याला दोन दिवसांनतर तुटलेले कडे असलेला लहानसा बेटाचा समूह दिसला पलीकडच्या किनारपट्टीला त्याने आपला मालक जेकब ऐडेल याच्या नावाने ऐडेल भूमी असे नाव दिले. व त्या धोकादायक बेटाना 'अब्रोलहोस' असे नाव दिले या नतर तीन वर्षांनी या प्रदेशात आलेल्या लेविन या नाविकाला दक्षिण पश्चिमेकडील एक भूशीर दिसले त्या भूशीराला त्याने स्वत चेच नाव दिले.

आणखी काही डच नाविक ऑस्ट्रेलियाला पोहचले होते. सन १६२३ मध्ये जॉन कार्टस्टेन्झ जावा बेटावरून निघाला आणि त्याने सध्याची ऑर्नहेम भूमी शोधून काढली. यानतर एका वर्षाने

'गुल्डेन झिपार्ड' या नाविकाने केप लेवीन गाठले आणि तेथून पूर्वेकडे किनारपट्टीने १६०० किलोमीटरचा प्रवास केला. तेथे त्याला ऑस्ट्रेलियन उपसागरातील बेटे दिसली. त्या बेटांना त्याने जहाजाचा डच अधिकारी पिटर न्यूटस् याचे नाव दिले. त्यानंतर दोन वर्षांनी वानयेन या नाविकाने एक्समाऊथ आखाताच्या जवळच्या किनारपट्टीचे निरीक्षण केले या सगळ्या नाविकांच्या प्रयत्नामुळे ऑस्ट्रेलिया खंडाच्या चार हजार किलोमीटर लांबीच्या किनारपट्टीचा परिचय डचांना झाला

डचांची जहाजे केप ऑफ गुड होप पासून निघत व जोरदार वाऱ्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याकडे खेचली जात अनेक जहाजे वादळात सापडून किनाऱ्यावर आपटत व बुडत. असेच 'बटाव्हिया' नावाचे जहाज आब्रोलहोस द्वीपांच्या समुहात १६२९ साली फुटले व बुडाले पण त्यातील खलाशी पोहून जवळच्याच एका बेटाच्या किनाऱ्याला लागले. त्याचा कप्तान फ्रॅन्सिस पेलसर्ट एका उघड्या होडीतून बटाव्हियाकडे जायला निघाला तेथून तो मदत आणणार होता त्याच्या गैरहजेरीत खलाशांपैकी काही जणांनी बंड केले आणि त्यांना विरोध करणाऱ्यांपैकी १२५ लोकांना मारून टाकले. फ्रॅन्सिस पेलसर्ट मदत घेऊन आला. बंडखोर खलाशांना त्याने पकडले, त्यातल्या काही जणांना फाशी दिले आणि आणखी दोघा बंडखोरांना ऑस्ट्रेलियन भूमीवर विजनवासात सोडून देऊन तो परतला.

डचांनी दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या भागाला न्यू हॉलंड असे नाव दिले होते. डचांचा अतिपूर्वेकडील बेटांचा राज्यपाल अँथनी व्हॉन डायमेन याला या भागात संशोधन करण्याविषयी उत्सुकता होती-त्याने १६४२ मध्ये अबेल जांझझोन टॅान्समान याच्या नेतृत्वा-



राज्यपाल व्हॉन डायमेन

खाली 'हेम्सकेर्क' आणि 'जेहेएन' या नावाची दोन जहाजे पाठविली ती बटाव्हियाहून निघाली आणि प्रथम मॉरिशस येथे गेली तेथे रसद वगैरे घेऊन अबेल टास्मान हा कप्तान प्रथम दक्षिणेकडे जाऊन पूर्वेकडे निघाला, तेव्हा तो सध्याच्या टास्मानिया बेटाला पोहोचला त्याने तेथील दक्षिण भूशिराला प्रदक्षिणा घालून सध्याच्या ब्लॅकमन उपसागरात नांगर टाकला. त्याचा नावाडी फ्रँकॉईस वीझचेर किनाऱ्यावर उतरला. त्याने तेथे थोडी पाहणी केली त्याला स्थानिक रहिवासी मुळीच आढळले नाहीत तो जहाजावर परतला दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ डिसें-बरला समुद्र थोडा खवळलेला होता, त्यामुळे होडी किनाऱ्यावर जाऊ शकत नव्हती मग एक सुतार पोहत किनाऱ्यावर गेला

आणि त्याने तेथे निशाण रोवले टास्मानने या भूमीचा ताबा हॉलंडसाठी घेतल्याचे जाहीर केले आणि त्या प्रदेशाचे नाव 'व्हॉन डायमेनची भूमी' असे ठेवले.




संशोधक टास्मान

यानंतर टास्मानने आपला पूर्वेकडचा प्रवास तसाच चालू ठेवला तेव्हा तो न्यूझिलंडला पोहोचला येथे 'जेहाअेन' जहाजावरचे तीन खलाशी माओरी आदिवासींनी ठार केले टास्मानने त्या उपसागराला 'खुन्याचा उपसागर' असे नाव दिले. सध्या त्या उपसागराला गोल्डन बे' म्हणतात त्यानतर त्याने जहाजे हाकारली व सध्याच्या कुक सामुद्रधुनीजवळ तो पोहोचला त्यानंतर त्याने न्यूझिलंडच्या उत्तर किनाऱ्याची पाहणी केली. आणि तेथील भूशीराला आपल्या राज्यपालाच्या पत्नीचे– मरिया व्हॉन डायमेनचे-नाव ठेवले. सन १६४३ च्या जानेवारीत टोंगन द्वीपसमूहापैकी काही बेटे त्याला सापडली. त्यानतर न्यू गिनियाच्या उत्तरेकडे जाऊन टास्मान परतला. भौगोलिक शोधाच्या बाबतीत

त्याची सफर यशस्वी झाली होती. पण डचाना भौगोलिक संशोधनाबद्दल रस नव्हता। त्यांना मसाल्याच्या जिनसा आणि व्यापाराची ठाणी हवी होती. ती न मिळाल्यामुळे या सफरीचा खर्च वाया गेला असे त्याना वाटले !

तरीही १६४४ मध्ये न्यू गिनिया आणि ऑस्ट्रेलिया यामधील वाहतूक मार्ग शोधण्यासाठी टास्मानने पुन प्रवास सुरू केला. या प्रवासाचा वृत्तात आता मिळत नाही त्यामुळे या सफरीत त्याने काय केले हे समजायला मार्ग नाही तरी पण त्याने ऑस्ट्रेलियाच्या ३२०० किलोमीटर्स किनाऱ्याचा नकाशा तयार केला. 'डी. विट' भूमीपासून कारपेंटारियाच्या आखातापर्यंत त्याने किनारा शोधला पण डच अधिकाऱ्याना असले कोरडे सशोधन नको होते. त्याने शोधलेली भूमी ओसाड व वैराण होती. त्याच्या शोधामुळे डच ईस्ट इडिया कपनीचा काहीच आर्थिक फायदा झाला नाही त्यामुळे कपनीचे अधिकारी टास्मानवर नाराज झाले

पुढच्या पन्नास वर्षात अनेक डच जहाजे अतिपूर्वेकडील बेटाना जाताना पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्याला पोहोचली आणि अनेकदा फुटलीसुद्धा। अशाच एका फुटलेल्या जहाजाच्या शोधासाठी सन १६९६ मध्ये विल्यम-द-वालिमग आम्स्टरडामहून गेलविन्क नावाचे जहाज घेऊन निघाला. त्याला ते फुटलेले जहाज सापडले नाही. पण त्याला एक सुदर नदी सापडली. ती नदी एका सुपीक प्रदेशातून वाहात येत होती तेथे सशोधन करण्यात त्याने कित्येक दिवस घालविले त्या नदीमध्ये अतिशय सुदर काळे हंस विपुल प्रमाणात होते म्हणून त्या नदीला त्याने 'स्वान नदी' असे नाव दिले त्याच्या भ्रमतीत तो सध्याच्या पर्थ शहराची जागा जेथे आहे त्यापलिकडे पोहोचला वालिमगने




**डचांनी शोधलेली ऑस्ट्रेलियाची किनारपट्टी**

हा नवा प्रदेश अतिशय उत्तम असल्याबद्दल आपला अहवाल सादर केला होता. पण तरीही डचांनी काहीच हालचाल केली नाही आणि खूप काळपर्यंत न्यू हॉलंडचा हा प्रदेश दुर्लक्षित राहिला.

★

## प्रकरण दुसरे

# इंग्रजांचे संशोधन

इग्रजाचा ऑस्ट्रेलियाशी पहिला सबध १६२२ मध्ये आला पण तो दुर्दैवी ठरला ईस्ट इंडिया कपनीचे 'ट्रायल' हे जहाज मौंट बेलो बेटाजवळ फुटले जहाजाचा कप्तान जॉन ब्रुक आणि इतर ४५ खलाशी होड्यात बसून बटाव्हियाला कसेबसे पोहोचले पण इतर ८२ खलाशी आणि जहाजावरचा किमती माल समुद्रात बुडाला. दुसरे एक 'लंडन' या नावाचे जहाज १६८१ साली अब्रोलहोस बेटांजवळ पोहोचले होते पण त्या ओसाड प्रदेशात न थांबता ते परतले

न्यू हॉलडच्या भूमीवर म्हणजेच ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर ज्या पहिल्या इग्रजाने पाऊल ठेवले तो एक चाचा होता! सिग्नेट जहाजावरील हे चाचे डच आरमाराचा हल्ला चुकवण्यासाठी टिमोरच्या दक्षिणेकडे पळाले त्या चाच्यामध्येच विल्यम डॅम्पियर हा धाडसी पुरुष होता ऑस्ट्रेलियाच्या उत्तर पश्चिम किनाऱ्याजवळ किंग उपसागरात सिग्नेट जहाजाने नागर टाकला जहाजाची काही जरुरीची दुरुस्ती करायची होती या ठिकाणी विल्यम डॅम्पियर किनाऱ्यावर उतरला असता त्याची गाठ स्थानिक रहिवाश्यांशी पडली हा सन १६८८ चा जानेवारी महिना होता.



विल्यम डॅम्पियर

डॅम्पियरनें त्याला भेटलेल्या आदिवासीचे वर्णन 'जगातले अत्यंत दरिद्री लोक' असे केले. इंग्लंडला परतल्यावर त्याने 'A new voyage round the world' या नावाचे एक पुस्तक लिहिले आणि ते खूप लोकप्रिय झाले. त्यामुळे त्याच्या चाचे-गिरीच्या गुन्ह्याकडे लोकानी लक्ष दिले नाही. १६९९ मध्ये तो 'रौबक' या सरकारी जहाजाचा कप्तान म्हणून न्यू हॉलंडच्या सफरीवर निघाला अजून अज्ञात असलेल्या पूर्व किनाऱ्याचे संशोधन तो करणार होता पण तो संशोधक किंवा कप्तान व्हायला लायक नव्हता आणि त्याचे जहाजही जुनाट होते. तो प्रथम शार्क उप-सागर येथे गोडे पाणी मिळवण्यासाठी थांबला. नंतर उत्तरेकडे जाऊन त्याने काही बेटाजवळ नांगर टाकला बेटांना 'डॅम्पियर द्वीपसमूह' असे सध्या नाव दिले आहे. त्याने जेथे नांगर टाकला होता त्याला रौबक उपसागर म्हणतात पण हा सर्व प्रदेश डचाना माहीत होता आणि त्याने नवीन काहीच शोधले नाही. त्याचे खलाशी बंड करण्याच्या अवस्थेत होते व जहाज गळत होते. म्हणून तो न्यू गिनियाच्या उत्तर टोकाला येऊन थांबला. 'न्यू गिनिया' ऑस्ट्रेलियाला जोडलेले नाही हे त्याने सिद्ध केले त्याचे जहाज आता नादुरूस्त अवस्थेत होते. त्यामुळे पुढचे संशोधन अशक्यच होते परतीच्या वाटेवर असेन्शन बेटाजवळ ते जहाज

नागरले असताना बुडलेच! डॅम्पियर आणि त्याचे खलाशी थोडेथोडे करून इतर जहाजातून इंग्लंडला परतले. तसे पाहिले तर डॅम्पियरने नवे काहीच शोधले नाही. पण डॅम्पियर गाजावाजा करणारा गृहस्थ होता त्यामुळे व त्याच्या पुस्तकामुळे दक्षिणेकडच्या या खंडाकडे इंग्रजांचे लक्ष वेधले.

सन १७६० ते १७७० मध्ये तीन इंग्रज कप्तान बायरन, वॅलीज आणि कार्टरेट पॅसिफिक महासागरात हिंडत होते. त्यापैकी कार्टरेट आपले 'स्वालो' हे जहाज घेऊन ऑस्ट्रेलियाच्या जवळ पोहोचला त्याने सॉलोमन बेटे पुन्हा एकदा १७६७ मध्ये शोधून काढली दोन वर्षांनतर लुईस ॲन्टनी बोगनव्हिले हा फ्रेंच कप्तान ताहीती बेटावरून पश्चिमेकडे निघाला. त्याने 'एसपीरिटू सान्टो' हा प्रदेश पुन्हा शोधला आणि ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्याकडे जाण्यासाठी तो निघाला. पण सध्याच्या क्विन्सलँड जवळ प्रवाळाच्या धोकादायक कड्यामध्ये तो अडकला व मागे फिरला.

मध्यंतरी एन्डेव्हर या जहाजातून प्लायमाऊथ बंदरामधून कॅप्टन जेम्स कुक आपल्या इतिहासप्रसिद्ध सफरीवर निघाला होता. जेम्स कुक शेतमजूराचा मुलगा होता सामान्य सैनिकापासून सुरुवात करून आपल्या कर्तृत्वामुळेच तो वर चढत गेला होता त्याच्या जहाजावर जोसेफ बँक्स हा तरुण व श्रीमंत शास्त्रज्ञ होता शिवाय शास्त्रीय निरीक्षणासाठी मुद्दाम नेमलेले काही निरीक्षकही होते एन्डेव्हर जहाज प्रथम ताहीती बेटाकडे जाणार होते तेथे सूर्याच्या तबकडीवरून होणाऱ्या शुक्राच्या सक्रमणाचे निरीक्षण करायचे होते. त्याबरोबरच कॅप्टन कुकला गुप्त आज्ञा दिल्या होत्या की त्याने पॅसिफिक महासागरात दक्षिणे-

कडे जावे आणि तिकडे एखादे भूखंड सापडते का ते पाहावे. नंतर पश्चिमेकडे जाऊन न्यूझीलंडला पोचावे व तेथून इंग्लंडला परतावे



कॅप्टन जेम्स कुक

कॅप्टन कुक ताहीती बेटाजवळ एप्रिल १७६९ मध्ये पोचला. तेथे तीन महिने काढल्यावर त्याने जवळपासच्या बेटांचे संशोधन केले व नकाशे काढले नंतर आपले एन्डेव्हर जहाज घेऊन कॅप्टन कुक दक्षिणेकडे निघाला. तेथे भूखंड वगैरे सापडले नाही दक्षिण पॅसिफिक महासागराचा विस्तार सगळीकडे पसरला होता वारे पश्चिमेकडे वाहात होते. नंतर तो पश्चिमेकडे गेला आणि न्यूझीलंड गाठले त्याने न्यूझीलंडभोवती पाच महिने संशोधन केले. न्यूझीलंड हा खंडाचा मोठा भाग आहे अशी समजूत होती पण कॅप्टन कुकने या बेटांना प्रदक्षिणा घातली व ही समजूत चुकीची आहे हे सिद्ध केले. न्यूझीलंड ही दोन मोठी बेटे असून एका

चिंचोळच्या सामुद्रधुनीने ती अलग झालेली आहेत-- हेही त्याने सिद्ध केले टास्मानला ही सामुद्रधुनी म्हणजे उपसागर वाटला होता या सामुद्रधुनीला आता कॅप्टन कुकचेच नाव दिले आहे.

कॅप्टन कुकने न्यूझीलंडचा अचूक नकाशा तयार केला आता त्याला इंग्लंडला परतायचे होते. पण हिवाळा जवळ आला होता म्हणून ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्याचे संशोधन करण्याचे कुकने ठरविले

२० एप्रिल १७७० रोजी सकाळी कुकचा दुय्यम अधिकारी झाचरी हिक्स याने समोर जमीन दिसत असल्याची बातमी दिली त्या जागेला सध्या ‘एव्हरार्ड भूशीर’ असे नाव आहे व्हिक्टोरिया प्रांताच्या पूर्वेला हे भूशीर आहे. तेथील जमीन उंचसखल व जंगलांनी भरलेली होती ती सुपीक असावी. जंगलातून अनेक ठिकाणी धूर वर आलेला दिसत होता. त्यावरून तेथे बरीच लोकवस्ती असावी हे समजून येत होते एन्डेव्हर जहाजाने नांगर टाकण्यासाठी जागा पाहण्यात काही दिवस घालविले. एक चांगली जागा होती पण तेथून रात्री गेल्यामुळे ती दिसून आली नाही रेड पॉइंट जवळच्या पुळणीवर काही आदिवासी दिसले. म्हणून होडीत बसून कुक आणि बँक किनाऱ्याकडे निघाले पण त्यांना पाहून आदिवासी पळून गेले व किनाऱ्यावर आपटणारी लाट मोठी असल्याने तेथे उतरताही आले नाही दुसऱ्या दिवशी त्यांचे जहाज एका मोठ्या सुरक्षित उपसागरात पोचले कॅप्टन कुकने येथे उतरावयाचे ठरविले दक्षिण किनाऱ्यावर त्यांनी जहाज नांगरले आणि कॅप्टन कुक काही खलाशी घेऊन दुपारच्या वेळी किनाऱ्याकडे निघाला दोनच स्थानिक आदिवासी किनाऱ्यावर होते. त्यांनी भाले फेकून आणि दगड मारून किनाऱ्यावर येणाऱ्या

लोकाना विरोध केला. शेवटी कुकच्या माणसांनी हवेत गोळीबार केला तेव्हा ते जवळच्या जगलात पळून गेले कुक आणि त्याचे सहकारी तेथे किनाऱ्यावर उतरले. आणि त्यांनी तेथे आसपासच्या प्रदेशाची पाहणी कित्येक दिवस केली आसपासच्या जगलात आदिवासी होते, पण त्याच्याशी मैत्री करावयाचे सर्व प्रयत्न वाया गेले. हा प्रदेश फारच रम्य होता. हिरवीगार कुरणे सगळीकडे पसरली होती. नाना प्रकारच्या वनस्पती तेथे उगवल्या होत्या त्या वनस्पतीमुळेच कॅप्टन कुकने या उपसागराचे नाव बॉटनी बे असे ठेवले. दररोज इग्लिश निशाण फडकविण्यात येत असे एका झाडावर जहाजाचे नाव व उतरण्याची तारीख खोदण्यात आली आता ते झाड नाहीसे झाले आहे पण त्या कुर्नेल या गावी कॅप्टन कुक जेथे उतरला त्या जागी एक स्मृतिस्तभ उभारण्यात आला आहे.

येथे एक आठवडा काढून एन्डेव्हर जहाज पुन्हा उत्तरेकडे निघाले १४-१५ किलोमीटर गेल्यानतर त्याला बदराच्या प्रवेश-द्वारासाठी उपयुक्त असलेली एक जागा दिसली. त्या जागेला कुकने आरमारातील एक अधिकारी जॅक्सन याच्या नावाने ' पोर्ट जॅक्सन ' असे नाव दिले. तो आतमधील सुरक्षित बदरात शिरला नाही तो आत शिरला असता तर त्याला जगातले अत्यत सुरक्षित बदर आढळले असते. याच जागी नतर सिडनी शहर वसविले गेले. नंतर तो उत्तरेकडे निघाला थोड्याच अतरावर एक खडकाचे डोके वर आलेले होते. पण तिकडे कुकचे लक्ष गेले नाही. त्या खडकाला सध्या नॉबीहेड असे म्हणतात. तेथे समोरच हटर नदीपलीकडे सध्या न्यूकॅसल हे औद्योगिक शहर वसले

आहे मेच्या १६ तारखेला एन्डेव्हर जहाज ' पॉईंट डेंजर ' येथून पुढे गेले. हे ठिकाण म्हणजे न्यू साऊथ वेल्स आणि क्विन्सलॅन्ड या प्रांताची सरहद्दच आहे. दुसऱ्याच दिवशी त्याचे जहाज एका मोठ्या उपसागरात पोहचले. तेथे पाणी खूपच फिके दिसत होते म्हणून कॅप्टन कुकने तर्क केला की एखादी मोठी नदी येथे समुद्राला मिळत असली पाहिजे. त्याचा तर्क बरोबर होता याच ठिकाणी सध्या क्विन्सलॅन्ड प्रांताची राजधानी ब्रिस्बेन वसलेली आहे.

कॅप्टन कुक तसाच उत्तरेकडे निघाला लवकरच त्याला तेथील समुद्र एकदम शांत झालेला आढळला ग्रेट बॅरिअर रिफ या प्रवाळाचे लांबलचक तटाचे संरक्षण तेथील सागराला मिळाले होते, ही एक गोष्ट कुकला माहीत नव्हती लवकरच त्या प्रवाळ भिंतीची माहिती त्याला झाली पुढे ११ जूनला रात्री त्याचे एन्डेव्हर जहाज उथळ समुद्रातील खडकात अडकले ते जहाज बहुधा फुटणारच होते पण जहाजावरच्या तोफा व जड सामान कुकने उतरवून घेतले आणि मग जहाज हलके झाल्याने समुद्रात ढकलता आले. तीन दिवसानंतर एन्डेव्हर जहाज एका लहान नदीच्या मुखात शिरले. तेथे गेल्यावर जहाजाची दुरुस्ती करण्यात आली कॅप्टन कुक अनुकूल वाऱ्याची वाट पाहत तेथेच थांबला, बॅंक्सने तेथील अनेक विचित्र वनस्पती गोळा केल्या व स्थानिक रहिवाशांची मैत्री केली मागच्या दोन पायावर उड्या मारत जाणारा एक प्राणी त्यांनी मारला स्थानिक रहिवासी या प्राण्यांना ' कांगारू ' या नावाने ओळखत होते

पुढे गेल्यावर कुकला अनेक ठिकाणी तुटलेले खडक दिसू लागले ते टाळण्यासाठी त्याने आपले जहाज किनाऱ्यापासून लांब

भर समुद्रात नेले. ऑगस्ट महिन्यामध्ये कॅप्टन कुकने ऑस्ट्रेलिया आणि न्यूगियाना यामधील सामुद्रधुनीतून प्रवास केला आणि त्या सामुद्रधुनीला आपल्या जहाजाचे 'एन्डेव्हर' असे नाव दिले. नतर तो एका लहान बेटावर उतरला आणि तेथे जाहीर केलें की, आजवर पाहिलेल्या सर्व किनारपट्टीचा ताबा आपण इग्लंडच्या वतीने घेतला आहे ! या सर्व प्रदेशाला त्याने न्यू साऊथ वेल्स असे नाव दिले

★

प्रकरण तिसरे

# पहिली वसाहत

१७७६ पर्यंत जवळ जवळ शंभर वर्षे इंग्लंड आपले जन्मठेपेचे गुन्हेगार अमेरिकन वसाहतीत पाठवीत होते. पण अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात इंग्लंडने या वसाहती गमावल्या त्यामुळे अमेरिकेत कैदी पाठवणे बंद झाले त्याकाळी इंग्लंडमध्ये बारक्या–सारक्या गुन्ह्यानाही जबर व दीर्घ मुदतीच्या शिक्षा होत्या लवकरच इंग्लंडमधील तुरुंगाच्या कोठड्या भरून गेल्या. मग निरुपयोगी झालेली जहाजे किनाऱ्यावर आणून त्याचा वापर तुरुंगासारखा करण्यात येऊ लागला तेथेही कैद्यांची गर्दी झाली. या कैद्यांना कोठेतरी सोडायला भूमी हवी होती कॅप्टन कुकबरोबर गेलेला जोसेफ बँक व ' जेम्स मात्रा ' यानी सुचविले की ऑस्ट्रेलियातील बॉटनी बे ही जागा कैदी सोडून द्यायला चांगली आहे त्याची ही सूचना सरकारने स्वीकारली आणि १७८६ पासून ती अमलात आणावयाचे ठरविले.

१३ मे १७८७ रोजी कॅप्टन ऑर्थर फिलिप या आरमारी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली जहाजांचा तांडा ऑस्ट्रेलियाकडे रवाना झाला या तांड्यात ' सिरस ' ' सप्लाय ' व ही आरमारी जहाजे, गुन्हेगार भरलेली सहा प्रवासी जहाजे आणि तीन रसद

घेतलेली जहाजे होती दोन वर्षे पुरेल एवढा दाणागोटा बरोबर घेतला होता. सर्व जहाजावर मिळून १०४४ लोक होते. त्यांपैकी ५६८ पुरुष गुन्हेगार, १९१ स्त्री गुन्हेगार व त्यांच्याजवळील तेरा मुले, २०६ नौसैनिक, त्यांच्या ४६ बायका व मुले आणि वीस अधिकारी अशी ही गणती होती. हे सर्वजण नवीन वसाहत स्थापणार होते.



राज्यपाल ऑर्थर फिलिप

ऑर्थर फिलिपला नव्या भावी वसाहतीचा राज्यपाल नेमल होते. फिलिप मृत्यू पावल्यास त्याची जागा सिरस नौकेचा कप्तान जॉन हटर याने घ्यायची होती नौसैनिकाचा अधिकारी मेजर रॉबर्ट रॉस हा उपराज्यपाल नेमलेला होता तसेच कॅप्टन डेव्हिड कॉलीन्स हा न्यायाधीश, जॉन व्हाईट हा वैद्यकीय अधिकारी, आणि रेव्हरंड रिचर्ड जॉन्सन हा धर्मप्रमुख राहणार होता.

प्रवासात विशेष काही घडले नाही बीस जानेवारी १७८८ या दिवशी सर्व अकरा जहाजे बॉटनी बे मध्ये येऊन पोहोचली. प्रवासामध्ये तेवीस कैदी मरण पावले. पण त्यातील बरेच जण प्रवासाला निघण्यापूर्वीच आजारी झाले होते

तेथे पोहचल्याबरोबर कॅप्टन ऑर्थर फिलिपला समजून चुकले की बॉटनी बे ही जागा वस्तीला चागली नाही दुसऱ्या दिवशी तो आणि त्याचे सहकारी जवळच्या पोर्ट जॅक्सनकडे गेले तेथील रमणीय निसर्ग आणि सुरक्षितता पाहून ते सर्व खूष झाले. फोर्ट जॅकसनपासून काही किलोमीटर अतरावर सुरक्षित बदर होते व नागर टाकायला चांगली जागा होती तेथे त्याने जहाजे नागरली आणि त्या प्रदेशाला सिडनी हे नाव दिले सिडनी हा त्यावेळचा इग्लडचा वसाहतमंत्री होता.

तेथील किनाऱ्यावर २६ जानेवारी १७८८ रोजी इग्लडचे निशाण फडकविण्यात आले. आता ऑस्ट्रेलियामध्ये २६ जानेवारी हा ऑस्ट्रेलिया-दिन म्हणून पाळण्यात येतो दुसऱ्या दिवशी सकाळ-पासून कामाला सुरुवात झाली झाडे पाडून जमीन साफ करण्यात आली तबू उभारले दाणागोटा जहाजातून उतरवून घेतला या कामाच्या गडबडीत दोन आठवडे केव्हा सपले ते समजलेच नाही नतर कैदी असलेले व स्वतत्र असलेले सर्व वसाहतवाले एकत्र जमले आणि त्यांना ऑर्थर फिलिपने जाहीरनामा वाचून दाखवला. यानतर तीन दिवसानी लेफ्टनंट फिलिप गिडले किंग व सप्लाय या जहाजाचा कप्तान काही गुन्हेगार व नौ सैनिक याना घेऊन नारफोक बेटाकडे निघाला. तेथे त्याला लहानशी वसाहत स्थापायची होती

नव्या राज्यपालापुढे समस्याच समस्या होत्या. गुन्हेगार कष्टाचे

काम करायला तयार नव्हत काहीजण जवळच्या जगलात निसटले तेव्हा स्थानिक रहिवाशानी त्याच्यावर हल्ले केले । सरकारी कोठारातून अन्नधान्य चोरण्याचे प्रकार सर्रास चालत होते. लोक दारू पिण्याचा अतिरेक करू लागले होते. अनैतिकता वाढत होती. मेजर रॉस हा नौसैनिक अधिकारी सहकार्य करीत नव्हता. गुन्हेगारांच्यावर देखरेख करावयास नौसैनिक हवे होते. ते पाठविण्यास रॉसने नकार दिला. आणलेल्या मेंढ्यांच्या पैकी काही मेंढ्या मेल्या काही गुरे जगलात चुकली व सापडली नाहीत. सध्या जेथे बोटॅनिकल गार्डन आहे तेथे पहिले पीक पेरण्यात आले पण ते बी उगवण्यापूर्वीच उदरांनी व मुग्यानी खाऊन टाकले. एकदरीत सिडनी येथे बऱ्याच अडचणी आल्या. म्हणून फिलिपने सिडनीपासून वीस किलोमीटर असलेल्या बदरा-जवळ दुसरी एक वसाहत स्थापन केली तेथील जमीन चागली सुपीक होती. फिलिपने या जागेला रोझहिल असे नाव दिले. पण ते ठिकाण त्याचे स्थानिक नाव पॅरामेट्टा या नावानेच प्रसिद्धीला आले

१७८९ च्या मध्यापर्यंत आणलेला अन्नसाठा सपत आला. रेशनची मात्रा खूप कमी करावी लागली. सिरस जहाजाला दाणागोटा आणायला केप टाऊनकडे पाठविण्यात आले. पण हे जहाज फक्त थोडेसे पीठ घेऊन परतले नार्फोक बेटावर जमीन सुपीक होती. म्हणून फिलिपने वसाहतीतील ⅓ लोक तेथे पाठ-वायचे ठरविले. पण सकटपरंपरा सपली नव्हती त्यांना नेणारे सिरस जहाज फुटले आणि जहाजावरच्या लोकाना त्या बेटावर वर्षभर अडकून पडावे लागले. आता १७९० साल उजाडले होते सिडनी व पॅरामेट्टा इथे फारच थोडे लोक काम करण्याच्या

लायकीचे उरले होते अनेक गुन्हेगार शेतात काम करता करता मृत्यू पावले.

त्याच वर्षी इंग्लंडहून रसद आणि कैदी घेऊन जहाजांचा आणखी एक तांडा येऊन पोहचला दाणागोटा आल्यामुळे उपास-मार टळली. पण फिलिफपुढे नवे नवे प्रश्न उभे राहिले. या दुसऱ्या तांड्यातील गुन्हेगारांना प्रवासात इतकी क्रूर वागणूक दिली होती की त्यातील ं कैदी प्रवासातच मृत्यू पावले ऑस्ट्रे-लियाच्या किनाऱ्यावर उतरल्यानतर आणखी कित्येक कैदी मेले. त्यामुळे नवीन कैद्यापैकी कष्ट करण्यास लायक असे फारच थोडे होते जहाजाचा तिसरा तांडा ऑगस्ट १७९१ मध्ये पोचला. या तांड्यातील कैद्याना क्रूर वागणूक दिली नव्हती. तरीही बरेच कैदी मृत्यु पावले.

फिलिफची प्रकृती बरी राहत नसे तरीही त्याने सुपीक जमीन शोधण्यासाठी सिडनीच्या उत्तरेकडे आणि पश्चिमेकडे अनेक मोहिमा काढल्या यापैकी एका मोहिमेत हॉकेसबेरी नदीचा शोध लागला थोड्याच वर्षात त्या भागात लहान लहान वाड्या-वस्त्या उभ्या झाल्या. आणि सुपीक गाळाची हजारो हेक्टर जमीन लागवडीखाली आली. फिलिफवर एका ठिकाणी आदिवासींनी हल्ला केला व त्याला भाल्याच्या जखमा झाल्या त्याची प्रकृती खूपच बिघडली डिसेंबर १७९२ मध्ये तो इंग्लडला परतला वसाहतीतील परिस्थती प्रतिकूल होती तरीही ही वसाहत पुढे भरभराटीला येणार अशी खात्री व आत्मविश्वास फिलिफला वाटत होता.

यावेळपर्यंत नौसैनिकांची जागा न्यू साऊथ वेल्स पथकाने घेतली होती. या सैन्य विभागाची भरती खास ऑस्ट्रेलियातील

या वसाहतीसाठीच करण्यात आली होती या पथकाचा अधिकारी मेजर फ्रॅन्सिस ग्रोस याच्याकडेच पुढची तीन व ँ वसाहतीचा कारभार राहिला. मेजर ग्रोसने आपल्या सैनिकी अधिकाऱ्यांना खूपच सवलती दिल्या त्याना त्याने मॅजिस्ट्रेट बनवले, जमीन दिली आणि कैद्याना फुकट राबवून घ्यायची परवानगी दिली त्याना खाजगी व्यापार करायलाही परवानगी दिली. अशा सवलती मिळाल्यानतर या अधिकाऱ्यांनी व्यापारात आपली मक्तेदारी सुरू केली त्यानी रम दारूची आयात केली आणि चलनाऐवजी दारूच्या बाटल्या पगार द्यायला, घ्यायला आणि वस्तु विकत घ्यायला ते वापरू लागले ! अशा तऱ्हेने हे अधिकारी खूपच श्रीमत बनले अशाच श्रीमत झालेल्या अधिकाऱ्यामध्ये लेफ्टनट जॉन मॅकॉर्थर हा होता त्याला तसा पाचपोच नव्हता, पण दूरदृष्टी होती उत्तम लोकरीच्या मेंढया येथे चागल्या निपजतील व त्यातूनच वसाहतीची भरभराट होईल हे त्याने लवकरच हेरले

१७९५ मध्ये वसाहतीचा दुसरा राज्यपाल म्हणून कॅप्टन जॉन हटरने सुत्रे हातात घेतली त्याने व्यापार करून श्रीमत झालेल्या अधिकाऱ्याची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न केला पण तो साधा मनुष्य होता व त्याला डावपेच माहीत नव्हते. त्याचे विरोधक त्याला भारी ठरले. त्यानी इंग्लडच्या सरकारी वर्तुळात त्याच्या विरुद्ध प्रचार केला त्यामुळे १८०० साली कॅप्टन हटरला परत बोलविण्यात आले त्याच्या विरुद्ध अफवा प्रसविणारा कॅप्टन गिडले किंग एका ठाण्याचा अधिकारी झाला होता. लडनच्या आज्ञेप्रमाणे त्याने राज्यपालपदाची सूत्रे फिलिप गिडले किंग याच्या हाती सप्टेंबर १८०० मध्ये सोपवली.

राज्यपाल हंटरच्या बरोबर त्याचे लिंकन-शायर परगण्यातील दोन मित्र ऑस्ट्रेलियाला आले होते त्यापैकी जॉर्ज बॅास हा शस्त्रवैद्य होता आणि मॅथ्यू फ्लिंडर्स हा तरुण अधिकारी होता. त्या दोघांना अजून अज्ञात असलेला न्यू साऊथ वेल्सचा समुद्र-किनारा संशोधण्याची उत्सुकता होती हे सशोधन करण्यासाठी जॉर्ज बॅासने एक लहान होडी मिळविली त्या होडीचे नाव त्याने 'टॉमथंब' ठेविले. एक मुलगा सोबतीला घेतला आणि सिडनीच्या दक्षिणेला ते निघाले पहिला मुक्काम त्यांनी ८० किलोमीटरवर केला. तेथेच सध्याचे केम्ब्ला बदर आहे स्थानिक रहिवासी त्याला हुसकावून लावायला आले पण फ्लिंडर्सने आपल्या सामाना-तून कात्री काढली आणि त्याच्या दाढ्या व केस कापून त्याना खूष केले, त्याच्याशी मैत्री जोडली

सन १७९७ मध्ये जॉर्ज बॅास नव्या उत्साहाने सशोधनाला बाहेर पडला त्याने एक मासेमारीची बोट घेतली आणि दक्षिणे-कडचा सर्व किनारा पालथा घातला दक्षिण टोकाला त्याला एक बदरासाठी योग्य असलेली जागा सापडली त्या जागेला त्याने 'वेस्टर्न पोर्ट' असे नाव दिले या ठिकाणी समुद्रकिनारा दक्षिण पश्चिमेकडे वळलेला आढळला त्यावरून त्याची खात्री पटली की 'व्हॅान डायमेनची भूमी' हे बेट असले पाहिजे हे खरे असेल तर इग्लडहून येथे पोहोचायला जो वेळ लागतो त्यात पधरा दिवसाची बचत होऊ शकेल हे त्याने दाखवून दिले. याची खात्री करून घेण्यासाठी राज्यपाल हटर याने फ्लिडर्स व बॅास या दोघांना पचवीस टनी 'नारफोक' हे जहाज देऊन पुन संशोधनाला पाठवले या जहाजातून त्यांनी व्हॅान डायमेन भूमीला सपूर्ण प्रदक्षिणा घालून ते बेट आहे हे सिद्ध केले त्याचवेळी किनाऱ्याचे

नकाशे पण त्याने तयार केले त्याने जी सामुद्रधुनी शोधून काढली त्याला बॉसची सामुद्रधुनी असे नाव देण्यात आले त्यानतर काही दिवसानी फ्लिडर्स ' नारफोक ' जहाज घेऊन सिडनीहून उत्तरेकडे निघाला किनारपट्टीचे निरीक्षण करीत तो हर्वि उपसागरापर्यंत पोहोचला सध्या तेथे ऑस्ट्रेलियातील ' क्विन्सलँड ' राज्य आहे. हे सशोधन आटपून तो इंग्लंडला परतला. पण आता त्याला सशोधनाची चटक लागली होती. ऑस्ट्रेलियाच्या सर्व किनारपट्टीचा नकाशा तयार करण्याची कल्पना त्याला सुचली.

★

## प्रकरण चौथे

# फ्लिंडर्सचे संशोधन

सन १८०१ च्या सुरुवातीस 'जिऑग्राफे' आणि 'नॅचरिलेस्टे' ही दोन फ्रेंच जहाजे अधिकृतरीत्या शास्त्रीय संशोधनासाठी ऑस्ट्रेलियाकडे रवाना झाली आहेत अशी बातमी इंग्लंडमध्ये झाली. या बातमीमुळे इंग्लंडमध्ये फार खळबळ माजली या शास्त्रीय संशोधनामागे नेपोलियनचे हेतू काही निराळेच असावेत असे इंग्लंडमधील राज्यकर्त्यांना वाटले. ऑस्ट्रेलियाचा बराच भूभाग अजून असंशोधित होता. आणि त्यावर कोणालाही हक्क सांगणे सहज शक्य होते. फ्लिंडर्स आता इंग्लंडला परतला होता त्याने आरमारी मंत्रालयापुढे ऑस्ट्रेलियाच्या संपूर्ण किनाऱ्याचा नकाशा तयार करण्याची आपली योजना मांडली. फ्रेंच तेथे घुसतील या भीतीने आरमारी मंत्रालयाने फ्लिंडर्सची योजना ताबडतोब मान्य केली. त्याला 'इन्व्हेस्टिगेटर' हे जहाज द्यायचे ठरले. 'इन्व्हेस्टिगेटर' जहाज तयार होत होते तोपर्यंत फ्लिंडर्सने आपल्या लहानपणापासूनच्या प्रेयसीशी विवाह उरकून घेतला पण अधिकाऱ्यांनी नवविवाहित पत्नीला बरोबर घेऊन प्रवासाला जायला मनाई केली


फ्लिंडर्स जुलै १८०१ मध्ये आपल्या नव्या मोहिमेवर निघाला त्याच्याशी स्पर्धा करणारी फ्रेंच जहाजे नऊ महिन्यांपूर्वीच निघाली



संशोध फ्लिंडर्स

होती फ्लिंडर्स डिसेंबर १८०१ मध्ये केप लेविन येथे पोहोचला. त्यानतर 'इन्व्हेस्टिगेटर' जहाजाने काही आठवडे किंग जॉर्ज साऊंड' या खाडीच्या मुखाशी काढले. तेथे सध्या अल्बनी हे गाव आहे. येथून फ्लिंडर्स हळूहळू पूर्वेकडे निघाला.

जाताजाता तो किनाऱ्याचे तपशीलवार नकाशे बनवीत होता. या कामात भरपूर धोका होता. आणि फ्लिंडर्सच्या कौशल्यामुळेच अनेकदा अपघात टळले. तरीही शेवटी अपघात झालाच ! गोडे पाणी आणायला आठ खलाशी होडीतून गेले असता, होडी उलटली व आठही जण बुडून मेले. या ठिकाणी किनारपट्टी एकदम उत्तरेकडे वळली होती फ्लिंडर्सला वाटले की आतमध्ये एखादा भूमीवेष्टित समुद्र असेल. पण तसे नव्हते. ते एक मोठे व




फ्लिंडर्सचा मार्ग व संशोधन

खोल आखात होते. त्या आखाताला फ्लिंडर्सने तत्कालीन आरमारप्रमुख लॉर्ड स्पेन्सर याचे नाव दिले. तेथून पुढे थोड्याच अंतरावर त्याला एक मोठे बेट लागले. त्या बेटावर कांगारू, एमू पक्षी आणि सील मासे गुण्यागोविंदाने राहात होते आणि विपुल प्रमाणात होते फ्लिंडर्सने या बेटाला 'कांगारू बेट' असे नाव दिले पुढे थोड्याच अंतरावर मुख्य भूमीवर त्याला आणखी एक आखात सापडले. या आखाताला त्याने सेंट व्हिन्सेंटचे आखात असे नाव दिले यावेळी तो सध्याचे 'ॲडेलेड' शहर जेथे आहे त्या जागेच्या अगदी जवळून गेला.

फ्रेंच जहाजे कोठे आहेत हे फ्लिंडर्सला अजून समजलेले नव्हते. पण लवकरच त्याची भेट झाली. आठ एप्रिलला त्याला एक परकीय जहाज दिसले. तेच फ्रेंचांचे जिऑग्राफे हे जहाज होते

फ्लिंडर्सने लागलीच युद्धाची तयारी केली पण फ्रेंच नौदल अधिकारी निकोलस बोदिन याला शांतता हवी होती. दोन्ही जहाजे जवळ आली आणि दुभाषामार्फत बोदिन आणि फ्लिंडर्स याची बराच वेळ बोलणी झाली बोदिनने सांगितले की आमच्या जथ्याने वॉन डायमेन भूमीजवळच बरेच महिने घालवले. एक फ्रेंच अधिकारी वैतागून म्हणाला की 'आम्ही तेथे शंख शिंपले गोळा केले आणि माशा मारल्या!' फ्रेंचानी बॉस सामुद्रधुनी-जवळचा मुख्य भूमीचा आठशे किलोमीटर्स भूमीचा किनारा तपासला होता. 'जिऑग्राफे' 'आणि' नॅचरलिस्टे' या दोन जहाजाचा संपर्क वादळात तुटला बोदिनने अंदाज केला की 'नॅचरलिस्टे' जहाज सिडनीकडे निघाले असावे. बोदिनच्या जहाजालासुद्धा बऱ्याच दुरुस्त्या करणे आवश्यक होते. त्याचे अनेक खलाशी स्कर्व्ही रोगाने आजारी होते. भेटीनंतर दुसऱ्या दिवशी बोदिन पश्चिमेकडे निघाला. आणि फ्लिंडर्स पूर्वेकडे निघाला फ्लिंडर्स आला त्याचमार्गाने बोदीन जात होता. तरी त्याने नकाशे तयार केले आणि तेथील ठिकाणांना नवीन नावे दिली त्याने या प्रदेशाला नेपोलियनची भूमी ' असे नाव दिले

सिडनीकडे जाताना फ्लिंडर्सला एका मोठ्या बंदराचे ठिकाण सापडले. त्याला वाटले की हा आपण मोठाच शोध लावला आहे पण नंतर त्याला समजले की ही बंदराची जागा लेफ्टनंट जॉन मूरे याने त्याच्यापूर्वी फक्त १० आठवडेच शोधून काढली होती हंटरनंतरचा राज्यपाल कॅप्टन फिलिप गिडले किंग याच्या नावाने या नव्या बंदराला पोर्ट फिलिप असे नाव दिले. तेथेच सध्याची मेलबोर्न आणि गेलाँग ही शहरे वसली आहेत

'इन्व्हेस्टिगेटर' जहाज ९ मेला सिडनीला पोहोचले. जहाजाला

दुरुस्तीची बरीच आवश्यकता होती. सिडने येथे परिस्थिती सुधारलेली नव्हती व्यापार करून श्रीमंत झालेल्या व मक्तेदार बनलेल्या अधिकाऱ्यांचेच तेथे वर्चस्व होते रम दारूचे चलन अस्तित्वात असल्याने प्रगतीला अडथळा येत होता. राज्यपाल किंग हताश होऊन या माजलेल्या व लाचखाऊ अधिकाऱ्यामध्ये भांडणे लागून केव्हा फूट पडते याची वाट पाहात होता लवकरच तसे झाले. मॅकार्थर व कर्नल विल्यम पॅटर्सन भांडले व द्वंद्वयुद्ध खेळले. मॅकार्थरवर खटला भरून त्याला इंग्लंडला पाठविण्यात आले.

'नॅचरॅलिस्टे' हे फ्रेंच जहाज सिडनी बंदरात जून महिन्यात आश्रयाला आले होते त्यावरचे सर्व खलाशी स्कर्व्ही रोगाने आजारी झाले होते. त्यांना जहाज बंदरात आणायला फ्लिंडर्सनेच मदत केली. राज्यपाल किंगनेही आजारी लोकांची चांगली व्यवस्था ठेवली पण बोदिनच्या फ्रेंच नाविकांनी कृतज्ञता न बाळगता सिडनी ठाण्याच्या लष्करी बळाची माहिती गोळा केली आणि आक्रमणासाठी सैन्य उतरावयाला कोणत्या जागा अनुकूल आहेत ते हेरून ठेवलेच !

२२ जुलैला दुरुस्त केलेले इन्व्हेस्टिगेटर' जहाज पुन्हा मोहिमे-वर निघाले त्याच्याबरोबर 'लेडी नेल्सन' हे साठ टनी जहाजही निघाले उथळ पाण्यात लेडी नेल्सन' जहाजाचा उपयोग होण्या-सारखा होता पण 'लेडी नेल्सन'चा वेग इतका मंद होता की फ्लिंडर्स कटाळला आणि त्याने 'लेडी नेल्सन' जहाजाला सिडनीकडे परत पाठवले. त्यानंतर फ्लिंडर्सने तीन महिने सध्याच्या 'क्विन्सलँड राज्याच्या किनारपट्टीचे सर्वेक्षण करण्यात खर्च केले. कुकने वगळलेल्या अनेक ठिकाणांचे नकाशे तयार झाले.

नोव्हेंबरमध्ये ' इन्व्हेस्टिगेटर ' जहाज ' कारपेंटारिया 'च्या आखातात पोहोचले जहाजाला आता बरीच गळती लागली होती. त्यामुळे दुरुस्तीसाठी फ्लिंडर्सने ते किनाऱ्यावर नेले जहाजाचे लाकूड अनेक ठिकाणी कुजले होते जहाजाने वादळात टिकाव धरला नसता ही संशोधन मोहीम थांबवून सिडनीला परतणे हिताचे होते.

पण फ्लिंडर्स आता नादिष्ट मनुष्य झाला होता. सतत पडणारा पाऊस, उकाडा, आदिवासींच्या हल्ल्याची भीती, मोडकळीला आलेले जहाज या कशालाही न जुमानता त्यानें आपले संशोधन चालूच ठेवले. चार महिन्यांनतर दाणागोटा संपत आला. आणि जहाज बुडण्याच्या अवस्थेत आले तेव्हा फ्लिंडर्सला नाईलाजाने ' टिमोर ' येथील डच बंदरात आश्रय घ्यावा लागला तेथे जहाजाची बरीच दुरुस्ती करण्यात आली आता फ्लिंडर्सला सिडनीला परतायचे होते पण वाईट हवेमुळे ' टोरेस ' सामुद्रधुनीतून त्याला जाता येईना शेवटी ऑस्ट्रेलियाच्या पश्चिम व दक्षिण किनारपट्टीलाच धरूनच जायचे असे त्याने ठरवले या सर्व प्रवासाला दोन महिने लागले पण त्यात सर्वांचे फारच हाल झाले अमांशामुळे चार खलाशी मेले स्कर्व्ही रोगामुळे फ्लिंडर्सला जखमा झाल्या व त्याला जागचे हालताही येईना ! फारच थोडे खलाशी कामाजोगे उरले होते शेवटी जहाज कसेबसे ८ जून १८०३ रोजी सिडनीला येऊन पोहोचले तेथे पोहोचल्यावर थोड्या दिवसातच आणखी चार खलाशी मृत्यू पावले

फ्लिंडर्सने थोडी विश्रांती घेतली पण पूर्ण बरा होण्याच्या आतच इंग्लंडला परतायसाठी तो उतावीळ झाला. तेथे त्याला आपल्या संशोधनाचा अहवाल सादर करायचा होता. आणि मोड-

कळीला आलेल्या 'इन्व्हेस्टिगेटर' जहाजाच्या बदली दुसरे जहाज मिळवायचे होते. त्याने आपल्या जथ्यातील लोकांच्या दोन तुकड्या केल्या राज्यपाल किंगने उसने दिलेल्या 'पॉर्पाईज' या आरमाराच्या जहाजावर त्याने एक तुकडी पाठवली आणि दुसरी तुकडी चीनला जाणाऱ्या काटो या व्यापारी जहाजावर पाठविली सिडनेहून १० ऑगस्टला ते निघाले. त्याच्याबरोबर 'ब्रीजवॉटर' हे आणखी एक व्यापारी जहाजही निघाले एका आठवड्याच्या प्रवासानतर 'क्विन्सलँड' किनाऱ्यापासून ४०० किलोमीटर्स अतरावर 'पॉर्पाईज' आणि 'काटो' ही जहाजे प्रवाळाच्या खडकावर आपटून फुटली 'ब्रीजवॉटर' हे जहाज तेथे थोडा वेळ रेंगाळले आणि लोकाना वाऱ्यावर सोडून तसेच पुढे निघून गेले! या दुर्दैवी घटनेतील सुदैव असे की फक्त तीन खलाशी वाहून मेले. आणि जहाजे बुडून नष्ट होण्यापूर्वी वाचलेल्या खलाशानी जहाजावरचे सर्व सामान व दाणागोटा तीनशे मीटर्स लाबरुद असलेल्या वाळूच्या किनाऱ्यावर नेला फ्लिंडर्स सहा वल्ह्याच्या होडीत बसून १२०० किलोमीटर्स दक्षिणेकडे असलेल्या सिडनीला पोहोचला मागे राहिलेल्या खलाशाची सुटका दोन महिन्यानी करण्यात आली.

या खलाशांपैकी काहीजण सिडनीलाच राहिले आणि काही-जण चीनला गेले. फ्लिंडर्स पूर्वीप्रमाणेच इग्लडला परतायला उतावीळ झाला होता त्याने 'कबरलंड' नावाचे २९ टनी 'स्कूनर' जातीचे जहाज मिळविले ते लाबच्या सागरी प्रवासाला योग्य नव्हते तरी त्यातून फ्लिंडर्स निघाला. वाटेत मॉरिशस येथे जहाजाची दुरुस्ती करायला व रसद घ्यायला फ्लिंडर्स थाबला मॉरिशस बेट फ्रेंचाच्या ताब्यात होते फ्रान्स आणि इग्लड याची

अजून मैत्रीच असावी या समजुतीने तो तेथे थाबला होता तिथल्या अधिकाऱ्यांनी जरा सशयानेच त्याला बदरात येऊ दिले. राज्य-पाल जनरल डेकेनबरोबर भोजन करण्याचे निमत्रण त्याने नाकारले. त्यामुळे सशय येऊन त्याचे ' स्कूनर ' अधिकाऱ्यानी ताब्यात घेतले आणि जहाजावरच्या सर्वांना अटक केली. पुढची सहा वर्षे फ्लिंडर्सला मॉरिशस येथेच कैदेत काढावी लागली ! सर जोसेफ बँक्स आणि इतर मित्र यांनी शिष्टाई करून सन १८१० मध्ये त्याची मुक्तता केली तो इग्लडला परतला त्याची प्रकृती फारच बिघडली होती शिल्लक असलेली थोडीफार कार्यशक्ती त्याने ' दक्षिण भूमीचा प्रवास ' या नावाचे पुस्तक लिहिण्यात खर्च केली त्या पुस्तकात उत्तम नकाशे आहेत व समुद्र-प्रवासाचा तपशीलवार वृतान्त आहे. छापून झालेले पुस्तक बघण्याचे फ्लिंडर्सच्या नशीबी नव्हते प्रकाशकानी पहिली प्रत बाधली तेव्हा तो बेशुद्ध झालेला होता. दुसऱ्याच दिवशी १९ जुलै १८१४ रोजी तो मृत्यू पावला ! त्यावेळी त्याचे वय फक्त चाळीस होते !

## व्हॅन डायमेन भूमी

अधिकाऱ्यात अतर्गत भांडणतटे चालू असले तरी वसाहत हळूहळू वाढतच होती सिडनीच्या उत्तरेकडे ११० किलोमीटर्स अतरावर १७९७ मध्ये एक सुरेख नदी सापडली. त्या नदीला राज्यपाल हटरचे नाव ठेवण्यात आले पण त्या प्रदेशात कोळसा सापडल्यामुळे त्या नदीला ' कोल रिव्हर ' असेच नाव पडले. तेथे न्यू कॅसल या नावाची वसाहत १८०१ मध्ये स्थापन करण्यात आली पण लवकरच ती निर्मनुष्य झाली. मग १८०४ मध्ये पुन्हा

गुन्हेगारासाठी एक वसाहत शासकीय आज्ञेवरून उभारण्यात आली. ऑस्ट्रेलियात पाठवलेल्या गुन्हेगारानी तेथे पुन्हा गुन्हे केल्यास त्याना न्यू कॅसल या कडक तुरुगात पाठविण्यात येई.

सिडनेच्या पश्चिमेला पॅरामेट्टा' आणि 'हॉकेसबरी'च्या दरम्यान बरीच शेतीवाडी झाली होती हॉकेसबरीजवळही अनेक वाडचा–वस्त्या उभ्या राहत होत्या. दक्षिण–पश्चिमेच्या मैदानात अनेक रानटी गुरे चरताना दिसत असत १७८८ साली जी गुरे आणली त्यातली काही जगलात पळाली होती. त्याचाच हा वश वाढला होता. जॉन मॅकॉर्थर या लष्करी अधिकाऱ्याने आपली नोकरी सोडून दिली होती. आणि तो खाजगी नागरिक म्हणून परतला होता. त्याला या दक्षिण–पश्चिमेच्या मैदानात पाच हजार एकर जमीन मिळाली होती. या जमिनीवर त्याने मरिनो मेढ्याची पैदास व जोपासना सुरू केली.

तरीही सर्व ऑस्ट्रेलिया खडाचा विचार करता वसाहतीचे क्षेत्रफळ नकाशावर टाचणीच्या डोक्याइतकेच होते. पश्चिमेकडच्या निळ्या पर्वतश्रेणीपलीकडे काय आहे हे कोणालाच माहिती नव्हते. अनेकानी हे पर्वत ओलाडण्याचा प्रयत्न केला होता पण त्यात त्याना यश आले नव्हते.

फ्रेंच नाविक बोदिन याने सिडनेला दिलेल्या भेटीपासून इग्रजाना फ्रेंचाच्या ऑस्ट्रेलियातील उद्दिष्टाची भीती वाटू लागली फ्रेच या नव्या खडावर वसाहती स्थापण्याची शक्यता आहे अशी साधार भीती त्याना वाटत होती तेव्हाचा राज्यपाल किंग याने इग्लडमधील शासनाला पत्र लिहिले की पोर्ट फिलिप येथे आणखी एक वसाहत स्थापन करणे आवश्यक आहे त्यामुळेच फ्रेचाना शह बसेल. त्याने लेफ्टनंट चार्ल्स रॉबिन्स याला बास सामुद्रधुनीत

हिंडत असलेल्या फ्रेंच जहाजांच्या मागावर पाठवले. त्याला ती जहाजे किंग बेटाजवळ भेटली त्याने फ्रेंच अधिकारी बॉदिनला आपल्या राज्यपालाकडून आणलेला खलिता दिला व ताकीद दिली बेटावरील एका झाडावर त्याने इंग्लिश निशाण दोऱ्याने बांधले. बॉदिनला हा सगळा पोरखेळ वाटला ! आणि त्याने सौम्य भाषेत आपला विरोध नोंदवणारे पत्र राज्यपाल किंगला लिहिले, आणि तो आपली जहाजे घेऊन मॉरिशसला निघून गेला. तरीही राज्यपाल किंगच्या मनातील फ्रेंचाची धास्ती निघून गेली नव्हती त्याने ऑगस्ट १८०३ मध्ये लेफ्टनंट जॉन बोवेनला व्हॉन डायमेन भूमीमध्ये वसाहत स्थापन करायला पाठवले. बरोबर काही सैनिक व श्रमाचे काम करण्यासाठी काही गुन्हेगार दिले. तिथे डेर्वेंट नदीकाठी त्यानी वसाहत स्थापन केली.

मध्यंतरी राज्यपाल किंगने जे पत्र पाठवले होते, त्यानुसार इंग्लंडमधील शासनाने अनपेक्षितपणे जलद निर्णय घेतले. पोर्ट फिलिप येथे ठाणे उभारण्यासाठी एक मोहीम काही आठवड्यां-तच काढण्यात आली. त्या ठाण्यावर मुख्याधिकारी म्हणून कर्नल डेव्हिड कॉलिन्सला नेमण्यात आले. सिडनी येथील पहिल्या वसा-हतीमध्ये त्याची नेमणूक न्यायाधीश म्हणून झाली होती. सिडनी-कडे तीनशे गुन्हेगार नेणारे ' कलकत्ता ' हे जहाज पोर्ट फिलिप-कडे वळवण्यात आले तसेच ' ओशन ' हे जहाज वसाहत करणारे लोक व रसद नेण्यासाठी भाड्याने घेण्यात आले ही जहाजे २७ एप्रिल १८०३ ला निघाली त्यात एकंदर ४७० लोक होते. यामध्ये शिक्षा झालेले गुन्हेगार, नागरी अधिकारी, नौसैनिक वसाहत करू इच्छिणारे, स्त्रिया व मुले असे सर्वजण होते वादळामुळे दोन्ही जहाजे अलग पडली. ' ओशन ' हे जहाज ' पोर्ट

फिलिप 'ला आधी पोहोचले. कलकत्ता जहाज दोन दिवसानी आले. सध्या जेथे सोरेंटो हे शहर आहे तेथे ही सर्व मंडळी किनाऱ्यावर उतरली. वाळूमध्ये झरे खोदून थोडे पाणी मिळविण्यात आले. हे लोक जहाजातून सामानसुमान उतरवून घेऊन ते लावत आहेत तोपर्यंत कॉलिन्सने एक जथा जास्त चांगली जागा शोधायला पाठविला जवळच यारा नदी होती ती उत्तम जागा होती पण ती या जथ्याच्या लक्षात आली नाही तेथेच सध्याचे मेलबोर्न शहर उभे राहिले आहे. त्या जथ्याला पश्चिम किनाऱ्याजवळ सुपीक जमीन सापडली तेथेच सध्याचे गेलाँग शहर वसले आहे. पण त्या ठिकाणी स्थानिक रहिवासी मोठ्या प्रमाणात होते आणि ते चांगले लढवय्ये होते। त्यामुळे कॉलिन्सला तेथे वस्ती करता आली नाही. त्याने राज्यपाल किंगला पत्र लिहिले आणि दुसरीकडे वसाहतीला जाण्याची परवानगी मागितली. त्याच्या नौसैनिकात शिस्त नव्हती आणि गुन्हेगार नेहमीच नजिकच्या जंगलात पळ काढत होते. त्यामुळे कॉलिन्स काळजीतच होता राज्यपाल किंगने व्हॅान डायमेन भूमीमध्ये स्थलांतर करायला परवानगी दिली त्याने डेरवेंट नदीजवळ वसाहत करायचे ठरविले आणि १८०४ च्या सुरुवातीला आपली वसाहत तेथे नेली बास सामुद्रधुनीवर नजर ठेवता यावी म्हणून राज्यपाल किंगने कर्नल पॅटरसन याला व्हॉन डायमेन भूमीवर 'दालन्हिपल' बंदर येथे वसाहत करायला पाठवले. अशा तऱ्हेने व्हान डायमेन बेटावर दोन वसाहती उभ्या राहिल्या या वसाहतीमुळे फ्रेंचाच्या संभाव्य आक्रमणाला यशस्वी तोंड देता येईल असे राज्यपाल किंगला वाटले

डेरवेंट नदीवर पूर्वी बोवेनने एक वसाहत केली होती. पण

त्यापेक्षा चागली जागा तेथून काही मैलावर होती. ती कॉलिन्सने निवडली. तेथेच पुढे 'कोबॅाल्ट' हे शहर उभे राहिले. वसाहतीची सुरुवात तर चागली झाली. सर्वजण उत्साहाने कामाला लागले. गुन्हेगारानी कष्टाची कामे सुरू केली. आणि कोणी फारसा त्रास दिला नाही स्वतत्र वसाहतवालेही जोमाने उद्योगाला लागले, व स्थानिक रहिवासीही मित्रत्वाने वागत होते. अन्नसाठा मात्र कमी होत होता. पण कॉलिन्सला इग्लडहून लवकरच रसद येईल याची खात्री वाटत होती. पण लवकरच परिस्थिती बिघडली ! गुन्हेगार जगलात पळून जाऊ लागले त्यानी स्वतत्र वसाहतवाल्यांच्या [illegible] वाश्याना वाईट वागणूक दिली इग्लडहून रसद घेऊन कोणीच आले नाही. तेंव्हा कॉलिन्सने कागारूची शिकार करायला शिकारी पाठवले स्थानिक रहिवाश्याच्या शिकारीमध्ये व्यत्यय आला आणि ते खवळले. वसाहत सोडून थोडे अंतरही नि शस्त्र जाणे धोक्याचे ठरू लागले. राज्यपाल किंगने सिडनीहून खारावलेले मास पाठवले पण ते खाण्याच्या लायकीचे नव्हते १८०५ साल सपत आले होते. आता वसाहतीला दुष्काळाला तोंड द्यावे लागत होते आठवडयाचे जे रेशन मिळे त्यात दीड दिवस कसाबसा भाग

पण नतर स्थानिक पिके निघाली हिन्दुस्थानातून तादूळ घेऊन एक जहाज आले. सिडनीहूनही थोडीशी मदत झाली. अशा तऱ्हेने वसाहत दुष्काळातून कशीबशी पार पडली पण इतक्यात दुसरी एक आपत्ती आली इग्लडमधील शासनाने नारफोक बेटातील वसाहत सोडून द्यायचे ठरविले तेथील सर्व ५५० लोक डेरवेंट येथील नव्या वसाहतात राहायला आले त्यामुळे वसाहतीची

लोकसंख्या एकदम दुप्पट झाली नवीन आलेले लोक स्वतंत्र वसाहतवाले होते. त्याना नुकसानभरपाई, बदली जमीन आणि कष्टाच्या कामासाठी गुन्हेगार द्यायचे सरकारने कबूल केले होते ते सर्व लोक कॉलिन्सचे डोके खाऊ लागले. त्यांच्या मागण्या पूर्ण करणे कॉलिन्सला शक्य नव्हते.

ऑगस्ट १८०६ मध्ये किंगच्या जागेवर विल्यम ब्लिघ हा राज्यपालपदावर आला. इंग्लडमधील शासनाने त्याला अधिकाऱ्याची मक्तेदारी मोडून काढायच्या सुचना दिल्या होत्या तसेच रम दारुचा व्यापार व चलन म्हणून उपयोग बद पाडण्यासाठी त्याला आज्ञा दिल्या होत्या. हे साध्य करण्यासाठी त्याने कडक नियम बनवले. अधिकाऱ्यानी आपले हक्क सुरक्षित राखण्यासाठी मॅक्आर्थरच्या नेतृत्वाखाली राज्यपालाला विरोध सुरू केला मॅक्आर्थरने राज्यपालाच्या आज्ञा पाळल्या नाहीत म्हणून त्याला पकडण्यात आले. आणि त्याच्यावर कोर्ट मार्शल भरविण्यात आले. पण कोर्ट मार्शलवर त्याचे मित्रच होते। त्यानी मॅक्आर्थरचा खटला चालवायला नकार दिला. त्याच दिवशी सध्याकाळी म्हणजे २६ जानेवारी १८०८ रोजी मेजर जॉन जॉन्स्टन हा सिडनीमधील वरिष्ठ अधिकारी राज्यपालभवनावर चालून गेला. राज्यभवनाच्या दारात ब्लिघची मुलगी मेरी पुटलडने या सैन्यतुकडीला अडवले. तिला बाजूला सारून सैन्य तुकडी आत घुसली आणि त्यानी राज्यपालाला अटक केली।

व्हान डायमन बटावर असलेल्या कॉलिन्सला ही बातमी समजली तेव्हा त्याला धक्काच बसला. त्याने गुप्त पत्र ब्लिघला पाठवले. त्या पत्राद्वारे आपण ब्लिघशी एकनिष्ठ आहोत हे कळविले. ब्लिघ एक वर्ष बडखोराच्या कैदेत होता पण एका वर्षात त्याने

इतके थैमान घातले की याला सोडून दिलेला बरा असे बंड-खोरांना वाटले। त्यांनी त्याला पॉरपाईज हे जहाज दिले आणि सरळ इंग्लंडला निघून जायच्या अटीवर त्याची मुक्तता केली. पण तो इंग्लंडला जायच्या ऐवजी डेरव्हेंट येथे गेला कॉलिन्स आपल्याला पाठिंबा देईल असा भरवसा त्याला वाटत होता. सुरुवातीला त्या दोघांची चांगली मैत्री राहिली पण पुढे त्यांचे संबंध बिघडले इकडे बंडखोरांनी ब्लिघशी एकनिष्ठ राहिलेल्या लोकांना शिक्षा केल्या ब्लिघ त्याला दिलेल्या जहाजात ऑस्ट्रे-लियाच्या किनाऱ्याजवळ फिरत राहिला येणारी जाणारी जहाजे त्यांनी अडविली आणि आपल्याला लागणारा अन्नसाठा व इतर माल त्यातून हडप केला। अशी गोंधळाची स्थिती सहा महिने राहिली नंतर जानेवारी १८१० मध्ये सिडनीला नवा-राज्यपाल नेमला आहे अशी बातमी मिळाल्यावर ब्लिघ कॉलिन्स जवळून निघाला आणि जॅक्सन बंदराकडे पोचला ब्लिघ गेल्यावर कॉलिन्सने सुटकेचा निश्वास टाकला ब्लिघ फारच जुलमी कारभार करीत असे तेव्हा त्याच्याविरुद्ध बंड केले ते योग्यच झाले असे कॉलिन्सला वाटले.

★

प्रकरण पाचवे

# पश्चिमेकडील विस्तार

नवा राज्यपाल कर्नल लाचलान मॅक्वायरे येताना आपल्या बरोबर स्वत:ची ७३ वी रेजिमेंटच घेऊन आला होता. आल्या-आल्या त्याने न्यू साऊथ वेल्स सैन्य तुकडीचे विसर्जन करून टाकले. बडखोराच्या सरकारने दिलेले जमिनीचे हक्क रद्दबातल ठरविण्यात आले ब्लिघच्या ज्या पाठिराख्याना तुरुंगात टाकले होते त्याची सुटका करण्यात आली जॉन्स्टनला अटक करण्यात आली, आणि कोर्टमार्शल करण्यासाठी इंग्लंडला पाठवण्यात आले अजून ब्लिघ सिडनीमध्येच होता बडखोरावर खटले भरण्या-साठी पुरावे गोळा करत होता. इतक्यात कॉलिन्स हृदयविकाराने मृत्यू पावल्याची बातमी आली. कॉलिन्सच्या मृत्यूला ब्लिघ कारणीभूत आहे असा आरोप काहींनी केला पण डेव्हेन्ट वसा-हतीची फार काळजी केल्यामुळे त्याचा मृत्यू ओढवला होवार्ट शहराचा अधिकारी लॉर्ड याने कॉलिन्सचा अंत्यविधी शाही थाटाने केला. आणि त्यांच्या खर्चाबद्दल सातशे पौंडाचे बिल राज्यपालाकडे पाठविले! ते बिल पाहून मॅक्वायरेला धक्काच बसला! पण ती रक्कम त्याने देऊन टाकली.

न्यू साऊथ वेल्स वसाहतीत अनेक तातडतोबीचे प्रश्न निर्माण

झाले होते हॉकेसबेरी नदीच्या पुराने किनाऱ्यावरील पिके नष्ट झाली होती नतर खूप दिवस पाऊस न पडल्याने पिके व कुरणे वाळू लागली होती. वसाहतीच्या विकासासाठी व गुराना चरायला आणखी जमीन शोधून काढणे आवश्यक होते जमिनीचा विस्तार वाढविणे आवश्यक होते वसाहतीच्या पश्चिमेलाच वाढायला जागा होती

पण पश्चिमेला निळ्या पर्वताचा अडथळा होता हे पर्वत ओलाडून कोणालाच जाता आले नव्हते सुरुवातीच्या काही सशोधकाचे प्रयत्न वाया गेले होते सन १८१३ मध्ये तिघा सशोधकानी सशोधनाची नवीन पद्धत वापरायचे ठरविले जॉर्ज बॅक्सलॅंड, विल्यम चार्ल्स वेंटवर्थ आणि विल्यम लॉसन हे ते तिघे सशोधक होते त्यानी पर्वत चढायचे टाळले. दऱ्याच्या तळातूनच त्यानी मार्ग शोधायचा प्रयत्न केला शेवटी ते सतरा दिवसाच्या प्रवासानतर एका पर्वत शिखराजवळ पोहचले त्या शिखराला त्यानी माऊट बॅक्सलॅन्ड असेच नाव दिले त्यानी ती पर्वतराजी प्रत्यक्ष ओलांडली नाही पण ते ओलाडणे शक्य आहे हे दाखवून दिले त्यांना पश्चिमेला सुपीक जमिनीचा एक मोठा पट्टा दिसला. त्यानी राज्यपालाना सागितले की, ही नवीन जमीन वसाहतीला तीस वर्षे पुरेल त्याच्यानतर लागलीच जॉर्ज विल्यम इव्हॉन्स हा सरकारी सर्व्हेअर त्या नव्या प्रदेशात गेला. त्याने १६० किलोमीटर आणखी पश्चिमेकडे मुसंडी मारली हा प्रवास त्याला भेटलेल्या नदीच्या काठानेच त्याने केला त्या नदीला त्याने आपल्या राज्यपालाचे मॅक्वायरे हे नाव दिले.


इव्हान्सने नव्या देशाबद्दल जो अहवाल सादर केला त्यामुळे तेथे वसाहत करायची ठरले पर्वत ओलांडून तेथे जाणे सुलभ

व्हावे म्हणून राज्यपाल मॅक्वायरे यांनी तेथपर्यंत रस्ता बांधायचे ठरविले हे काम विल्यम कॉक्स या होतकरू वसाहतवाल्यावर सोपविण्यात आले. कॉक्सने गुन्हेगारातील तीस जण निवडले. त्यांनी जर चांगले काम केले तर त्यांची कैदेतून कायमची सुटका करण्याचे वचन त्याने दिले. त्या सर्वांनी खूपच चांगले काम केले डोंगरातून आणि कड्यातून त्यांनी सहा महिन्यात १६० किलो-मीटर लांबीचा रस्ता बांधून पूर्ण केला. त्या शिवाय बारा पुलही बांधले या उत्तम कामाबद्दल पश्चिमेकडे दोन हजार एकर सुपीक जमीन कॉक्सला बहाल करण्यात आली

सन १८१५ मध्ये मॅक्वायरे आपल्या पत्नीसह पन्नास लोक घेऊन या नव्या रस्त्याने निघाला नऊ दिवसात तो मॅक्वायरे नदीच्या किनाऱ्यावर पोहचला. तेथे एक जागा निवडण्यात आली आणि त्याजागी बाथरस्ट हे नवे गाव वसवण्यात यावे असा जाहीरनामा मॅक्वायरे यानी काढला बाथरस्ट हा त्यावेळचा वसाहतमंत्री होता. राज्यपालाच्या मागोमागच वसाहत करण्या-साठी वसाहतवाले बैलगाड्यात आपले सामान भरून बायका-मुलांसह आणि गुराढोरासह आलेले होतेच त्यापैकी काहींना अधिकृत जमीन देण्यात आली. अनेकजण जी जमीन पसंत पडली ती आपलीच समजून तेथेच शेतीवाडी थाटून राहिले ! ऑस्ट्रे-लियामध्ये वसाहत करायला येणाऱ्यांचा ओघ आता सुरू झाला होता.

इव्हान्स राज्यपालाबरोबर सिडनीला परतला नाही. काही लोक बरोबर घेऊन तो बाथरस्टच्या दक्षिण–पश्चिमेस संशोधना-साठी निघाला दहा दिवसाच्या प्रवासानंतर त्याला आणखी एक नदी सापडली त्या नदीला त्याने लाचलान हे मॅक्वायरेच्या

मुलाचे नाव ठेवले या नव्या प्रदेशातील जमीन सुपीक असून वस्तीला योग्य आहे असा त्याने अहवाल दिला मॅक्वायरेला त्यामुळे उत्साह आला आणि त्याने लंडनला नव्या प्रदेशात वाटेल तेवढी लोकसंख्या मावू शकेल असा वृत्तांत पाठविला.




**इव्हान आणि ऑक्स्लेचे संशोधन**

इव्हान्स हा दुय्यम अधिकारी होता. त्याला मिळालेल्या या यशामुळे त्याचा वरिष्ठ अधिकारी सर्व्हेअर जनरल जॉन ऑक्स्ले याला मत्सर वाटला असावा कारण लवकरच लंडनहून नवीन नियम आला की, यापुढच्या संशोधन मोहीमांवर शास्त्रीय निरिक्षणाचे ज्ञान असलेला मनुष्य पाठवावा. त्याला नकाशे काढता यावेत व जमीन, प्राणी, वनस्पती, खनिज संपत्ती स्थानिक रहिवाशाचे रितीरिवाज आणि भाषा यांचे तपशील नोंदवता यावेत' इतक्या लायकीचा मनुष्य वसाहतीत मिळणे शक्य नव्हते. शेवटी

ऑक्स्लेलाच संशोधन मोहिमेच काम हाती घ्यावे लागले पश्चिमे-कडच्या नद्याचा प्रश्न सोडवायचा होता या कामासाठी मॅक्वा-यरेने ऑक्स्ले १८१७ मध्ये पाठविले इव्हान्स त्याचा दुय्यम अधिकारी म्हणून ेला

प्रथम ते लाचलॉन नदीकिनारी पोचले. ऑक्स्लेने नदीच्या प्रवाहाच्या दिशेने जायचे ठरविले काही अतर गेल्यानंतर ती नदी विस्तीर्ण दलदलीत विलीन झाली आहे असे त्याला आढळले. तेव्हा त्याने तो रस्ता सोडला आणि तो दक्षिण पश्चिमेकडे वळला पण त्याचा हा मार्ग खुरट्या झुडूपाच्या प्रदेशातून जात होता आणि तेथे अजिबात पाणी नव्हते लवकरच त्याचे घोडे हडकुळे दिसू लागले । तेव्हा दक्षिण—पश्चिमेचा हा भाग रूक्ष, ओसाड आणि वस्तीस अपात्र आहे असे ठरवून तो उत्तरेकडे वळला पण तो तसाच नेटाने दक्षिणेकडे जात राहिला असता तर त्याला मुरुमबिघे नदी आढळली असती

जून १८१८ मध्ये ऑक्स्ले पुन्हा एकदा मोहिमेवर निघाला. इव्हान्स दुय्यम अधिकारी म्हणून होताच यावेळी त्यानी मॅक्वायरे नदीच्या किनाऱ्याने जायचे ठरविले होते बरेच अतर गेल्यानंतर ही नदीसुद्धा लाचलॉन नदीप्रमाणेच प्रचड दलदलीत गुप्त झाली आहे असे त्याना आढळले या दलदलीतुन मार्ग काढण्याचा ऑक्स्लेने व्यर्थ प्रयत्न केला त्याच वेळी इव्हान्स एक लहानसा जथ्था घेऊन पूर्वेकडे गेला थोड्याच दिवसात त्याला मॅक्वायरे नदीला समातर वाहणारी एक छोटी नदी दिसली त्या नदीला कॅसलरेघ असे नाव त्यानी दिले. ऑक्स्लेने मॅक्वायरे नदीच्या दलदलीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न सोडून दिला आणि तो कॅसल-रेघ नदी ओलाडून वारूमबगल पर्वताच्या रांगा चढला त्या

संशोधकामागे वसाहतवाले बैलगाड्या भरून जायचे।

पर्वतावरून त्याला पश्चिमेकडील प्रदेश न्याहाळता येणार होता पश्चिमेकडे काही दिसले नाही पण पूर्वेकडे मात्र त्याला विस्तीर्ण व सपाट मैदान दिसले तेथील जमीन सुपीक होती व गुरे चारायला योग्य होती या मैदानाला त्याने 'लिव्हरपूल प्लेन' असे नाव दिले. हे मैदान ओलाडून 'त्यांचा जथा मुख्य पर्वत-श्रेणीवर चढला व दुर्गम पर्वतातून वाट काढत पूर्वेकडे उतरला. त्याना एक लहानशी नदी दिसली त्या नदीचे नाव त्यानी हेस्टिंग्ज असे ठेवले त्या नदीच्या किनाऱ्याने ते समुद्रापर्यंत गेले तेथे एक बंदराची उत्तम जागा होती त्या जागेला त्यानी पोर्ट मॅक्वायरे असे नाव दिले तेथून ते किनाऱ्या किनाऱ्याने न्यू कॅसलला पोचले.

या संशोधकाच्या मागे मागे वस्ती करण्यासाठी वसाहतवाले बैलगाड्या भरून जात होतेच। मात्र अशा वसाहतवाल्याना मधल्या डोंगरामुळे लिव्हरपूल प्लेन्समध्ये आणखी पाच वर्षं पोहचता आले नाही इथून पुढे संशोधकाच्या मागे मागे वसाहत करणाऱ्यानी गाड्या, गुरेढोरे घेऊन जायचे अशी पद्धतच पडली। या नववसाहतवाल्यांचे जीवन धकाधकीचे व कष्टाचे होते त्यांना पुष्कळ जमीन व्यापता यायची पण त्यावर त्याना कायदेशीर हक्क सागता येत नव्हता सुसस्कृत समाजापासून त्यांना फार लाब राहावे लागे. नित्योपयोगी सामान आणायला आणि बाजारामध्ये लोकर विक्रीसाठी पोहचावयाला त्याना झाडाझुडूपातून रस्ता काढत जावे लागे त्याच्या राहण्याच्या जागा म्हणजे जरा सुधार-लेल्या झोपड्याच होत्या। तेथे कोणत्याच सुखसोयी नव्हत्या त्यांना अन्न मुबलक मिळे पण एकाच प्रकारचे. त्याच्या मेंढ्या अनेकदा रानात चुकत डिंगो नावाचा लाडग्यासारखा प्राणी मेंढ्यांवर हल्ला करी किंवा स्थानिक रहिवासी त्या पळवत.

तेथील आदिवासींच्या परंपरागत भूमीवर वसाहतवाल्यांनी हे आक्रमणच केले होते. आदिवासींनी या आक्रमणाचा निष्फळ व प्रखर विरोध केला अनेकदा ते छापे मारून वसाहतवाल्यांपैकी काहींना ठार करत असत इतक्या अडचणी असूनही वसाहत-वाल्यांचा लोंढा पश्चिमेकडे जातच राहिला. या लोंढ्याचे खरे कारण इंग्लंडमध्ये होते १८०० पासून १८५० पर्यंत ५० वर्षांत इंग्लंडची लोकसंख्या दुप्पट झाली होती औद्योगिक क्रांतीमुळे नवे नवे शोध लागत होते अनेक मजूर बेकार होत होते इंग्लंड-मध्ये बेकारीत दिवस काढण्यापेक्षा ऑस्ट्रेलियातील धोके पत्करूनही जमीन मिळवायला लोक उत्सुक होते हे लोंढे थांबवणे आपल्या शक्तीबाहेरचे आहे हे राज्यपाल मॅक्वायरेला चांगले माहीत होते.

सिडनीमध्ये राज्यपालापुढे निराळेच प्रश्न उभे होते ऑस्ट्रे-लियात इंग्लंडमधील दीर्घ मुदतीचे कैदी पाठवत कैदेची मुदत संपल्यानंतर त्यांना स्वतंत्र नागरिकाचे सर्व हक्क मिळाले पाहिजेत असे राज्यपालाचे मत होते मुक्त गुन्हेगारांपैकी अनेकजण त्याचे मित्र होते त्याचे हे मत स्थलांतर करून येणारे स्वतंत्र नागरिक व व्यापारी यांना मान्य नव्हते त्यांनी लंडनमधील आपल्या वजनदार मित्रांकडे याबद्दल तक्रार करायला सुरुवात केली. राज्यपाल मॅक्वायरेला इमारती बांधण्याची फार हौस होती. नव्या वसाहतीला त्यांची जरूर होतीच त्याने अनेक चर्च, हॉस्पिटल, पूल, सैनिक ठाणी व तुरुंग बांधले पण मॅक्वायरे फार खर्च करतो अशी तक्रार येऊ लागली त्याच्या कारभाराची चौकशी करायला एक समिती नेमण्यात आली या समितीने प्रतिकूल अहवाल दिला शेवटी सन १८२१ मध्ये मॅक्वायरे व्हॅन डायमेन बेटावर सफर करीत असतानाच त्याला परत बोलाव-

त्याचा खलिता देण्यात आला. लवकरच तो इंग्लंडला परतला. आपल्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचे त्याने जोरदार समर्थन केले त्याने दाखवून दिले की या बारा वर्षांत वसाहतीची लोकसंख्या बारा हजाराची अडतीस हजार झाली पिकाखालची जमीन चौपट झाली सरकारचा वसुल वाढला. गुराची संख्या दहापट झाली आणि पूर्वीपेक्षा लोक नीतिमान झाले. वसाहतीच्या विकासाने आता वेग घेतला होता

★

प्रकरण सहावे

# विकासाची सुरुवात

मॅक्वायरनंतर जनरल सर थॉमस ब्रिसबेन हा नवा राज्यपाल म्हणून नेमून आला त्याला राज्यकारभारापेक्षा खगोलशास्त्रात जास्त रस आहे असे लोक म्हणत पण त्याच्या चार वर्षांच्या कारकीर्दीत वसाहतींचा बराच विस्तार झाला आणि प्रगती झाली.

सन १८२३ मध्ये कॅप्टन मार्क करे, मेजर जॉन ओवेन्स आणि बुशमन जमातीचा जोनाथन वाईल्ड या तिघांनी जॉर्ज सरोवरापासून दक्षिणेकडे एक लहानशी संशोधन मोहीम काढली. या जॉर्ज सरोवराजवळच सध्याचे कॅनबेरा शहर आहे दक्षिणेकडे मुरुमब्रीघे नदीच्या पलीकडे त्यांना सुपीक जमिनीचे मोठे क्षेत्र सापडले. त्यांनी या मैदानाला 'ब्रीजबेन डाऊन्स' असे नाव दिले. पण सध्या हा प्रदेश त्याच्या पूर्वीच्या मोनॅरो या स्थानिक नावाने ओळखला जातो. याच सुमारास ॲलन कॅनिंगहॅम हा वनस्पतीशास्त्रज्ञ आपल्या चार सहकाऱ्यांसह संशोधनाला निघाला बाथर्स्ट गावापासून लिव्हरपूल मैदानाकडे जाताना ज्या पर्वतश्रेणीचा अडथळा येतो त्यातून सुलभ मार्ग शोधण्याचा त्यांचा हेतू होता. त्यांना अनेकदा माघारी वळावे लागले व अन्नपुरवठाही कमी पडला खूप कष्ट घेतल्यानंतर त्याने शेवटी एक खिंड शोधून

काढली त्या खिंडीला त्याने 'पंडोरा पास' असे नाव ठेवले. मेंढ्या व गुरे पाळणारे लोक नेहमीप्रमाणे या संशोधकाच्या मागे मागे होतेच एका वर्षातच नव्याने सापडलेल्या या मैदानात मेंढ्या व गुरे चरताना दिसू लागली

त्याच वर्षी सर्व्हेअर जनरल जॉन ऑक्स्ले याला मेरमेड या लहान बोटीतून उत्तरेकडे पाठवण्यात आले कर्टीस बंदर आणि मोरेटन उपसागर येथे गुन्हेगाराची वसाहत करता येईल काय याबाबत अहवाल द्यायला त्याला सांगितले होते कर्टीस बंदर अयोग्य वाटले म्हणून ताबडतोब त्याने नाकारले मग ऑक्स्लेने आपले संशोधन मोरेटन उपसागराभोवती केंद्रित केले. तेथे त्याला फुटलेल्या जहाजातून वाचलेले दोन गुन्हेगार भेटले. ते दोघेजण तेथील आदिवासी जमातीत कित्येक महिने राहत होते त्यांनी ऑक्स्लेला जवळच्याच एका मोठ्या नदीची माहिती दिली. ऑक्स्लेने त्या नदीत ८० किलोमीटर्सपर्यंत बोट चालवली आणि त्या नदीला राज्यपाल 'ब्रिस्बेन'चे नाव दिले. तो १८२४ मध्ये परतला नंतर रेड क्लिफ येथे गुन्हेगाराची वसाहत स्थापन करण्यात आली पण लवकरच ती तेथून सध्याचे ब्रिस्बेन शहर जेथे आहे तेथे नेण्यात आली. यानंतर ऑक्स्लेची प्रकृती बिघडली आणि तो १८२८ मध्ये मृत्यू पावला त्याच्यानंतर सर्व्हेअर जनरलच्या जागेवर मेजर थॉमस लिव्हिंगस्टन मिचेल याची नेमणूक झाली

मध्यंतरी हॅमिल्टन ह्यूम हा तरुण वसाहतवाला आणि विल्यम हॉवेल हा निवृत्त नौदल अधिकारी या दोघांनी ऑक्टोबर १८२४ मध्ये दक्षिणेकडे एक मोहीम काढली जॉर्ज सरोवराजवळ ह्यूम ठाण्यापासून ते दक्षिणेकडे निघाले. बास सामुद्रधुनीवरील वेस्टर्न

पोर्ट येथे जायचे त्यानी ठरविले होते निघाल्यापासूनच त्या दोघात भाडणे सुरू झाली कोणत्या मार्गाने जायचे याबद्दल त्या दोघात एकमत होईना प्रथम त्याना मुरुमबिघे नदी आडवी आली तिला पूर आला होता. मग या दोघानी आपल्या गाडीला ताडपत्री बाधली व गाडीची होडी बनवून त्यातून त्यानी नदी ओलाडली पुढचा प्रदेश खाचखळग्याचा होता पण तेथे गवत चागले उगवले होते आणि कुरण म्हणून ती जमीन उपयोगी पडण्यासारखी होती पुढे गेल्यावर त्यांना एक भव्य पर्वतराजी दिसली त्या पर्वताच्या शिखरावर बर्फ चमकत होते आश्चर्यचकित होऊन ते पाहतच राहिले निसर्गाच्या त्या भव्य दर्शनामुळे आपली भाडणे ते विसरले ऑस्ट्रेलियन आल्प्स पर्वताचे दर्शन घेणारे हे पहिले गोरे लोक होते या पर्वतराजीला त्यानी एका अगाला ठेवून प्रवास सुरू केला त्याना पुन्हा एक मोठी नदी ओलाडावी लागली या नदीला ह्यूमने आपल्या वडिलाचे नाव ठेवले. आता त्याची पुन्हा भाडणे सुरू झाली भाडता-भाडता त्या दोघांनी अलग व्हायचे ठरवले दोघाजवळ स्वैपाकाचे एकच भांडे होते. ते कोणी घ्यायचे या वादात दोघांनी त्या भाड्याशी ओढाताण सुरू केली ! आणि त्यातच ते फुटले ! पण शेवटी त्याना शहाणपण सुचले आणि त्यानी एकत्र प्रवास सुरू केला. त्यानी ओवेन्स आणि गोलबर्न नद्या ओलाडल्या आणि नतर ते ज्याला वेस्टर्न पोर्ट समजत होते तेथे पोहोचले पण हॉवेलचा अदाज इतका चुकला होता की ते पोर्ट फिलिपजवळच्या भावी गेलाँग शहराच्या जवळ पोहोचले होते आपली चूक होऊन आपण 'वेस्टर्न पोर्ट'ला पोहोचलो नाही हे त्याना बरेच वर्षे कळलेच नाही ! नतर ह्यूमला आपली चूक कळली पण आपल्याला ते सर्व आधीच माहीत

होते असा त्याने दावा केला !



राज्यपाल डार्लिंग

लिव्हरपूल प्लेन्सकडे जाणारी खिंड शोधणाऱ्या कॅनिंगहॅमने १८२७ मध्ये पुन्हा संशोधन सुरू केले लिव्हरपूल प्लेन्समधून तो उत्तरेकडे निघाला. त्याने ग्वायडिर मॅकिनटायर आणि कोंडामाईन या पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या शोधून काढल्या त्या नद्यांच्या पलीकडे त्याला एक विस्तृत मैदान दिसले. कुरणासाठी व गुरे चारायला ते आदर्श मैदान होते या मैदानाला त्याने 'डार्लिंग डाऊन्स' असे आपल्या नव्या राज्यपालाचे नाव दिले. ब्रिस्बेननंतर सर रॉल्फ डार्लिंग हा राज्यपालपदावर आला होता हे मैदान मोरेटन उपसागराच्या पश्चिमेकडे होते पण मैदान व उपसागर यामध्ये एक पर्वतश्रेणी होती त्या पर्वतश्रेणीतून किनाऱ्या-

कडे जाण्याचा मार्ग शोधण्याचा त्यानें प्रयत्न केला पण तो अयशस्वी झाला नेहमीप्रमाणेच त्याच्या मागोमाग मेंढपाळ या नव्या मैदानात येऊन मेंढ्या चारू लागले होतेच

कनिंगहॅमने अनेक नव्या नद्या शोधल्या होत्या. तेव्हा खंडाच्या अंतर्भागात भूमिवेष्टित समुद्र असावा असे अनेकाना वाटू लागले. म्हणून हा समुद्र आहे की नाही हे शोधण्यासाठी डिसेंबर १८२८ मध्ये कॅप्टन चार्ल्स स्टुर्ट आणि ह्यूम हे दोघे मॅक्वायरे नदीवरील वेलिंग्टन येथून निघाले ज्याप्रमाणे दहा वर्षांपूर्वी ऑक्स्ले मॅक्वायरे नदीच्या दलदलीतून बाहेर पडू शकला नाही त्याप्रमाणेच स्टुर्ट आणि ह्यूम याचा मार्ग दलदलीने अडवला मग त्याने दलदल एका बाजूला ठेवून पुढे प्रवास सुरू केला त्याना एक मोठी नदी सापडली या नदीला त्याने राज्यपालाचे 'डार्लिंग' हे नाव ठेवले मॅक्वायरे नदी या नदीला येऊन मिळत होती ते वर्ष अवर्षणाचे होते त्यामुळे डार्लिंग नदी म्हणजे डबक्यांची मालिका झाली होती तरीही स्टुर्ट तिच्याकाठाने ९६ किलोमीटर्स गेला शेवटी त्याला हा प्रयत्न सोडून द्यावा लागला

१८२९ च्या शेवटी शेवटी स्टुर्टला मुरुमबिघे नदीचा प्रवाह निश्चित करण्यासाठी एक मोहीम काढण्याची आज्ञा झाली तो मुरुमबिघे आणि लाचलान नदीच्या संगमापर्यंत गेला तेथे त्याने एक ठाणे स्थापले, तेथे अन्नपुरवठा व सामुग्री ठेवली आणि मोहिमे-तील काही लोकाना तेथेच थांबायला सांगितले. त्याने एक मासेमारीची होडी सुटी करून आणली होती, ती त्याने जोडली, व या होडीत बसून सात सहकारी बरोबर घेऊन तो नदीतून निघाला. होडीला त्याने एक सांगाडा जोडला व त्यावर अन्न-सामुग्री ठेवली. दोनच दिवसानी हा सांगाडा पाण्यात बुडलेल्या



संशोधक स्टुर्ट

ओढण्याला अडकला व बुडला त्याच्यावरची अन्नसामुग्री होडीत घेण्यात आली. पण भिजल्यामुळे त्यातील बरीचशी खराब झाली. काही दिवसांनतर त्यांच्या बोटीने एका नवीनच व विस्तीर्ण नदीत प्रवेश केला त्यानी या नदीचे नाव मरे असे ठेवले. इग्लड-मधील मुत्सद्दी मरे याच्या स्मरणार्थ ते ठेवण्यात आले वास्तविक मरे ही नदी ह्यूम नदीचाच पुढचा भाग होती पण ते याना माहीत नव्हते

नदीच्या किनाऱ्याच्या प्रदेशात आदिवासीची खूपच वस्ती होती स्टुर्ट आणि त्याचे साथीदार यांनी आदिवासीशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला. पण अनेकदा त्याच्या जीवाला धोकाही निर्माण झाला एका प्रसगी शेकडो आदिवासी वाळूच्या पुळणी-

वर जमले होते, आणि आपले भाले नाचवत रागाने ओरडत होते. बोट त्यांच्या तडाख्यात सापडणार होती झगडा अटळ होता पण स्टुर्टने मैत्री केलेल्या एका आदिवासीने नदीत सूर मारला आणि तो पोहत वाळूच्या पुळणीपर्यंत गेला त्याने त्या संतापलेल्या आदिवासींना समजावले. आणि त्याने हत्यारे बाजूला ठेवली हे सगळे नाटच जिथे घडले तेथे जवळच मरे नदीला दुसरी एक भव्य व सुदर नदी येऊन मिळाली होती ही नदी म्हणजे डार्लिंग नदीच असावी असा अचूक अदाज स्टुर्टने केला कारण वर्षापूर्वीच त्याने डार्लिंग नदीचा उगमाकडील भाग शोधला होता. काही दिवसांनतर मरे नदी दक्षिणेकडे वळलेली त्यांना आढळली ते नदीतून जातच होते शेवटी नऊ फेब्रुवारी १८३० रोजी हे सशोधक नदीच्या मुखाशी पोहोचले समुद्र व नदीचे मुख यामध्ये वाळूच्या टेकड्या आल्यामुळे मुखाशी एक उथळ सरोवर तयार झालेले होते स्टुर्टने या सरोवराला अलेक्झांड्रिना ' असे नाव दिले त्यावेळी अलेक्झांड्रिना ही इग्लडची राजकन्या होती तीच पुढे महाराणी व्हिक्टोरिया झाली

आता त्याना आलेल्या रस्त्यानेच परत फिरायचे होते. वेगवान प्रवाहाच्या विरुद्ध वल्ही मारायची असल्याने त्याचे काम कष्टाचे व कठीण होते. शिवाय त्याच्याजवळ अन्नसाठाही सपत आला होता. तो सपण्यापूर्वी त्याना परतणे भाग होते. नाही तर उपास-मारीने मरावे लागले असते. प्राणावरच बेतल्यामुळे ते पहाटे-पासून अधार पडेपर्यंत सतत न थाबता वल्ही मारीत अति-श्रमाने झोप लागली तरी झोपेतही हात वल्ही मारतच राहत ! मुरुमबिघे नदीपासून अलेक्झाड्रिना ' सरोवरापर्यंत जायला त्याना २६ दिवस लागले होते. पण वेगवान प्रवाहाच्या विरुद्ध

वल्हवूनही त्याचा परतीचा प्रवास तेवीस दिवसांत संपला. मुरुमबिघे नदीत ते येतात तोच त्या नदीला पूर आलेला त्यांना दिसला. तिच्या प्रवाहाचा वेग आणखी वाढला होता मागे अन्नसामुग्रीसह ठेवलेल्या ठाण्याजवळ पोहोचायला त्याना आणखी सहा दिवस लागले. पण तेथे उतरून पाहतात तो काय? मागे ठेवलेले साथीदार अन्नसामुग्री घेऊन पसार झाले होते! पुन ते बोटीत बसले व मुरुमबिघे नदीतून प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वल्हीमारीत जाऊ लागले अशा अर्धपोटी अवस्थेत त्यांनी १७ दिवस प्रवास केला स्टुर्टचे नीतीधैर्य व धाडस अजोड असल्यानेच हे शक्य झाले आता मात्र त्याच्याच्याने अजिबात पुढे जाववेना, माणसाच्या वस्तीचे शेवटचे ठिकाण– वाटाबडगेरी– ही वस्ती तेथून १४४ किलोमीटर्स दूर होती त्याच्या जथ्थ्यातील दोन माणसे या वस्तीकडे पायी जायला निघाली स्टुर्ट आणि त्याचे सहकारी वाट पाहत मागेच थावले सहा दिवसानी ते दोघेजण घोडे व अन्नसाठा घेऊन परतले त्यावेळी स्टुर्टजवळचा अन्नाचा शेवटचा कण संपला होता मग सर्व जथा हळूहळू मुक्काम करत सिडनीला पोहोचला. मोहिमेतले सर्व लोक जिवंत परत आले होते पण ते कमालीचे अशक्त झाले होते स्टुर्ट तर आंधळा झाला होता!

स्टुर्टच्या या मोहिमेमुळे भौगोलिक ज्ञानात बरीच भर पडली. सर्वांनीच स्टुर्टची प्रशंसा केली फक्त सर्व्हेअर जनरल मेजर मिचेल वाकडे तोंड करून बसला होता त्याला असे वाटत होते की सर्व संशोधन मोहिमा सर्व्हेअर जनरलच्याच नेतृत्वाखाली निघाव्या किंवा निदान त्याचे श्रेय व त्याबद्दलचे मानसन्मान खातेप्रमुख म्हणून त्यालाच मिळावेत. त्याचे हे म्हणणे राज्यपाल

डार्लिंगने मान्य केले नाही मिचेल उद्धट व अतिमहत्त्वाकांक्षी आहे हे डार्लिंगला चांगले माहीत होते मिचेलने संशोधनाच्या फंदात न पडता खात्याच्या कारकुनी कामात लक्ष घालावे व त्यातच मन रमवावे असे डार्लिंगचे मत होते.

परंतु राज्यपाल डार्लिंगला १८३१ मध्ये परत बोलावण्यात आले तो गेल्यावर मधल्या काळासाठी कर्नल लिंडसे तात्पुरता राज्यपाल म्हणून काम पाहत होता नवा राज्यपाल सर रिचर्ड ब्रूक याला पोचायला सहा आठवडे अवकाश होता या मधल्या काळात मिचेलने तात्पुरत्या राज्यपालाकडून नव्या संशोधन मोहिमेवर जाण्याची परवानगी मिळविली. स्थानिक रहिवाशांनी माहिती दिली होती की उत्तरेकडे एक मोठी न ी आहे. स्थानिक लोक तिला किडूर ' या नावाने ओळखतात ती उत्तरेकडे वाहत जाऊन कारपेंटारियाच्या आखाताला मिळते या नदीचा शोध घ्यायला मिचेल निघाला या नदीच्या अस्तित्वाची गप्प एका पळालेल्या कैद्याने उठविली होती आणि तिथवर आपण गेल्याचा दावा केला होता त्यावर विश्वास ठेवून मिचेल नोव्हेंबर १८३१ मध्ये आपल्या बरोबर १७ जण घेऊन निघाला वास्तविक अशी नदी अस्तित्वात नव्हती. मिचेलने मॅकिनटायर ही डार्लिंग नदीची उपनदी शोधून काढली. जथ्यातील दोन माणसे आदिवासींनी मारून टाकली व बरीचशी अन्नसामुग्रीही चोरली दोन महिन्यांनी मिचेल सिडनीला परतला. या मोहिमेत काहीच साध्य झाले नव्हते !

काही काळ संशोधन मोहीमा बंद पडल्या मग मेंढपाळच आपले मेंढ्याचे कळप व गुरेढोरे घेऊन अज्ञात प्रदेशात घुसू लागले मग १८३५ मध्ये मिचेल पुन्हा एकदा संशोधनाला निघाला यावेळी

डार्लिंग नदीचा प्रवाह तो निश्चित ठरवणार होता. डार्लिंग नदी मरे नदीला मिळते हा स्टुर्टचा दावा त्याला खोटा ठरवायचा होता. त्याच्याबरोबर संशोधक कनिंगहॅमचा भाऊ रिचर्ड कनिंगहॅम होता. तो एकदा मागे रेंगाळला. तेव्हा त्याचा आदिवासींनी खून केला. मिचेलने आपली मोहीम चालूच ठेवली. तो डार्लिंग नदीवर पोहोचला आणि किनाऱ्या-किनाऱ्याने ४८० किलोमीटर गेला. इतका प्रवास केल्यानंतर स्टुर्टचेच म्हणणे बरोबर आहे हे त्याला समजले. त्या भागातील आदिवासी क्रूर होते आणि संख्येनेही विपुल प्रमाणात होते. एका चकमकीत स्त्रिया-मुलांसह बरेच आदिवासी मारले गेले. ते आपल्यावर सूड उगवतील या भीतीने मिचेल परत फिरला आणि लवकरच सिडनेला पोहोचला.

मार्च १८३६ मध्ये मिचेल आपल्या तिसऱ्या मोहिमेवर निघाला. त्याच्याबरोबर चोवीस लोक होते व साहित्यसामुग्री भरपूर होती. यावेळी त्याला डार्लिंग नदीच्या प्रवाहाची संपूर्ण पाहणी करायला सांगितले होते. मागच्या प्रवासात तो जेथे पोहोचला होता त्या मेनिन्दे या गावापासून सुरुवात करून मरे नदीतून त्याला प्रवाहाच्या वरच्या दिशेला येण्याविषयी आज्ञा दिल्या होत्या. मिचेलने स्वतःच्या सोईप्रमाणे या आज्ञा पाळल्या.

तो प्रथम लाचलान नदीतून प्रवाहाच्या दिशेने जाऊ लागला. ती नदी मुरुमबिधे नदीला जेथे मिळते तेथपर्यंत तो गेला. यावेळी त्याला भेटलेले आदिवासी शांत व मैत्री करणारे होते. अनेकजण त्याच्या मोहीमेतही सामील झाले. त्यापैकी पिपर नावाचा आदिवासी शेवटपर्यंत त्याचे बरोबर राहिला. तसेच टॉमी नावाचे दोन आदिवासी होते. त्याना पहिला टॉमी व दुसरा टॉमी अशी नावे ठेवली. तूरदूरी नावाची आदिवासी स्त्री आपली चार वर्षांची

मुलगी बालनडेला हिला बरोबर घेऊन त्यांच्या मोहीमेत सामील झाली.

मिचेल त्याला दिलेल्या आज्ञा न पाळता स्टुर्ट ज्या मार्गाने गेला त्याच मार्गाने मुरूमबिघे व मरे नदीतून निघाला. तेथून मरे आणि डार्लिंग नदीच्या संगमापर्यंत पोहोचला आपले संशोधन पूर्ण करण्यासाठी त्याने या संगमापासून डार्लिंग नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने मेनिन्देपर्यंत जायला हवे होते. पण स्टुर्टचे म्हणणे बरोबर आहे असे नोंदवून हे काम अर्धेच सोडून दिले पुन्हा एकदा आदिवासींशी त्याच्या चकमकी झाल्या व बरेचजण ठार झाले. मिचेलचे म्हणणे असे होते की मेनिन्दे येथील मागच्या चकमकीतील आदिवासी सूड घ्यायला आले होते. पण हे अंतर ३२० किलोमीटर्सचे होते मिचेल आला आहे हे कळण्याची शक्यता नसताना ते आदिवासी इतक्या लांब येणे संभवनीय नव्हते !

मग मिचेलने मरे नदी ओलांडली आणि तो तिच्या दक्षिण तीरावर आला तेथून तो प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊ लागला. आणि 'स्वान हिल'पर्यंत पोहोचला येथे त्याने नदीचा किनारा सोडला आणि तो दक्षिण–पश्चिमेच्या दिशेने निघाला. हा प्रदेश सध्या मध्य व पश्चिम व्हिक्टोरिया प्रांतात आहे. या प्रदेशात त्याला सुपीक जमीन आढळली आपल्या दैनंदिनीत त्याने त्या सुपीकपणाचे वर्णन खूपच उत्साहाने लिहून ठेवले. या प्रदेशाला 'ऑस्ट्रेलिया फेलिक्स' असे नाव दिले. या प्रवासात त्याने अनेक बारक्या नद्या ओलांडल्या शेवटी दक्षिणेकडे वळणाऱ्या एका नदीच्या किनाऱ्याने तो निघाला त्या नदीला त्याने 'ग्लेनेल्ग' असे नाव दिले या नदीकिनाऱ्याने तो डिस्कव्हरी' उपसागरापर्यंत पोहोचला येथून त्याने उत्तर–पूर्वेच्या दिशेने परतायचे

ठरविले.

त्या दिशेने मिचेल काही अंतर जातो तोच त्यांना किनाऱ्याजवळ पोर्टलंड येथे एक उत्तम वसाहत स्थापन झालेली दिसली. ती पाहून मिचेलला आश्चर्य वाटले ही वसाहत एडवर्ड हेंटी आणि फँक हेन्टी या भावांनी दोन वर्षांपूर्वी स्थापन केली होती. त्यांनी सांगितले की 'व्हॅन डायमेन' बेटातून सामुद्रधुनी ओलांडून आम्ही गुरेढोरे व मेंढया आणतो आणि या भागातील व्हेल मासे पकडणाऱ्या कोळ्यांबरोबर व्यापार करतो.'

म्हणजेच ज्या प्रदेशाचे संशोधन करायला मिचेल निघाला होता तेथे इतरांनी वस्ती करून व्यापारही सुरू केला होता ! फक्त त्यांना वसाहतीच्या शासनाकडून जमिनीचे अधिकृत हक्क मिळाले नव्हते एवढेच ! खरे म्हणजे वसाहतीच्या शासनालाही ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर हक्क सांगता येत नव्हता कारण ती भूमी खरे पाहता ऑस्ट्रेलियन आदिवासींची होती !

मिचेल पुढे गेला तेव्हा माऊंट मॅकेडॉन पर्वतापासून थेट पोर्ट फिलिपपर्यंतच्या प्रदेशात अनेकांनी वसाहत केली आहे असे त्याला आढळले सध्या ज्या जागेवर मेलबोर्न शहर उभे आहे तेथे त्याला तंबू व झोपडया उभारलेल्या दिसल्या तीस पस्तीस हजार मेंढयांही या भागात चरत होत्या ! म्हणजे ज्या भागाचे संशोधन करायला मिचेल आला होता तेथे अनधिकृत वसाहतवाल्यांनी व मेंढपाळांनी जमिनीच्या विकासाची कामेही सुरू केली होती

उत्तर पूर्वेच्या परतीच्या वाटेवर, आणखी बराच सुपीक प्रदेश आहे असे मिचेलला आढळले बेनाला येथे एक नदी पोहोणाऱ्या घोडयावर बसून ओलांडताना जथ्थ्यातील एक मनुष्य बुडून मेला. तुरंदरी ही आदिवासी स्त्री मुरुमबिघे नदी भेटेपर्यंत त्यांच्या

जथ्यात होती तेथे तिने स्थानिक टोळीप्रमुखाला पसंत केले आणि ती जथ्याला सोडून निघून गेली. तिने आपली मुलगी बालनडेला हिला मात्र मिचेलजवळच ठेवले मिचेलला तिचा लळा लागला होता ! मिचेलनें तिला आपल्याबरोबर सिडनीला नेले व आपल्या इतर मुलाबरोबरच वाढविले. तिचा पुढचा इतिहास मात्र अज्ञात आहे

सिडनीला परतल्यावर मिचेलचे वीरोचित स्वागत झाले. ही त्याची मोहीम यशस्वी झाली होती ऑस्ट्रेलियातील अतिशय उत्तम सुपीक जमीन त्याला मोठ्या प्रमाणात सापडली होती अर्थात त्या भागात पोर्ट फिलिपपासून उत्तर-पश्चिमेच्या दिशेने अनधिकृत मेंढपाळ व वसाहतवाले फारच थोड्या काळात पसरले. आणि त्यानी ही सर्व सुपीक जमीन बळकावली.

सर्वच नवीन संशोधन व वसाहतीचा विस्तार जमिनीवरून झाला असे नाही. ऑस्ट्रेलियाच्या उत्तर किनाऱ्याचे संशोधन कॅप्टन पी पी किंग याने १८१८ मध्येच केले होते तो माजी राज्यपाल किंग याचा मुलगा होता त्यानेच पोर्ट एसिंग्टन ही जागा ईस्ट इंडीज बेटाशी व्यापार वाढवायला योग्य आहे अशी शिफारस केली होती. १८२४ मध्ये कॅप्टन जे ब्रेमर याला पोर्ट एसिंग्टन येथे वसाहत करण्यासाठी पाठविण्यात आले त्याचेबरोबर 'तमार' हे आरमारी जहाज, सैनिक तुकडी व मजुरी करण्यासाठी गुन्हेगार कैदी होते त्याने पोर्ट एसिंग्टन ऐवजी मेल्व्हिले बेटावरील एक ठिकाण निवडले, व त्या जागेला 'पोर्ट डडास' असे नाव ठेवले. व तेथे वसाहत उभारणे सुरू केले पण तेथे रोगामुळे, आदिवासींच्या हल्ल्यामुळे व मलायातील चाच्याच्या हल्ल्यामध्ये पुष्कळच लोक मारले गेले. तेव्हा १८२७ मध्ये राज्यपाल डार्लिंगने

कॅप्टन जेम्स स्टर्लिंग याला मुख्य भूमीवरील रायफल उपसागराजवळ दुसरी वसाहत स्थापण्यासाठी पाठवले. पण ही वसाहतसुद्धा यशस्वी ठरली नाही आणि ती १८२९ मध्ये सोडून देण्यात आली

१८२६ मध्ये 'ॲस्ट्रोलोब' हे फ्रेंच जहाज ऑस्ट्रेलियाच्या जवळच्या समुद्रात आढळून आले त्यामुळे फ्रेंचांचा हेतू राहिलेला अज्ञात प्रदेश बळकावण्याचा आहे की काय अशी साधार भीती इंग्रजांना वाटू लागली तेव्हा राज्यपाल डार्लिंगने घाई करून वेस्टर्न पोर्ट आणि किंग जॉर्ज उपसागरातील अल्बनी येथे गुन्हेगारांच्या वसाहती तातडीने उभारण्याचा आदेश दिला वेस्टर्न पोर्ट ही जागा योग्य नसल्यामुळे ती वसाहत लवकरच सोडून देण्यात आली आणि अल्बनी येथील गुन्हेगार दुसरीकडे पाठवून ती स्वतंत्र नागरिकांची वसाहत बनवण्यात आली

★

प्रकरण सातवे

# नवीन वसाहती

पश्चिम ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण समुद्रकिनारा डचानी दोनशे वर्षांपूर्वीच शोधला होता आणि तेथील नकाशेही तयार केले होते. पण या किनाऱ्यावर डचापैकी कोणीही वसाहत केली नव्हती. म्हणून अल्बनी ही पश्चिम किनाऱ्यावरची पहिलीच वसाहत म्हटली पाहिजे

अल्बनी येथील वसाहत स्थापून वर्ष होण्याच्या आतच कॅप्टन जेम्स स्टर्लिग सक्सेस ' हे आरमारी जहाज घेऊन तेथे आला. राज्यपाल डार्लिगच्या सूचनेवरून अल्बनीच्या उत्तरेला ४८० किलोमीटरवर त्याने स्वान नदीच्या प्रदेशाची पाहणी केली तेथे वसाहतीसाठी उत्तम जागा आहे हे डार्लिगच्या दूरदृष्टीने हेरले होते पूर्वी डच संशोधक वार्लिमग यानेही हा प्रदेश वसाहतीला उत्तम असल्याबद्दल अहवाल दिला होताच । आता कॅप्टन स्टर्लिग-या प्रदेशाबद्दल फारच उत्साह व आशा वाटली. त्याने राज्यपाल डार्लिगला आपला अहवाल सादर केला आणि वसाहत स्थापण्याची शिफारस केली राज्यपाल डार्लिगच्या पाठिंब्याने तो इंग्लंडला गेला आणि त्याने ' स्वान ' नदीच्या प्रदेशात नवी वसाहत स्थापावी व या वसाहतीत गुन्हेगार मुळीच पाठवू नयेत असा सरकारकडे

आग्रह धरला इग्लडमधील सरकार दोन डगरीवर हात ठेवून होते एकीकडे हा प्रदेश फ्रेंच बळकावतील ही भीती वाटत होती पण वसाहत स्थापायला जो खर्च येईल तो करण्याची सरकारची तयारी होत नव्हती ऑस्ट्रेलिया खडाचा पश्चिम भाग त्या मानाने ओसाड व नापीकच होता पण त्या भागात दुसऱ्या एका सत्तेने वसाहत स्थापावी हे इग्लडला मान्य होण्यासारखे नव्हते अर्थातच वसाहत स्थापन करण्याचा विचार पक्का झाला केप ऑफ गुड होपजवळ असलेल्या कॅप्टन चार्ल्स फ्रीमॅन्टलला 'चॅलेंजर' हे आरमारी जहाज देऊन पाठवण्यात आले त्याने बदरासाठी एक जागा निवडली, व तेथे तो २ मे रोजी उतरला ऑस्ट्रेलिया खडाचा सपूर्ण पश्चिम भाग इग्लडसाठी आपण ताब्यात घेत आहोत अशी घोषणा त्याने त्या दिवशी केली. त्या बंदराला नतर 'फ्रीमँटल' याचेच नाव देण्यात आले

तरीही सरकारला नव्या वसाहतीवर फारच खर्च होणार ही गोष्ट खटखटत होतीच तो कमी करण्यासाठी सरकारने पंतप्रधान पील याचा पुतण्या थॉमस पील याच्या कपनीशी ऑस्ट्रेलियात वसाहत स्थापन करण्याविषयी बोलणी केली. कपनीने ऑस्ट्रेलियात चाळीस लाख एकर जमीन दर एकराला दीड शिलिंग म्हणजे जवळ जवळ दीड रुपाया या दराने मागितली स्वान नदीच्या काठी या जमिनीवर कपनी दहा हजार लोकाची वसाहत करायला तयार होती वसाहतीसाठी लागणारी गुरे-ढोरे व इतर सामुग्री कपनीनेच पुरवायची होती सरकारने दहा लाख एकरच जमीन देऊ केली तेव्हा कपनीने सुरुवातीस सरकारला नकार दिला पण नतर पीलने सरकारी अटी मान्य केल्या आणि वसा-

हतीची योजना आकार घेऊ लागली स्टर्लिगला उपराज्यपाल नेमण्यात आले आणि त्याला थोडेसे मदतनीस देण्यात आले

पहिले वसाहतवाले स्वान नदीकिनारी जून १८२९ मध्ये पोहोचले आणि तात्पुरते 'फ्रिमँटल' येथे राहिले. नव्या वसाहतीच्या राजधानीसाठी स्टर्लिग चागली जागा शोधत होता स्वान नदीच्या मुखापासून दहा मैल अतर्भागात असलेली जागा त्याला पसत पडली १२ ऑगस्ट १८२९ रोजी राजधानी वसवण्याच्या कामाचा मूहूर्त झाला स्टर्लिगच्या तरुण पत्नीने एक झाड पाडण्यासाठी मुहूर्ताचा घाव घातला या नव्या राजधानीला इग्लडमधीलच 'पर्थ' या गावाचे नाव देण्यात आले त्यावेळचा वसाहतमत्री सर जॉर्ज मरे इग्लडमधील या पर्थ गावामधूनच ब्रिटिश लोकसभेवर निवडून आला होता. म्हणूनच हे नाव निवडण्यात आले

वसाहत करणाऱ्या कपनीचा नेता थॉमस पील् भव्य स्वप्ने पाहणारा होता पण व्यवहारी शासक नव्हता। त्यामुळे सरकारच्या अटी त्याला पूर्ण करता आल्या नाहीत. वसाहतवाल्यानाही कसलाच अनुभव नव्हता. सुपीक जमीन एका जागीच नसून विखुरलेली होती त्यामुळे शेतजमिनी लाबलाब पसरल्या रस्ते नव्हते त्यामुळे वसाहतवाल्याचे एकमेकांशी काहीच संबध राहत नसत सुरुवातीच्या काळात अडचणी फारच होत्या मजूरीसाठी गुन्हेगार आणायचे नाहीत असे ठरविले होते स्वतंत्रपणे मजुरी करणारे फार थोडे लोक होते व त्याचे दर-दामही खूपच होते अनेक वसाहतवाल्याना आपल्या जमिनीत झाडें तोडून साफ करून घेणेही जमले नाही. वसाहतीत स्वत.पुरते धान्य तयार होत होते पण जास्त उत्पादन झाले असते तरी त्याच्या विक्रीसाठी

बाजार नव्हता व गिऱ्हाईकही नव्हते. स्थानिक रहिवासीही खूप मोठ्या प्रमाणावर होते. आणि वस्तुत त्यांच्या मालकीची असलेली ही जमीन उपटसुभ ब्रिटिश सरकारने तिसऱ्याच लोकांना विकून टाकली होती ! त्यामुळे त्यांच्या शिकारीत अडथळा येऊ लागला जीवन पद्धती विस्कळित झाली त्यांनी वसाहतवाल्या-वर हल्ले करायला सुरू केले, व अनेकांचे खून पाडले. तेव्ह उप-राज्यपाल स्टर्लिंगने या आदिवासी विरुद्ध मोहीम काढली तोफा बंदुकीपुढे आदिवासींचे भाले टिकणे शक्य नव्हतेच ! या सर्व मोहिमा आदिवासींच्या कत्तल मोहिमाच ठरल्या ! उदा आक्टोबर १८३४ मध्ये वसाहतीचे चौवीस सैनिक व आदिवासी यांच्यात पिंजारा येथे एक लढाई झाली त्याची ही आकडेवारी पाहा वसा-हतीच्या सैनिकांपैकी एक सैनिक ठार झाला आणि पन्नास आदि-वासी त्यांनी मारले

वसाहतीत चांगले घबाड हाती लागेल या आशेने आलेल्या अनेक वसाहतवाल्यांचा भ्रमनिरास झाला नित्याच्या कट-कटीला कंटाळून अनेक वसाहतवाले पूर्व ऑस्ट्रेलियाला गेले किंवा सरळ इंग्लंडला परतले लवकरच या नव्या वसाहतीकडे वसाहत करायला येणाऱ्या लोकांचा ओघ थांबला व मधली काही वर्षे तर नवीन कोणीच आले नाही १८३० मध्ये वसाहतींची लोकसंख्या १८०० होती तर नऊ वर्षांनी ती फक्त २१५० च भरली पण ही वसाहत अयशस्वी होऊ द्यायची नाही असा स्टर्लिंगने निश्चय केला होता त्यामुळे मंद गतीने का होईना प्रगती होत राहिली पर्थ आणि फ्रिमँटल येथील वस्ती वाढू लागली व त्या शहरामध्ये कायमची वसाहत झाली गिल्डफोर्ड यॉर्क, ऑगस्टा आणि व्हॉस या नावाची नवीन गावे वसवली

गेली अलबनी येथील गुन्हेगार छावणी उठवली गेली व ते गाव नव्या वसाहतीत सामील करण्यात आले. अतभागात आणि सुपीक जमिनींचे विस्तृत पट्टे सापडले, आणि ही नवीन जमीन वसाहत-वाल्याना नाममात्र किमतीत मिळू लागली पर्थ येथे बँकेची स्थापना झाली आणि एक साप्ताहिक वर्तमानपत्रही निघू लागले. पर्थ येथून लोकर व शेतीमाल यांची निर्यात सुरू झाली विकासाच्या या प्रसववेदना तीव्र होत्या तरी परिस्थिती हळूहळू सुधारली आणि स्टर्लिंगने पश्चिम ऑस्ट्रेलिया १८३९ मध्ये सोडला तेव्हा वसाहतींचा खडतर काळ सपला होता

पूर्व ऑस्ट्रेलियामध्ये या काळापर्यंत वसाहतीच्या प्राथमिक अडचणी केव्हाच सपल्या होत्या १८२० ते ३० या काळात 'व्हॉन डायमेन' बेटावर स्वतत्र वसाहतवाले मोठ्या प्रमाणात आले. गुन्हेगाराची आवकही मोठ्या प्रमाणात होऊन त्यांच्या सक्तीच्या श्रमाचा लाभ वसाहतीला मिळाला भाडवलही आले पुढेपुढे जमीन दुर्मिळ होऊ लागली तेव्हा अनेक मेंढपाळाना नवीन कुरणाची जमीन शोधण्यासाठी बास सामुद्रधुनीच्या पलिकडे मुख्य भूमीवर जावे लागले तेथे अधिकृत सनदेशिवाय जमिनीचा कब्जा करायला बदी होती पण ती बदी कागदावरच राहिली अनेकानी मोठीमोठी कुरणे ताब्यात घेतली !

१८३५ च्या सुमारास जॉन बॅटमन हा धाडसी सैनिक बराच प्रसिद्ध व लोकप्रिय झाला होता कारण त्याने मॅथ्यू ब्रॅडी या क्रूर दरोडेखोराला धाडसाने पकडले होते जॉन बॅटमन १८३५ मध्येच वसाहतवाल्याची एक टोळी घेऊन पोर्ट फिलिप येथे उतरला नंतर त्याने यारा नदीच्या मुखाजवळ एक ठिकाण निवडले गाव वसवण्यासाठी ही आदर्श जागा होती. त्याने स्थानिक रहिवाश्याशी

मैत्री जोडली आणि त्याना काही कुऱ्हाडी पांघरुणे, आणि थोडे पीठ देऊन त्याच्याकडून त्याने महा लाख एकर उत्तम जमीन विकत घेतली म्हणजेच आदिवासींचे करारनाम्यावर अंगठे उठवून घेतले ! त्याना याबाबत काहीच कळत नव्हते ! मग तो व्हॉन डायमेन बेटावर परतला. आणि त्याने या बेकायदा जमिनीचा लाभ उठवण्यासाठी पोर्ट फिलिप असोसिएशन ही संस्था स्थापन केली जॉन बॅटमन 'व्हॉन डायमेन' बेटावर असताना पोर्ट फिलिपच्या आसमतात राहिलेल्या त्याच्या सहकाऱ्याने एक विशेष गोष्ट केली १८०३ मधील पोर्ट-फिलिप येथून काढलेली कर्नल डेव्हिड कॉलिन्स मोहीम आठवते का ? त्या मोहिमेतील विल्यम बक्ले हा गृहस्थ मोहीम सोडून जंगलात पळून गेला होता तेव्हा-पासून म्हणजे १८०३ ते १८३५ पर्यंत ३२ वर्षे तो तेथील आदि-वासींमध्येच राहिला होता ! त्या आदिवासींमधून त्याची सुटका जॉन बॅटमनच्या लोकानी केली विल्यम बक्लेचा अवतारही पाह-ण्यासारखा झाला होता ! दाढी वाढलेली होती आणि कांगारूच्या कातड्याचे वस्त्र तो नेसला होता ! आदिवासींप्रमाणेच हातात एक लाकडी करेला होता.


विल्यम बक्ले—३२ वर्षे वनवास

बत्तीस वर्षे रानात राहून तो इंग्रजी भाषाही विसरला होता! पुन्हा इंग्रजी भाषा शिकण्यासाठी त्याला काही महिने लागले!

मध्यतरी जॉन बॅटमनला एक प्रतिस्पर्धी गट उत्पन्न झाला. जॉन फॉकनर हा प्रतिस्पर्धी गटाचा नेता होता. तो शिक्षा भोगून मुक्त झालेला गुन्हेगार होता. तो प्रथम वेस्टर्न पोर्ट येथे गेला. पण ती जागा त्याला पसत पडली नाही आपला गट घेऊन तो यारा नदीवरच्च वस्तीस आला. जॉन बॅटमन आणि जॉन फॉकनर याचे हे प्रतिस्पर्धी गट यारा नदीकाठी एकमेकाविरुद्ध कुरबुरी करत वस्ती करून राहू लागले मॅकेडम पर्वतशिखरावरून सशोधक मिचेलला जे तबू व मेंढ्या दिसल्या होत्या त्या याच दोन गटांच्या वसाहती होत्या.

यारा नदी आणि पोर्ट फिलिपच्या आसपासच्या या प्रदेशात उत्तम जमीन उपलब्ध आहे ही बातमी वणव्यासारखी पसरली लवकरच वसाहतवाल्यांचा व त्याच्यासह गुराढोरांचा अविरत ओघ व्हॅन डायमेन बेटापासून या प्रदेशाकडे वाहू लागला. ठिक-ठिकाणी झोपड्या दिसू लागल्या. आणि मेंढपाळ व शेतकरी पश्चिमेकडे व उत्तर पश्चिमेकडे पसरू लागले. या प्रदेशात जमीन अनधिकृतपणे बळकावली जात आहे ही बातमी सिडनी येथे पोहोचली सध्या तेथे बर्क राज्यपाल होता जॉन बॅटमनने आदि-वासींकडून खरेदी केलेल्या जमिनींचे करार मदार त्याने रद्दबादल ठरविले पण तेथे अनधिकृतपणे जमीन बळकावलेल्या वसाहत-वाल्यांना हुसकावून लावणे अशक्य कोटीतील होते तेव्हा तसे काही न करता तो मुत्सद्दीगिरीने वागला आणि या प्रदेशात सुव्यवस्था व कायद्याचे राज्य कसे आणता येईल याकडे त्याने

लक्ष दिले त्याने कॅप्टन विल्यम लान्सडेल याला काही नोकरवर्ग बरोबर देऊन नव्या प्रदेशाचा प्रशासक म्हणून पाठवल,

१८३७ च्या मार्च महिन्यात राज्यपाल पर्थने स्वत या प्रदेशाला भेट दिली यारा नदीवरील नव्या गावाचे नाव त्याने त्या वेळचा ब्रिटिश पतप्रधान लॉर्ड मेलबोर्न याच्या नावाने मेलबोर्न असे ठेवले नव्या शहराची नगररचना चौकोनी [illegible]याची व सलग रस्त्याची करायची असे ठरवून त्याप्रमाणे त्याने आखणी केली. नव्या शहरातील जमिनीचे प्लॉट जून १८३७ मध्ये लिलाव करून विकण्यात आले त्या वेळी प्रत्येक प्लॉटला १८ पौंड ते ३५ पौंड किंमत आली नोव्हेंबर १८३७ मध्ये दुसरा लिलाव झाला तेव्हा मोक्याच्या प्लॉटची सर्वांत जास्त किंमत १०० पौंड आली बॅटमननेच तो किंमती प्लॉट घेतला

प्रगती व्हायला लागली की खूपच वेगाने होते १ जानेवारी १८३८ रोजी 'मेलबोर्न ॲडव्हर्टायझर' या वृत्तपत्राचे फॉकनरच्या हस्ते प्रकाशन सुरू झाले दुसऱ्याच दिवशी एक घोडेस्वार टपाल घेऊन खुष्कीच्या मार्गाने सिडनीला रवाना झाला अशा तऱ्हेने दर पंधरवड्याला नियमितपणे टपाल सेवा सुरू झाली. आता मेंढपाळ आपले कळप घेऊन मरे नदीच्या उत्तर किनाऱ्यापर्यंत पोहोचले. मिचेलच्या सशोधन मोहिमामध्ये त्याने नेलेल्या घोडागाडीच्या चाकांच खाली चर उमटले होते व ते अजून [illegible] होते त्या चराच्या अनुरोधानच घोडेस्वार प्रवास करत व त्यांच्या अनुरोधानेच मेंढपाळ आपल्या कुरणाच्या हद्दी ठरवू लागले मेलबोर्न शहर झपाट्याने उभे राहू लागले दुकाने व हॉटेले यांना चांगला नफा होऊ लागला नवीन घरे बांधली जात होती व शहर उदयाला येत होते

मेल्बोर्नपासून दक्षिण-पश्चिमेकडे ७२ किलोमीटरवर दुसरे एक गाव वसत होते ते स्थानिक नाव गेलांग या नावानेच ओळखले जाऊ लागले नोव्हेंबर १८३८ मध्ये त्याला शहराचा दर्जा मिळाला. या सर्व प्रदेशात फॉकनर आणि बॅटमन याची स्पर्धा चालत असे. फॉकनर हा जास्त चतुर व्यापारी होता आणि तो कुठलीही सधी सोडत नसे त्यामुळे तो खूपच धनाढ्य झाला बॅटमन त्याच्याबरोबर टिकू शकला नाही आजारपणामुळे बॅटमन १८३९ मध्ये मृत्यू पावला

सन १८४० सपता सपता मिचेलने शोधलेला 'ऑस्ट्रेलिया फेलिक्स' हा प्रदेश मेंढपाळानी सपूर्णपणे व्यापून टाकला ह्या सर्व प्रदेशात आता दहा लाख मेंढ्या चरत होत्या पोर्ट फिलिप किल्ल्याची लोकसंख्या आता दहा हजार झाली होती त्यापैकी चार हजार लोक मेलबोर्नमध्येच राहत होते लॉन्सडेलच्या जागेवर चार्लस जोसेफ ला ट्रोब हा प्रशासक आला होता आपली वसाहत न्यू साऊथ वेल्सपासून वेगळी करावी अशी मागणी आता होऊ लागली

या नव्या प्रदेशात आता शासनाला बरेच उत्पन्न होऊ लागले होते ते उत्पन्न येथे खर्च न करता सिडनीकडे खर्च होईल अशी लोकाना भीती वाटत होती म्हणूनच वेगळ्या वसाहतीची मागणी पुढे आली होती शिवाय न्यू साऊथ वेल्समधील शासन गुन्हेगाराच्या वसाहती या भागात स्थापेल अशीही भीती होती शेवटी १८४१ मध्ये एक शिष्टमडळ इग्लडला गेले आणि पोर्ट फिलिप प्रदेशाला स्वतत्र वसाहतीचा दर्जा मिळावा अशी त्यानी मागणी केली याच वर्षी सर जॉर्ज गिव्हज् हा नवा राज्यपाल आला होता त्याने मेलबोर्नला भेट दिली. १८४१ च्या एका

वर्षातच आठ हजार नवे लोक स्थलांतर करून आले व लोकसंख्या दहा हजाराची वीस हजारावर पोचली

सन १८४२ मध्ये न्यू साऊथ वेल्स वसाहतीचे कायदेमंडळ वाढविण्यात आले व पोर्ट फिलिफ विभागाला सहा जागा देण्यात आल्या अर्थात त्याने फारसा फरक पडला नाही. पण या नव्या विभागाला प्रतिनिधित्व मिळाले

१८४२ च्या शेवटी सर्व विकास एकदम थांबला. सर्वच ऑस्ट्रेलियात मंदी आली होती त्यातच पोर्ट फिलिफची वसाहतही सापडली लोकरीच्या किमती कमी होतच होत्या त्या किमतींनी तळ गाठला एक मेंढी अर्ध्या शिलिंगला म्हणजे ४०-५० पैशाना विकली जाऊ लागली। अनेक मेंढपाळांनी मेंढ्याचा कळप वाढविण्यासाठी कर्जे काढली होती किंमती गडगडल्यामुळे त्याना कर्जे फेडता येईनात. एका वर्षातच शंभरच्या वर मेंढपाळांनी दिवाळखोरी जाहीर केली

मंदीची परिस्थिती बदलून पुन्हा भरभराटीचे दिवस यायला काही वर्षे लागली जादा झालेल्या मेंढ्या नुसत्या विकण्यापेक्षा त्या मारून आणि उकळवून काढून त्याची चरबी विकणे व निर्यात करणे जास्त फायद्याचे आहे असे आढळले अन्नधान्य स्वस्त झाल्यामुळे राहणी खर्च कमी झाला आणि लोकरीची किंमत मात्र वाढल्यामुळे मेंढपाळांच्या हातात जास्त पैसा खेळू लागला आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर स्वतंत्र वसाहतीच्या मागणीला जोर चढला मेलबोर्नच्या लोकांनी १८४८ च्या निवडणुकीत गंमतच केली त्यानी आपला प्रतिनिधी निवडण्याऐवजी इंग्लंडचा वसाहत मंत्री अर्ल ग्रे यालाच प्रतिनिधी म्हणून निवडून दिले। १८४९ मध्ये पाचशे गुन्हेगार घेऊन दोन जहाजे आली तेव्हा

त्याना बंदरात उतरू देण्यात मेलबोर्नच्या नागरिकानी तीव्र विरोध केला. आणि त्या गुन्हेगारांना सिडनीला परत न्यायला लावले

आता मिचेलने शोधलेल्या 'ऑस्ट्रेलिया फेलिक्स'मधील एक एकरही जमीन रिकामी राहिलेली नव्हती. या जिल्ह्याची लोकसंख्या सत्तर हजार झाली होती आणि मेंढ्या साठ लाख होत्या. शेवटी ब्रिटिश सरकारने ऑगस्ट १८५० मध्ये या प्रदेशाला स्वतंत्र वसाहतीचा दर्जा दिला या नव्या वसाहतीचे नाव व्हिक्टोरिया ठेवण्यात आले ला-ट्रोब यालाच नव्या वसाहतीचा राज्यपाल नेमण्यात आले. ही बातमी मेलबोर्नला तीन महिन्यांनी पोचली तेव्हा शहरात पधरा दिवस आनदोत्सव साजरा करण्यात आला।

दरम्यान पश्चिम ऑस्ट्रेलियात आणखी एक वसाहत उभी राहात होती पश्चिम ऑस्ट्रेलियातील वसाहतीतील पीलची योजना अयशस्वी ठरली, तेव्हापासून इग्लडमध्ये वसाहती कशा असाव्यात या बाबत विचार चालू होता एडवर्ड गिप्सन वेकफिल्ड या गृहस्थाने 'लेटर फ्रॉम सिडनी' या चोपड्यामध्ये वसाहतीसंबधी आपली नवी योजना माडली त्याचे म्हणणे असे होते की, वसाहतीतील जमिनी चागली किमत घेऊन विकाव्यात आणि त्या रकमेतून नव्याने वसाहत करणाऱ्यांना मदत करावी हे नवीन वसाहतवाले नतर जमिनी विकत घेतीलच असे चक्र चालू राहिल्यास लवकरच वसाहत स्थिर पायावर उभी राहील

ही योजना तत्त्वत चांगली होती पण अमलात आणायला कठीण होती इग्लडमध्ये ती अनेकांनी उचलून धरली दक्षिण ऑस्ट्रेलियाचा प्रदेश अजून मोकळाच पडला होता. तेथे नवी

वसाहत स्थापण्याचे ठरले. जॉर्ज फाइप अँगस् या धनाढ्य गृहस्थाच्या पुढाकाराने साऊथ ऑस्ट्रेलियन असोसिएशनची स्थापना झाली सरकारनेही १८३६ मध्ये एक कायदा पास केला आणि या नव्या कपनीला वसाहतीचे अधिकार दिले १८३६ साल सपता सपता तीनशे वसाहतवाले नव्या वसाहतीत येऊन दाखल झाले सुरुवातीला राज्यपाल कॅप्टन जॉर्ज हिंडमार्श आणि सरकारी सर्व्हेअर कर्नल विल्यम लाईट या दोघामध्ये राजधानी कुठे वसवावी याबद्दल भांडणे लागली शेवटी सर्व्हेअर लाइटचा विजय झाला आणि त्याने निवडलेल्या जागेवर अॅडेलेड शहराची स्थापना झाली त्यावेळचा इग्लंडचा राजा चवथा विल्यम याच्या राणीचे हे नाव नव्या शहराला देण्यात आले. नव्या शहराची जागा टोरेन्स नदीच्या मुखापासून काही किलोमीटर अतर्भागात होती कर्नल टोरेन्स हा नव्या कपनीचा वसाहतीतील मुख्य प्रतिनिधी होता

आता राज्यपाल हिंडमार्श आणि कपनी प्रतिनिधी टोरेन्स याच्यात भांडणे लागली हिंडमार्शचे मत सुपीक जमीन असेल ती निवडावी मग ती कोठेही असो, असे होते. तर टोरेन्सला एकाच जागी एकवटलेली वसाहत हवी होती कपनी आणि सरकारचा राज्यपाल या दोघामध्ये एकच अधिकारक्षेत्र वाटले गेल्यामुळे गोंधळ होत होता राज्यपाल हिंडमार्शला परत बोलाविण्यात आले आणि कर्नल जॉर्ज ग्वॉलर याला सर्वाधिकार देऊन राज्यपाल म्हणून पाठविण्यात आले. कपनीला काही अधिकार राहिला नाही परिणामी साऊथ ऑस्ट्रेलियन असोसिएशनचे दिवाळे निघाले.

कर्नल ग्वॉलर पोचला तेव्हा नव्या वसाहतीत शेतीचा काहीच

विकास झाला नव्हता सर्वजण ॲडेलेडमध्येच राहू पाहत होते. त्यामुळे तेथे खूपच महागाई झाली होती जरुरीच्या वस्तूही मिळत नव्हत्या. आणि काही व्यापाऱ्यानी अन्नाच्या सवा नफा मिळविला होता पण ही स्थिती फार दिवस टिकली नाही. ऑस्ट्रेलियाच्या इतर वसाहतीत जरुरीच्या वस्तू व शेतमाल याचा तोटा नव्हता. किंमती उतरल्या आणि लोकसख्या वाढू लागली १८४१ मध्ये ती चौदा हजार झाली नवे नवे लोक वसाहत करायला येतच होते त्यामध्ये काही जर्मनही होते ते खूप कष्ट करणारे आणि काटकसरी होते त्यांनी आपली स्वत ची क्लेमसिग आणि बेथनी ही गावे वसविली व आपल्या चालीरीती कायम ठेवल्या

लोकाना काम मिळावे म्हणून राज्यपाल ग्वॉलरने रस्ते व इमारती या सारखी बरीच सार्वजनिक कामे सुरू केली या कामावर पडणारा खर्च पाहून इग्लडमधील राज्यकर्त्यांना धक्का बसला आणि त्यानी ग्वॉलरला परत बोलावले आणि त्याच्या जागी कॅप्टन जॉर्ज ग्रे याला १८४१ मध्ये राज्यपाल नेमले ग्रेने कारभार हाती घेतला तेव्हा सर्व ऑस्ट्रेलियाच मदीच्या तडाख्यात सापडला होता व दक्षिण ऑस्ट्रेलियातील आर्थिक परिस्थिती खूपच बिघडली होती बेकारी वाढली होती आणि अनेक लोकानी दिवाळी काढली होती ग्रेने कडक उपाययोजना केली अशा उपायाची जरुरी होती पण त्यामुळे ग्रे जनतेत अप्रिय झाला. चरितार्थाला साधनच न उरल्याने ॲडेलेड शहरातील लोक बाहेर पडू लागले व शेती करू लागले त्याचा परिणाम असा झाला की, १८४३ पर्यंत गव्हाचे उत्पादन वसाहतीला पुरून उरेल एवढे झाले त्यामुळे अन्नाचा प्रश्न सुटला पण जहाजाची भाडी इतकी

होती की, तो गहू निर्यात करून त्याचा पैसा करणे परवडण्या-सारखे नव्हते

१८४४ पर्यंत खर्च व उत्पन्न समान करून ग्रे ने वसाहतीचे अंदाजपत्रक समतोल केले ग्रे चे हे यश अपूर्व होते पण मौल्यवान धातूच्या शोधामुळेच वसाहतीचे भाग्य पालटले. अॅडेलेडजवळच ग्लेन आस्मॉन्ड येथे १८४१ मध्येच चांदी व शिसे सापडले पुढच्याच वर्षी अॅडेलेड पासून ६४ किलोमीटर कॉपून्डा येथे तांबे सापडले पण ताब्याचा प्रचंड साठा १८४५ मध्ये बुराबुरा येथे सापडला पुढच्या पाचच वर्षांत बुराबुरा खाणीतून साडेसात लाख पौंडाचे तांबे काढण्यात आले. ज्या लोकांनी काही वर्षांपूर्वीच्या मंदीत प्रचंड नुकसान सोसले होते त्यांनी आपले नुकसान भरून काढले. आता वसाहतीची भरभराट सुरू झाली


★

प्रकरण आठवे

# अंतर्भागातील विस्तार

सन १८३५ पर्यंत पूर्व ऑस्ट्रेलियाची सर्व किनारपट्टी चांगलीच माहीत झाली होती तरीही अंतर्भागातील बराच प्रदेश अज्ञात राहिला होता. क्विन्सलॅन्डचा अंतर्भाग, न्यू साऊथ वेल्सची पश्चिम सरहद्द व दक्षिण पूर्वेकडील पर्वत श्रेणी यांचे संशोधन व्हायचेच होते दक्षिण व पश्चिम ऑस्ट्रेलियात नव्या वसाहती स्थापन झाल्या होत्या पण वसाहतींच्या क्षेत्राबाहेर फारसे भौगोलिक ज्ञान झाले नव्हते. सर्व उत्तर ऑस्ट्रेलिया पूर्णपणे अज्ञातच होता अज्ञात अंतर्भागात काय आहे यासंबंधी अनेक तर्क करण्यात येत होते काहींच्या मते अंतर्भागात मोठे वाळवंट आहे, तर स्टुर्ट-सारखे काहीजण म्हणत की अंतर्भागात भूमिवेष्टित समुद्र असावा.

सन १८३६ मध्ये लेफ्टनंट जॉर्ज ग्रे याने पश्चिम आस्ट्रेलियात संशोधन मोहीम काढायचे ठरवले आणि त्या मोहिमेला सरकारी पाठिंबाही मिळाला हाच ग्रे पुढे दक्षिण ऑस्ट्रेलियाचा राज्यपाल झाला १८३७ साली काही मदतनीस बरोबर घेऊन लेफ्टनंट ग्रे उत्तर पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या हॅनोव्हर' उपसागरात किनाऱ्यावर उतरला तेथून २४०० किलोमीटर्स अंतरावर असलेल्या पर्थपर्यंत प्रवास करण्याची महत्त्वाकांक्षा त्याने बाळगली होती त्याच्यापैकी फक्त एकालाच ऑस्ट्रेलियातील प्रवासाचा




**ग्रे, स्टुर्ट आणि स्ट्रेलेस्की यानी केलेले सशोधन**

अनुभव होता प्रवासाची सुरुवात झाल्यानतर थोड्याच दिवसात त्याना उचसखल प्रदेश लागला. येथील आदिवासी क्रूर व युद्धखोर होते ग्रे एकदा बुडता बुडता वाचला व लगेच एका आदिवासीने भाला मारल्याने जखमी झाला मग त्यांचा जथा मोठ्या कष्टानेच जहाजाकडे परतला. या लहानशा कालावधीतही ग्रेने एक नदी शोधली तिचे नाव त्याने ' ग्लेनेग ' असे ठेवले. या नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर सुपीक जमीन होती. तेथील गुहेमध्ये आदिमानवानी केलेली भीत्तिचित्रे त्याने शोधून काढली

ग्रेने पुन्हा १८३९ साली नव्याने मोहीम काढली. तो अकरा


सहकारी घेऊन पर्थहून निघाला ३ मासेमारीच्या बोटी त्याने घेतल्या आणि तो प्रथम शार्क उपसागर येथे पोहोचला तेथून दक्षिणेकडे बोटीने प्रवास करत मधून मधून किनाऱ्यावर उतरायचे व संशोधन करायचे असा त्याचा बेत होता पुन्हा एकदा त्याची सर्व योजना फसली त्याच्या तिन्ही बोटी खवळलेल्या समुद्रामध्ये नष्ट झाल्या. आणि त्याच्या जथ्याला ८०० किलोमीटर दक्षिणेला असलेल्या पर्थपर्यंत पायी चालत जाण्याशिवाय गत्यंतर उरले नाही त्याच्यापैकी एकजण मृत्यू पावला आणि बाकीचे लोक पर्थला पोहोचले, तेव्हा त्याची दशादशा झाली होती या पायी प्रवासात त्यानी अनेक नद्या शोधून काढल्या व अतर्भागात सुपीक जमिनीचा एक मोठा पट्टा त्याना सापडला तेथेच नतर ' जेराल्डटन ' हे शहर उभे राहिले

खंडाच्या दक्षिण-पूर्व कोपऱ्यामध्ये उंच पर्वतश्रेणी आहे, हे पूर्वी समजले होतेच त्या विभागात १८४० मध्ये ' कौंट पॉल स्ट्राझेलकी ' याने ऑस्ट्रेलियातील अत्युच्च पर्वतशिखर शोधून काढले-- त्या शिखराला त्याने ' माऊट कोसीयुस्को ' असे नाव पोलडच्या देशभक्ताच्या नावावरून दिले तेथून त्याने दक्षिणेकडे प्रवास सुरू केला त्यावेळी त्याला जगलाने गच्च भरलेल्या डोंगरातून मार्ग काढावा लागला घोडे आणि इतर सामुग्री रस्त्यातच सोडून द्यावी लागली. त्याचा जथा मेलबोर्नला पोहोचला तेव्हा ते सर्वजण उपासमारीने खंगलेले व प्रवासाने श्रात झालेले होते त्याने आपण शोधलेल्या विभागाला ' गिप्टस् लॅंड ' असे नाव ठेवले

याच सुमारास दक्षिण ऑस्ट्रेलिया येथून एडवर्ड जॉन आयर याने १८३९ व १८४० मध्ये खंडाच्या मध्यभागी जाण्याचा

प्रयत्न केला. जे लोक अॅडेलेडला प्रथम उतरले त्यामध्ये एडवर्ड आयर होता त्याला साहसाची आवड होती. खंडाच्या मध्यभागी जाण्याचा त्याचा प्रयत्न कोरडे पडलेल्या 'टॉरेन्स' सरोवराचा अडथळा आणि पाण्याचा अभाव यामुळे सोडून द्यावा लागला.

१८४१ मध्ये आयर पुन्हा निघाला यावेळीही त्याला पुढे सरकता येईना पण तो अॅडेलेडला काही परतला नाही. त्याने आपल्या साथीदारांना परत पाठवले आणि 'काऊलर' उप-सागरापासून तो दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या किनारपट्टीच्या अनुरोधाने पश्चिमेकडे निघाला त्याचेबरोबर जॉन बॉक्स्टर हा गोरा



संशोधक आयरला योगायोगाने फ्रेंच जहाज भेटले

सहकारी आणि तीन आदिवासी होते. त्याला आल्बनीपर्यंतचा १६०० किलोमीटर्सचा प्रवास करावयाचा होता या सर्व प्रदेशात झाड नव्हती की पाणीही नव्हते तीन आदिवासी सहकाऱ्यापैकी दोघानी बॉक्स्टरचा खून केला आणि अन्नसामुग्री चोरून ते पळून गेले.

आता आयर आणि त्याचा विश्वासू आदिवासी नोकर वायले हे दोघेच राहिले. आल्बनी आता ४८०कि मीटर्सवर राहिले होते पण अन्नसाठा काहीच शिल्लक राहिला नव्हता आणि ते उपासमारीने मेलेच असते पण अगदी योगायोगाने त्याना 'रोजिस्टर' उपसागरात एक फ्रेंच मासेमारी जहाज दिसले त्या जहाजाने त्याना उचलून घेतले व त्याचा जीव वाचला. या प्रवासाला त्याना १९ आठवडे लागले या प्रवासातून फारसे काहीच साध्य झाले नाही मधल्या वाळवटामुळे पूर्व व पश्चिम ऑस्ट्रेलिया यांचा सबध तुटला आहे इतकेच फक्त सिद्ध होऊ शकले

१८४४ मध्ये चार्ल्स स्टुर्ट पुन एकदा सशोधन क्षेत्रात उतरला मधली काही वर्षे तो ॲडेलेड येथे सरकारी नोकरीत होता १५ मदतनीस व भरपूर साहित्यसामुग्री बरोबर घेऊन तो ॲडेलेड येथून निघाला. व डार्लिग नदीच्या किनाऱ्याने मेनिंडेपर्यंत पोहोचला याच ठिकाणी काही वर्षापूर्वी स्टुर्टचा प्रतिस्पर्धी मिचेल-वर आदिवासीनी प्रखर हल्ला केला होता. या ठिकाणाहून तो उत्तर-पश्चिमेकडे वळला खडाचा मध्यभाग गाठण्याचा त्याचा विचार होता


त्याने प्रथम 'बॅरिअर' पर्वतश्रेणी ओलाडली. तेथून पुढचा प्रवास त्याला कोरड्या निर्जल वाळवटातून करावा लागला या वाळवटातच त्याला कायमचे भरपूर पाणी असलेले एक ठिकाण

सापडले त्या ठिकाणाला त्याने 'ग्लेनडेपो' असे नाव दिले. ग्लेनडेपोजवळ काही दिवस विश्राती घेण्याचा त्याने विचार केला पण तीव्र उन्हाळा सुरू झाला. पुढे प्रचड वाळवंट पसरलेले होते. व अतिशय उष्मा होता. तेव्हा त्याला ग्लेनडेपोच्या आश्रयाने सहा महिने काढावे लागले. मग पावसाळा सुरू झाला आणि पुढे निघता आले. पण त्याचवेळी मोहिमेचा उपनेता जॉन पूल स्कर्व्हीमुळे मरण पावला.

अन्नसामुग्री सपत आली होती. म्हणून स्टुर्टने काही साथीदाराना ॲडेलेडला रसद आणण्यासाठी परत पाठवले. व उरलेल्या लोकासह तो पुढे निघाला त्याने फोर्ट ग्रे येथे मुक्कामाचे ठिकाण ठेवले आणि तेथून अतर्भागात जाण्याचे अनेक प्रयत्न केले पण प्रत्येक वेळी अफाट पसरलेल्या कोरड्या व निपाणी वाळवटामुळे त्याला ते सर्व प्रयत्न सोडून द्यावे लागले त्या वाळवटाला स्टुर्टचेच नाव देण्यात आले. शेवटी स्टुर्टची प्रकृती बिघडली आणि त्याने परतण्याचा निर्णय घेतला. वाळवटातून प्रवास करताना जिवत राहण्यासाठी पाणी हवे होते. त्यासाठी त्याने चार बैल मारले आणि त्याच्या कातड्याच्या पखाली तयार केल्या या पखालीत साडेसातशे लिटर पाणी मावले वाळवटातून ते रात्रीच्या वेळीच प्रवास करत. प्रवासात स्टुर्ट फारच आजारी पडला तेव्हा त्याला स्ट्रेचरवर काही अतरासाठी वाहून नेण्यात आले. काही दिवसात तो बरा झाला पण ॲडेलेडला पोहोचला तेव्हा तो खूपच अशक्त झाला होता व वाळला होता— त्याची ही अवस्था पाहिल्याबरोबर त्याची पत्नी बेशुद्धच पडली

याच सुमारास दुसरी एक मोहीम ब्रिस्बेनहून उत्तर-पश्चिमेच्या दिशेला निघून उत्तर ऑस्ट्रेलियामधील 'एसिंग्टन' बदर येथे

जाण्यासाठी निघाली. हा सर्व प्रवास ३२०० किलोमीटर्सचा होता व अज्ञात प्रदेशातून करायचा होता या मोहिमेचे नेतृत्व 'लुडवीक-लीचहार्ट' हा चक्रम जर्मन गृहस्थ करत होता. मोहिमेसाठी लागणारा पैसाही त्यानेच पुरवला होता, सक्तीची लष्कर भरती टाळण्यासाठी तो प्रशियाहून पळून आला होता आपल्या हुशारीबद्दल त्याच्या अफाट कल्पना होत्या व आपण प्रथम दर्जाचे संशोधक आहोत असे त्याला वाटत होते. पण त्याच्याकडे नेतृत्वगुण नव्हते. त्याच्या साथीदारांपैकी दोघेजण मतभेद झाल्यामुळे अर्ध्या रस्त्यातूनच ब्रिस्बेनला परतले एके दिवशी रात्री आदिवासींनी त्याच्यावर प्रखर हल्ला चढवला त्या हल्ल्यात जॉन




**लिचहार्ट व केनेडीचे संशोधन**

गिल्बर्ट हा शास्त्रज्ञ मारला गेला आणि इतर दोन सहकारी जखमी झाले तरीही लिचहार्टने आपला प्रवास चालूच ठेवला १४ महिन्यांच्या प्रवासानतर तो आणि त्याचे सहकारी अर्धमृत अवस्थेत एसिंग्टन बदरात पोहोचले.

मध्यतरी त्याची काहीच बातमी न समजल्यामुळे तो मृत्यू पावला असावा असे सिडनीतील लोकाना वाटले. एसिंग्टनहून तो जेव्हा परतला तेव्हा त्याचे भव्य स्वागत करण्यात आले सरकारकडून व खाजगी नागरिकाकडून त्याला रोख बक्षिसे मिळाली आपल्या प्रवासाविषयी त्याने भाषणे दिली आणि एक पुस्तकही लिहिले १८४६ च्या डिसेंबर महिन्यात तो डार्लिंग डाऊन्स या मैदानातून सर्व खड ओलाडून पर्थला जाण्याच्या उद्देशाने निघाला पण वाईट हवामान, आजारपण व सहकाऱ्यांबरोबरची नित्याची भांडणे या सर्वांमुळे त्याच्या जथ्याला मधूनच परतावे लागले. व या मोहिमेतून काहीच साध्य झाले नाही तरीही खचून न जाता लिचहार्टने एप्रिल १८४८ मध्ये पुन्हा एकदा खड ओलाडून पर्थ येथे जाण्यासाठी मोहीम काढली यावेळी त्याचेबरोबर चार युरोपियन सहकारी व दोन आदिवासी होते अतर्भागात ते गुप्त झाले व त्यांचे पुढे काय झाले याचा पत्ता कधीच लागला नाही !

इकडे मेजर मिचेल बत्तीस सहकारी आणि खूप साधनसामुग्री घेऊन आपल्या शेवटच्या मोहिमेवर निघाला होता त्यावेळी न्यू साऊथ वेल्स आणि उत्तर किनारा याना जोडणारा जमिनीवरचा मार्ग त्याला शोधायचा होता. तसेच मागच्या एका सफरीत त्याच्या कानावर आलेली किडूर नदी सापडते का हेही पाहावयाचे होते.

त्याचा हा प्रवास तसा मजेत झाला व संकटे वगैरे आली नाहीत आणि या प्रवासातील संशोधनामुळे पुष्कळच फायदा झाला सध्याच्या क्विन्सलॅन्डच्या प्राताच्या हद्दीपलीकडे मिचेलला माना-रोआचे विशाल मैदान सापडले. तेथे कुरणासाठी फार चांगली जमीन होती. सध्या हा प्रदेश मेंढयांचे आणि गुराचे आश्रयस्थान म्हणून भरभराटीला आला आहे. आणखी उत्तरेकडे गेल्यानंतर उत्तर-पश्चिमेकडे वाहणारी एक मोठी नदी त्याला सापडली. त्या नदीचे नाव त्याने व्हिक्टोरिया असे ठेवले. त्या नदीचे त्याला आणखी संशोधन करावयाचे होते, पण अन्नपुरवठा संपत आल्या-मुळे त्याला सिडनीला परतावे लागले.

१८४७ च्या सुरुवातीला मिचेलचा दुय्यम अधिकारी एडमड केनेडी याला थोडेसे मदतनीस देऊन या व्हिक्टोरिया नदीचा पुढचा भाग शोधण्यास पाठविण्यात आले. मिचेलला ही नदी उत्तरेकडच्या समुद्राला मिळत असावी असे वाटले पण केनेडीने जी माहिती आणली त्यामुळे मिचेलची निराशा झाली त्याच्या माहितीप्रमाणे ही नदी दक्षिण पश्चिमेकडे वाहत होती. आणि ती कुपरच्या खाडीचा वरचा भाग होती. स्थानिक लोक त्या नदीला बारकू नावाने ओळखत असत.

१८४८ मध्ये एडमड केनेडी बारा मदतनीस घेऊन केप यॉर्कचे द्वीपकल्प शोधण्यासाठी निघाला एक बारक्या जहाजातून तो रॅकीनहॅम उपसागरात पोहोचला तेथे जमिनीवर उतरून तो यॉर्क द्वीपकल्पाच्या टोकापर्यंत जाणार होता मग तेथे एरियल हे जहाज त्याची वाट पाहत थांबणार होते

सुरुवातीलाच त्यांना दाट जंगलातून जावे लागले स्थानिक आदिवासींनी त्याच्यावर छुपे हल्ले केले त्यांचा महत्त्वाचा अन्न-

साठा हरवला किंवा चोरीला गेला शिल्लक राहिलेले अन्न फारच जपून वापरावे लागले त्याच्या मदतनीसांपैकी आठ मदतनीस खूपच अशक्त झाले. केनेडीने त्या आठ जणांना प्ले माऊथ उपसागराजवळ थांबायला सांगितले आणि तो उरलेले चार मदतनीस घेऊन पुढे निघाला. त्या चारातच जॅकी जॅकी नावाचा एक आदिवासी मदतनीसही होता उरलेल्या तिघा मदतनिसांपैकी एक जण खूपच आजारी झाला. व एकाने आत्महत्या केली तेव्हा त्या राहिलेल्या सर्व गोऱ्या सहकाऱ्याना केनेडीने शेलबर्न उपसागर येथे सोडले आणि तो व जॅकी हे दोघेजणच पुढे निघाले. यार्क द्वीपकल्पाचे टोक ११० किलोमीटर अंतरावर राहिलेले होते थोडे पुढे जाऊन ते क्रूर आदिवासींच्या तावडीत सापडले त्यांनी बरेच दिवस या दोघाना त्रास दिला व शेवटी त्याच्यावर हल्ला चढविला त्या हल्ल्यात केनेडीच्या पाठीत आणि बाजूमध्ये भाले घुसले व त्यामध्येच तो मरण पावला आता जॅकी जॅकी हा एकटाच शिल्लक राहिला होता तो आदिवासींच्या तावडीतून सुटला आणि द्वीपकल्पाच्या टोकाशी पोचला तेथे एरियल जहाज वाट पाहत उभे होतेच. जॅकी जॅकीला बरोबर घेऊन इतराची सुटका करण्यासाठी एरियल जहाज त्वरेने निघाले. शेलबर्न उपसागराजवळ जे तिथे मागे राहिले होते, त्यांचा काहीच पत्ता लागला नाही. प्लेमाऊथ उपसागराजवळ जे आठ लोक मागे राहिले होते त्यापैकी दोघानाच एरियल जहाजाने वाचवले.

★

प्रकरण नववे

# नवीन वसाहतवाले आणि मेंढपाळ

सुरुवातीच्या वर्षात ऑस्ट्रेलियाबद्दल इग्लडमधील लोकांना फारसे आकर्षण नव्हते तेथे वसाहत करण्यासाठी फारसे कुणी येत नसे १८२१ पर्यंत ऑस्ट्रेलियातील वसाहत मुख्यत. गुन्हेगाराचीच वसाहत होती. आणि माजी गुन्हेगार व तुरुगातील गुन्हेगाराची लोकसख्या स्वतत्र नागरिकापेक्षा कितीतरी जास्त असे. परंतु या स्वतंत्र नागरिकाच्याच हातांत तेथील सर्व सपत्ती एकवटलेली होती. हळूहळू ऑस्ट्रेलियाचा प्रदेश कसा सपन्न आहे हे लोकाच्या लक्षात येऊ लागले. जॉन मॅकॉर्थरने वाढवलेल्या मरिनो जातीच्या मेंढयांची लोकर फारच छान व मऊ असे. त्या लोकरीला इग्लडमध्ये खूपच किमत मिळू लागली. ऑस्ट्रेलिया-मध्ये मेंढयाची व त्यामुळे लोकरीची पैदास अतिशय उत्तम होत आहे व त्यातूनच या नव्या प्रदेशाची भरभराट होणार हे सर्वांना समजले. शिवाय दरवर्षी चराऊ कुरणासाठी अगदी योग्य अस-लेली विस्तीर्ण मैदाने दरवर्षी सापडत गेली. त्यामुळे इग्लडमधील अनेकाना ऑस्ट्रेलियात जाऊन आपले नशीब काढावे असे वाटू लागले. १८२० ते ३० या दरम्यान १४ हजार स्वतत्र नागरिक स्थलातर करून ऑस्ट्रेलियात आले. त्याच्याजवळ भांडवल होते

संपत्ती मिळविण्याची महत्त्वाकांक्षा होती, आणि कठोर परिश्रम करण्याची त्याची तयारी होती या नव्या स्थलांतरितांत शेतकरी, कुशल कारागीर, डॉक्टर, सैनिक व नाविक अधिकारी आणि विद्यापीठातील पदवीधर असे सर्व प्रकारचे लोक होते. याशिवाय सरदाराचे आणि उमरावाचे धाकटे मुलगेही नशीब काढायला ऑस्ट्रेलियात येऊ लागले कारण इंग्लंडच्या कायद्याप्रमाणे उमरावांची सर्व इस्टेट व पद मोठ्या मुलाकडेच जात असे ऑस्ट्रेलियातील लोक या सर्वांना 'न्यू चम्स' किंवा नवी भरती या नावानेच ओळखत असत वसाहतीतील नवे वातावरण व राकट वागणूक यांच्याशी अनेकांना जमवून घेता येत नसे त्यापैकी अनेकजण इंग्लंडला परत जात किंवा शहरामध्ये थांबून इंग्लंडहून येणाऱ्या पैशावर जगत असत पण पुष्कळसे लोक नव्या परिस्थितीशी लवकरच एकरूप होत, आणि धाडसाने संशोधकांच्या मागोमाग नवीन कुरणाच्या भूमीत जाऊन आपला तंबू टाकत परंतु त्यातील सुद्धा चिवट लोकच यशस्वी होत नवीन वसाहतीत सुरुवातीला भरपूर कष्ट करणे भाग होते तेथे सर्व प्रकारच्या गैरसोई होत्या व संकटे तर अनेक होती कधी दुष्काळ पडे, तर कधी महापूर येत कधी कुरणातील झुडूपांना आगी लागत, चोर मेंढ्या पळवत, फरारी झालेले गुन्हेगार दरवडे घालत, आणि संतापलेले आदिवासी हल्ले करत. या सगळ्याला कंटाळून अनेक वसाहतवाले गाशा गुंडाळून परत जात पण जे ठामपणे पाय रोवून राहत त्यांना काही वर्षांतच त्याचे फळ मिळे व वैभव प्राप्त होई अशा प्रकारे धनाढ्य झालेल्यांचा उच्चभ्रू वर्गच ऑस्ट्रेलियात तयार झाला

तांत्रिकदृष्ट्या वसाहतीच्या हद्दीबाहेरील सर्व जमीन इंग्लंडच्या

राजाची होती. त्यामुळे वसाहती बाहेर जमीन व्यापणे बेकायदेशीर होते १८२९ मध्ये राज्यपाल डार्लिंगने १९ विकासखंडाची किंवा कौंटिग्जची विभागणी जाहीर केली. या १९ कौंटिंज किंवा जिल्ह्याच्या बाहेर वसाहत करू नये असे जाहीर केले पण हे सर्व नियम कागदावरच राहिले कुरणासाठी अफाट जमीन पसरली होती आणि कितीही लोक आले तरी ती संपत नव्हती अशा वेळी अनधिकृतपणे जमीन व्यापणारावर कायदेशीर कारवाई करणे अशक्यच होते.

१८३१ पर्यंत नागरिकाना चागल्या कामाबद्दल किंवा सेवेबद्दल जमीन बक्षीस दिली जात असे. ज्याचा वशिला पोचे त्यालाही अशी जमीन बक्षीस म्हणून मिळे १८३१ साली ही प्रथा बद करण्यात आली पण तोपर्यंत चाळीस लाख एकर जमीन फुकट वाटून झाली होती। १८३१ साली जमिनीची किंमत एकराला पाच शिलिंग ठरविण्यात आली. १८३८ साली ती बारा शिलिंग झाली आणि १८४२ साली ती दर एकराला एक पौंड झाली अर्थात हे नियम वसाहतीतील जमिनीसाठी होते. वसाहतीबाहेरची जमीन अनधिकृतपणे का होईना पण फुकटच पडे। पण नतर वसाहतीबाहेरच्या मेंढपाळांपेक्षाही पूर्वीचे जे मेंढपाळ होते त्यांना हे नव्याने येणारे स्वतंत्र स्थलान्तरित आवडत नसत. या नव्या स्थलान्तरितांत बरेचसे हाडाचे शेतकरी होते. जुन्या मेंढपाळाना वसाहतीत गुन्हेगार आणणे पसत होते. त्यामुळे त्याना स्वस्त मजूर वापरायला मिळत असत. हळूहळू ऑस्ट्रेलियात गुन्हेगार आणून सोडण्याच्या प्रथेविरुद्ध लोकमत तयार होऊ लागले. गुन्हेगाराना येथे आणणे बद केल्याशिवाय वसाहतीची प्रगती होणार नाही असे स्थलान्तरितांना वाटू लागले. काही कर गुरचरणपट्टी

म्हणून घेण्यात येऊ लागला. जमिनीची विक्री करून जे उत्पन्न येत असे त्यातून नव्याने येणाऱ्या स्थलांतरितांना अनुदान व तगाई कर्ज मिळू लागले. या अनुदानामुळे १८३१ पासून १८४० पर्यंत ६५ हजार स्वतंत्र नागरिक वसाहत करण्यासाठी इंग्लंडहून आले. आता गुन्हेगाराच्यापेक्षा स्वतंत्र नागरिकाची संख्या पुष्कळच मोठ्या प्रमाणावर वाढली. त्यामुळे वसाहतींची सामाजिक जडण-घडण पार बदलून गेली.

इंग्लंडमध्येही ऑस्ट्रेलियात सर्रास गुन्हेगार पाठविण्याविरुद्ध लोकमत तयार झाले आणि १८४० पासून व्हॉन डायमेन बेट आणि नॉरफोक बेट याशिवाय इतरत्र गुन्हेगार पाठविणे बंद झाले. त्यानंतर काही दिवसांनी एक नवीनच पद्धत सुरू केली. इंग्लंडच्या तुरुंगातून चांगल्या वर्तनाचे कैदी ऑस्ट्रेलियात आणून मुक्त केले जात. त्यांच्या कैदेची मुदत संपेपर्यंत त्यांना वसाहतीत राहावे लागे. पण या नव्या पद्धतीविरुद्ध ऑस्ट्रेलियातील स्वतंत्र नागरिकांनी तीव्र निषेध व्यक्त केला. त्यामुळे ही नवी पद्धत लवकरच थांबविण्यात आली.

वास्तविक पश्चिम ऑस्ट्रेलियात वसाहत स्थापन करताना तेथे गुन्हेगार अजिबात आणावयाचे नाहीत असे ठरले होते. पण लवकरच तेथे मजुरांची चणचण जाणवू लागली. तेव्हा आमच्याकडे गुन्हेगार पाठवा अशी या वसाहतीने उलटी मागणी केली! शेवटी ऑस्ट्रेलियात कोठेही गुन्हेगार पाठविण्याबद्दल लोकमत तीव्र विरोधी बनले आणि १८६८ साली जो गुन्हेगारांचा जथा ऑस्ट्रेलियन भूमीवर उतरला तो शेवटचाच ठरला.

पूर्व किनाऱ्यावरच्या वसाहतींनी काही प्रमाणात स्वयशासनाचे हक्क मिळविले होते. त्यांची स्वतःची कायदेमंडळे स्थापन झाली

होती या कायदेमंडळात निवडून येणारे सभासद धनाढ्य मेंढपाळांपैकी किंवा त्यांनी पाठिंबा दिलेल्या व्यापाऱ्यांपैकीच असत. त्यावेळी न्यू साऊथ वेल्सच्या वसाहतीत पोर्ट फिलिफ जिल्हाही सामील होता निवडून आलेले सभासद व राज्यपाल गिप्स यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले प्रस्थापित मेंढपाळांना इतरांना जमीन देणे पसत नव्हते गुन्हेगार येणे बद झाल्यापासून स्वस्त मजूर मिळेनात स्वतंत्र मजुरांना भरपूर पगार देणे राज्यपाल गिब्जने भाग पाडले त्यामुळे या मेंढपाळांनी एकदा सशस्त्र बडाचीही भाषा केली होती

या त्रासाशिवाय राज्यपाल गिब्जला १८४० च्या मंदीलाही तोंड द्यावे लागले जमिनीची विक्री होत नव्हती व तीतून पैसा मिळत नव्हता. पण दरवर्षी हजारो स्थलातरित वसाहत करायला येतच होते. त्याना उपासमारीतून वाचविण्यासाठी मदत देणे भागच होते व त्यासाठी पैसा गोळा करणे जरूर होते गिब्जने काटकसर सुरू केली. आणि कर वसुली कडक करून पैसा गोळा केला यामुळे गिब्ज सर्वत्र अप्रिय झाला तो जेव्हा राजीनामा देऊन इग्लडला निघाला तेव्हा मेंढपाळासकट वसाहतीतील सर्वांनीच आनदोत्सव साजरा केला पण गिब्जने वसाहतीचे खरे हित कशात आहे हे ओळखले होते व त्यानुसार त्याने राज्यकारभार केला होता गिब्ज हा ऑस्ट्रेलियाचा एक कर्तबगार राज्यपाल होता हे आता इतिहासतज्ज्ञानी मान्य केले आहे

वसाहतींना स्वयशासन लवकर मिळाले नाही पण १८५० पर्यंत पश्चिम ऑस्ट्रेलिया सोडला तर सर्व वसाहतीत स्वयशासन सुरू झाले होते जमीनविषयक कायदे अपुरे व चुकीचे आहेत असे लोकांना वाटू लागले होते काही थोड्या लोकांनी खूप मोठी

जमीन बळकावली होती व त्याची निव्वळ कुरणे करून ठेवली होती ही प्रचंड कुरणे मोडून तेथे गहू व इतर पिके लावणे जास्त फायद्याचे ठरणार होते. या हेतूने अनेक वसाहतीत नवे कायदे करण्यात आले.

इतर वसाहतीत या कायद्याचा चागला उपयोग झाला पण न्यू साऊथ वेल्समध्ये त्यामुळे बराच गोंधळ माजला लोकाना ३२० एकरापर्यन्त जमीन एक पौंडास एक एकर या भावाने देण्याचे जाहीर करण्यात आले अनेकानी केवळ पुन्हा फायदा घेऊन विकण्यासाठी अशा जमिनी घेतल्या ज्या मेंढपाळाच्या अनधिकृत जमिनी विक्रीस काढण्यात आल्या होत्या. त्या त्यानी आपल्या बनावट गिऱ्हाईकामार्फत स्वत च विकत घेतल्या. शेतकरी आणि मेंढपाळ यामध्ये झगडा सुरू झाला. मेंढपाळानी आपली कुपणे तोडून मेंढ्याचे आणि गुराचे कळप शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेल्या पिकावर सोडले. तर शेतकऱ्यानी मेंढपाळाच्या मेंढ्या व गुरे पळवून मारून टाकावयास सुरवात केली. आणि त्यांच्या कुरणातील झुडूपाना आगी लावल्या मेंढपाळ आणि शेतकरी याच्यात खुनाखुनी व प्रत्यक्ष मारामाऱ्याही सुरू झाल्या मेंढपाळाच्या प्रत्यक्ष ताब्यात विस्तृत जमीन होती. आणि शेवटी त्याचाच जय झाला. जमिनीबाबत न्याय देणाऱ्या कायद्याची अमलबजावणी व्हायला विसावे शतक उजाडावे लागले.

★

प्रकरण दहावे

## सोन्यासाठी धाव

संशोधकानी सुपीक जमिनी शोधल्या आणि लोकरीचा उद्योग-धंदा मोठ्या प्रमाणात सुरू झाला पण या दोघामुळेही ऑस्ट्रेलियामध्ये खरी क्रांती सुरू झाली नाही. ऑस्ट्रेलिया राष्ट्र पदवीस लायक झाला तो मुख्यतः सोन्यामुळे

निळ्या पर्वतातून १८१५ साली गुन्हेगारानी रस्ता बांधून काढला होता हे आपण मागे पाहिले आहेच. त्या गुन्हेगार कामगारांपैकी काहींना बाथरस्ट गावाच्या जवळ थोडेफार सोने सापडले होते, अशी अफवा होती १८२३ साली जेम्स मॅकब्रायन या सरकारी सर्व्हेअरला बाथरस्टच्या प्रदेशात थोडेसे सोने मिळाले होते आणि त्याने राज्यपाल ब्रिस्बेनकडे त्याबद्दल अहवालही सादर केला होता निळ्या पर्वतापलीकडे अनेकाना सोने सापडले होते संशोधक स्ट्राझेलेस्की याला हार्टले गावाजवळ १८३९ मध्ये आणि रेव्हरंड क्लार्क या भूगर्भशास्त्रज्ञाला हसनवॉलजवळ १८४१ मध्ये सोने सापडले होते त्यानंतर पुढची काही वर्षं न्यू साऊथ-वेल्स आणि व्हिक्टोरिया वसाहतीतील मेंढपाळाना अनेकदा सोने सापडले होते. पण हे सोने फारच अल्प प्रमाणात सापडले होते. त्यामुळे विशेष खळबळ वगैरे माजली नाही.

१८४९ मध्ये अमेरिकन सयुक्त सस्थानात कॅलिफोर्निया येथे सोने सापडले आणि लोकाची धाव तिकडे सुरू झाली तेव्हा ऑस्ट्रेलियातही खळबळ माजली. तेथील गर्दीत सामील होण्यासाठी काही लोक ऑस्ट्रेलियातून कॅलिफोर्नियाला गेले होते. त्याच वर्षी स्मिथ नावाच्या माणसाने सोन्याचा एक खडा सिडनीमधील अधिकाऱ्यांना दाखवला व तो कोठे सापडला हे ठिकाणही चागली बक्षिसी मिळणार असेल तर दाखविण्याचे कबूल केले. पण राज्यपालाला वाटले की ते सोने कॅलिफोर्नियातून आणले आहे म्हणून त्याने बक्षीस द्यायला नकार दिला.

ऑस्ट्रेलियातील सोन्यावरील धावा १८५१ मध्ये सुरू झाला.



सोनेशोधक हारग्रेव्ह व टुरॉन नदीतून सोने काढणारे लोक

त्यावर्षीच्या जानेवारी महिन्यात 'एडवर्ड हारग्रेव्ह' हा कॅलिफोर्नियाहून परत आला. त्याला कॅलिफोर्नियात सोने हाती लागले नव्हते. पण कॅलिफ्रोर्नियातील सोने देणारा प्रदेश त्याने नीट न्याहाळला होता त्या प्रदेशाचे बाथरस्टच्या आसपासच्या प्रदेशाशी असलेले साम्य त्याच्या लक्षात आले होते तेथेच त्याच्या मालकीचे लहानसे मेंढ्या चारायचे कुरण होते परत आल्यावर तो लिस्टर या तरुणाला घेऊन समरहील क्रिक येथे गेला १२ फेब्रुवारी १८५१ या दिवशी सोने मिळवण्यासाठी वाळू धुवायला त्यानी सुरुवात केली. वाळुच्या पहिल्याच घमेल्यात त्याला सोने सापडले सोने सापडून देणारास सरकारने दहा हजार पौंडाचे बक्षीस ठेवले होते. ते बक्षीस मिळवण्यासाठी तो सिडनी येथे आला सरकारकडे ही बातमी जाहीर करण्याआधीच त्याने मित्राच्या जवळ आपल्या शोधाबद्दल बढाया मारल्या सोने सापडत आहे ही बातमी वणव्यासारखी पसरली. एप्रिल महिन्यापर्यंत त्या जागी शेकडो लोक सोन्यासाठी खणू लागले लवकरच 'ओपीर' हे गावच वसविले गेले आणखी एका महिन्यात 'टुरॉन' नदीवरील सोफाला येथे शुद्ध स्वरुपात बरेच सोने सापडले आता खऱ्या अर्थाने सोन्यासाठी धाव सुरू झाली.

खोदकाम करणाऱ्या काहीजणाना पुष्कळ सोने सापडले आणि त्याचे नशीब उघडले पण अनेकजणाना केवळ जाणायेण्याच्या भाड्याचे पैसे सुटले। तेथील हवामान कडक होते. आणि राहण्याच्या सुखसोई काहीच नव्हत्या. अन्नसामुग्री व इतर पदार्थ सिडनीहून आणावे लागत त्याचा तुटवडा होता आणि ते फार महागही होते राज्यपाल फिजरॉय याने पोलिस अधिकारी व प्रशासक तेथे पाठविले प्रत्येक खोदकाम करणाऱ्याला दर महि-

त्याला तीस शिलिंगाची लायसेन्स फी द्यावी लागे. सोन्याच्या क्षेत्राकडे सर्वचजण धाव घेऊ लागले. सिडनीमध्ये एकही पुरुष राहिला नाही थोड्याच दिवसात इतर वसाहतीतूनही हजारो लोक आपले नशीब काढण्यासाठी या प्रदेशात येऊ लागले. व्हिक्टोरिया प्रान्तातून सोन्याच्या शोधात माणसाचा प्रचंड ओघ बाहेर पडला त्यामुळे तेथे मजूरांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात भासू लागला मजूर येथेच राहावेत म्हणून श्रीमंत जमीनदार एकत्र आले आणि त्यानी मेलबोर्नपासून तीनशे किलोमीटरच्या परी-सरात सोन्याचा शोध लावणाऱ्यास मोठे बक्षीस जाहीर केले. त्याबरोबर ते बक्षीस मिळवण्यासाठी आपण सोन्याचा शोध मेल-बोर्नच्या जवळ लावला आहे असे सांगणारे अनेक लोक निघाले! पण खऱ्या अर्थाने ज्याला सोन्याची खाण म्हणता येईल अशी जागा जेम्स एसमंड याने शोधून काढली. ही खाण मेलबोर्नच्या उत्तर–पश्चिमेस ९७ मैलावर क्लून्स येथे होती. थोड्याच आठ-वड्यात त्या जवळपासच्या प्रदेशात शेकडो लोक पोहचले जवळ-पास अनेक ठिकाणी सोने सापडले. सहा महिन्यातच मेलबोर्न-जवळच्या या प्रदेशात दहा लक्ष पौंडाचे किंवा दीड कोटी रुपयाचे सोने सापडले.

सोन्याच्या खाणी भराभर सापडत आहेत अशी बातमी मेल-बोर्नमध्ये पोचल्यानंतर तेथे भलतीच खळबळ माजली. थोड्याच दिवसात दुकाने व कार्यालये बंद झाली. वकील आणि डॉक्टरही आपली ऑफिसे व दवाखाने सोडून सोन्याच्या खाणीकडे पळाले! इमारतींचे बांधकाम एकदम थांबले. सरकारी कचेऱ्यात चुकून-माकून मागे राहिलेला कारकून दिसू लागला. पोलिसातीलही

लोकही तिकडेच पळाले लवकरच इंग्लंड आणि अमेरिका येथून सोने शोधायला लोक येऊ लागले बोट बंदराला लागली की उतारूसह खलाशी व बोटीवरचे अधिकारीसुद्धा बोट बंदरात तशीच सोडून सोन्याच्या खाणीकडे रवाना व्हायचे ! अशा सोडून दिलेल्या जहाजांनी बंदर भरून गेले. वस्तूंच्या किंमती वाढल्या, आणि मजुरीचे दर भडकले बाहेरच्या पाहुण्यांना मेलबोर्नमध्ये राहावयास जागा होती कुठे ? मग यारा नदीच्या दोन्ही काठांवर तंबू ठोकून त्यात लोक राहू लागले. सोन्याच्या खाणीपर्यंत अधून-मधून तंबूतल्या वस्त्या झाल्या. मेलबोर्नपासून सोन्याच्या खाणी दीडशे किलोमीटर होत्या एकटा दुकटा प्रवासी गाठून दरोडेखोर त्याला लुटू लागले व खूनही पडू लागले जास्त धाडशी दरोडे-खोरांनी सशस्त्र पहाऱ्यात सोने घेऊन येणाऱ्या गाड्यांनाही अड-वायला कमी केले नाही पुष्कळशा खाणकाम करणारांना त्यांना मजुरी मिळाली असती त्यापेक्षा जास्त किंमतीचे सोने सापडत नसे. तरीही अनेकांना चांगला लाभ होत असे. अशा नशीबवान लोकांच्यापैकी काहीजण काटकसरीने व डोके थंड ठेवून राहात. पण काही जणांना ते जमत नसे अचानक मिळालेली संपत्ती ते जुगारात व दारू पिण्यात घालवत व उधळपट्टी करत. सोन्याचा लाभ केव्हा होईल हे सांगता येत नसे कधी एका आठवड्यात किंवा एका दिवसात प्रचंड सोन्याचा साठा सापडे. आणि लोक अचानक श्रीमंत होत. या अचानक श्रीमंतीमुळे अनेकांचे डोके ठिकाणावर राहात नसे. अशा काही लोकांनी आपला पाइप पेट-विण्यासाठी पाच पौंडाची म्हणजे सुमारे शंभर रुपयांची नोट वापरली ! तर काहींनी पाच पौंडाच्या नोटा सॅन्डविचमध्ये घालवून प्रत्यक्ष खाऊन टाकल्या ! सन १८५२ च्या एकाच वर्षात

व्हिक्टोरिया प्रान्ताची लोकसंख्या ७७ हजारावरून वाढून १लाख ७२ हजार झाली आणि १८५४ पर्यंत पुन्हा एकदा दुपटीपेक्षा जास्त झाली एकाच वर्षात १ कोटी पौंड किंमतीचे किंवा वीस कोटी रुपये किंमतीचे सोने सापडले.

व्हिक्टोरिया प्रांताचा पहिला राज्यपाल म्हणून चार्लस जोसेफ ला ट्रोब याची नेमणूक झाली होती तो मवाळ स्वभावाचा होता आणि असे क्रांतिकारक बदल त्याला पेलण्याजोगे नव्हते. शांतता व व्यवस्था राखण्याचा वाढता खर्च भागवण्यासाठी न्यू साऊथ वेल्स प्रांताप्रमाणे येथेही राज्यपालाने लायसेन्स पद्धत सुरू केली. खाणकाम करणाऱ्यांनी सुरुवातीला विरोध केला नाही. पण हळूहळू त्यांच्यामध्ये असंतोष वाढू लागला सर्व खाणींच्या ठिकाणी निषेधाच्या सभा होऊ लागल्या. लायसेन्स फी जबर होती व ती फी गोळा करण्याची पद्धत जुलमी होती इंग्लंडहून आलेल्या गरम रक्ताच्या तरुण सैनिकाकडे फी वसुलीचे काम दिले होते एखाद्या खाणकाम करणाऱ्याने फी चुकवली व तो पळू लागला तर हे सैनिक घोड्यावर बसून त्याचा पाठलाग करीत व त्याला पकडत

१८५४ च्या मध्याला ला ट्रोबला परत बोलावण्यात आले त्याने सुटकेचा निःश्वास सोडला खाणकाम करणारे व वृत्तपत्रे यांनी ट्रोबवर टीकेचा भडीमार केला होता त्याच्या जागी सर चार्लस होथॅम हा राज्यपाल म्हणून आला. त्याला लवकरच नाविक दलात रिअर ॲडमिरल म्हणून बढती मिळणार होती वसाहत म्हणजे एक लढाऊ जहाज आहे असे समजून त्याने राज्य कारभार चालविण्याचा प्रयत्न केला । आणि हा प्रयत्न संपूर्ण अयशस्वी ठरला. यावेळपर्यंत बल्लाराट येथील खाण सर्वात जास्त

सोने देत होती. अर्थातच खाणकाम करणाराची तिथे सर्वात जास्त गर्दी झाली होती व ते सर्वात जास्त असंतुष्ट होते. तेथे खाणकाम करणाऱ्यांपैकी एकाचा खून झाला. मॅजिस्ट्रेटने खुनी माणसाला लाच खाऊन निर्दोष सोडले त्यामुळे तेथे दगा सुरू झाला. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी होथॅमने तेथे सैनिकी तुकड्या पाठविल्या त्यामुळे खोदकाम करणाऱ्याचा संताप आणखीच वाढला

सैनिकानी तेथे लायसेन्स नसणाराचा पाठलाग करून त्याना पकडण्यास सुरुवात केल्यानंतर इतका वेळ दबून राहिलेल्या असंतोषाचा भडका उडाला या खाणवाल्याचे नेतृत्व पीटर लालोर याने केले तो ब्रिटिश लोकसभेच्या आयरिश सभासदाचा मुलगा होता त्याच्या नेतृत्वाखाली युरेका येथे खाणवाल्यानी आपली लायसेन्स पत्रे जाळली व राजनिष्ठेची शपथ घेतली आणि लाकडी ओंडक्याची तटबंदी बांधून आपला स्वत चा ध्वजही उभारला. त्या ध्वजावर निळ्या पार्श्वभूमीवर दक्षिण गोलार्धातील एक नक्षत्र, सदर्न क्रॉस काढलेले होते. राज्यपाल होथॅमने वाटाघाटी वगैरे न करता एकदम हल्ला करावयाचे ठरविले. तीस डिसेंबर १८५४ या दिवशी पहाटे सैनिकी तुकड्यानी व पोलिस दलानी या लाकडी तटबंदीवर छापा घातला आणि कत्तल करून तेथे ताबा मिळविला. थोड्याच वेळात ३० लोक ठार झाले या सगळ्या कत्तलीची जरुर नव्हती सोन्याच्या खाणीवरील परि-स्थितीची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमण्याचे होथॅमने यापूर्वीच ठरविले होते समिती नेमल्याची बातमी त्यानी जर नुसती जाहीर केली असती तर रक्तपात टळला असता पुढच्या काही महिन्यातच सोन्याच्या खाणीवरील लोकांची गाऱ्हाणी दूर

करण्यात आली सन १८५५ च्या शेवटी शेवटी राज्यपाल होथॅम अतिश्रम व ताण यामुळे मृत्यू पावला त्याच्या ताठर धोरणाचा तो स्वत च शेवटचा बळी ठरला

१८५६ पर्यंत खळबळीचे दिवस सपले पृष्ठभागावरचे व पृष्ठ-भागालगतचे सर्व सोने काढून सपले होते आता जमिनीत खोल खणून सोने काढावे लागत होते त्यासाठी भाडवलाची आवश्यकता होती आता सोन्याच्या खाणीचा ताबा कपन्यानी घेतला खाण-काम करणारे लोक कपनीसाठी मजूरी करू लागले बरेचसे पुन्हा आपल्या मूळच्या व्यवसायाकडे वळले काहीजण घरी परतले. बल्लाराट या गावाचे शहरात रुपातर झाले

निरनिराळ्या खाणींवर मजूर म्हणून काम करायला चिनी लोक येऊ लागले एकट्या व्हिक्टोरिया प्रातात चाळीस हजार चिनी आलेले होते चिनी लोक कष्टाळू होते. आणि अतिशय थोड्या मजरीवर ते काम करत त्यामळे गोऱ्या मजराचा जळ-फळाट होई चिनी लोकाविरुद्ध असतोष वाढू लागला व्हिक्टोरिया प्रातातील बकलॅन्ड नदी येथे चिनी मजूर व गोरे यामध्ये जातीय दगली झाल्या १८६० मध्ये न्यू साऊथ वेल्स प्रांतातील ' लॅम्बिग फ्लॅट ' येथे चिनी वस्त्यावर हल्ले करण्यात आले त्याच्या झोप-ड्यांना आगी लावण्यात आल्या व अनेक चिनी लोक मारण्यात आले सन १८७० मध्ये जुन्या बाथरस्ट खाणीच्या जवळपास गुलगॉन्ग आणि हिलअेन्ड येथे मोठ्या प्रमाणात सोने सापडले पुन्हा एकदा लोकानी येथे धाव घेऊन गर्दी केली १८७२ मध्ये फक्त हिलएन्डच्याच प्रदेशात तीस हजार लोक खाणकाम करीत होते.

त्याचवर्षी होल्टरमान या नशीबवान खाणकाम करणाऱ्याने



होल्टरमान आणि त्याला सापडलेला सोन्याचा तुकडा

एक प्रचंड सोन्याचा तुकडा खणून मिळविला त्या एकाच तुकड्याचे वजन ६३० पौंड किंवा २८६ किलोग्रॅम होते ! त्याची किंमत १२ हजार पौंड आली आजच्या भावाने त्याची किंमत दीडकोटी रुपयापेक्षा जास्त आली असती !

ऑस्ट्रेलियात अनेक वर्षे सोने सापडत होते आणि त्याची बातमी आली की लोक तिकडे धाव घेत होते सोन्याच्या खाणीवरचे धावे असे अनेकदा व अनेक ठिकाणी झाले क्विन्सलॅन्ड प्रांतात कानोना (१८५७), माऊंट जिंपि (१८६७), चार्टर टॉवर (१८७२) पाल्मर नदी (१८७२), आणि माऊंट मॉर्गन (१८८२) या ठिकाणी सोने सापडले. काही ठिकाणचे सोन्याचे साठे लवकरच संपले. पण मॉर्गन येथे आजही पर्वताच्या उघड्या खड्ड्यातून सोने काढले जाते दक्षिणेप्रमाणे येथेही चिनी मजूरांचा

प्रचंड लोंढा आला मग दंगेधोपे सुरू झाले पाल्मर नदी किनारी तर फारच भीषण दंगे झाले मग क्विन्सलँन्ड वसाहतीने आशियायी लोकांच्या प्रवेशावर बंधने घातली इतर वसाहतींनीही नंतर तसेच कायदे केले. तेव्हापासून ऑस्ट्रेलिया खंड गोऱ्या लोकांसाठी राखून ठेवण्यात आले आजही तीच परिस्थिती आहे.

सोन्यासाठी शेवटचा धावा १८९३ साली पश्चिम ऑस्ट्रेलियात झाला पर्थपासून अंतर्भागात ५४० किलोमीटरवर पॅडी हनान याने या प्रचंड सोन्याच्या खाणीचा शोध लावला. त्या ठिकाणाला आता कलगुर्ली असे नाव आहे पुन्हा एकदा सर्व ऑस्ट्रेलियातून आपले नशीब काढण्यासाठी तेथे माणसे धावून आली. पहिल्याच वर्षात दहा लाख औंस म्हणजेच तीन कोटी, दहा लाख ग्रॅम सोने सापडले पर्थपासून खाणीपर्यंत रेल्वे बांधण्यात आली खाणीचा प्रदेश ओसाड व उजाड होता म्हणून तिथे पाणी आणण्यासाठी नळ आणण्यात आले लवकरच इंग्रजांनी तेथे प्रचंड भांडवल घातले आणि खोल विहिरी खणून सोने काढणे सुरू केले १९०० सालापासून दरवर्षी एक कोटी पौन्ड किंमतीचे किंवा पंधरा कोटी रुपयाचे सोने कलगुर्ली येथे खाणीत सापडू लागले. आजही तेथील खाणी सोने देतात व फायद्यात चालतात

★

प्रकरण अकरावे

## अंतर्भागातील वाळवंट व अज्ञात प्रदेश

सोन्याच्या खाणीच्या शोधामुळे लोकाचे लक्ष भौगोलिक संशोधकावरून काही काळ उडाले. पण खडाच्या अतर्भागात काय असावे हे जाणण्याची उत्सुकता सशोधकाना स्वस्थ बसू देईना

मागे जर्मन सशोधक लिचहार्ट हा अज्ञात अतर्भागात शिरून बेपत्ता झाला होता, हे आठवते ना ! त्याच्याविषयी अनेक अफवा पसरत असत. काही म्हणत की, तुरुगातून पळून गेलेल्या गुन्हेगारानी अतर्भागात कोठेतरी आपली वसाहत केली आहे आणि त्यानीच लिचहार्टला पकडून ठेवले आहे. संशोधकानी असल्या अफवांवर विश्वास ठेवला नाही तरी या बेपत्ता जर्मनाला शोधण्यासाठी काही प्रयत्न केले पाहिजेत असे मात्र त्याना वाटत असे हा हेतू मनात ठेवून ऑगस्टस ग्रेगरी हा सशोधक जून १८५५ मध्ये सिडनीहून समुद्रमार्गे मोहिमेवर निघाला. उत्तर किनाऱ्यावरील व्हिक्टोरिया नदीच्या मुखाजवळ तो व त्याचे सहकारी उतरले नतर ते दक्षिण-पश्चिमेकडे ४८० किलोमीटर गेले पुढे पसरलेल्या अफाट वाळवटामुळे त्याना परतावे लागले तेथून ते पूर्वेकडे निघाले. ते लिचहार्टच्याच रस्त्याने पण उलट बाजूने एसिग्टन बदराजवळ पोहचले. तेथून निघून चार महिन्यांच्या

प्रवासानंतर क्विन्सलँडमधील रॅकहॅमटन या बंदराजवळ ते पोहचले.

सन १८५८ मध्ये लिचहार्टला शोधण्याचा दुसरा प्रयत्न ग्रेगरीने केला. यावेळी तो मध्य क्विन्सलॅन्डमधून मानारोबा प्रदेशात पोहचला. तेथून तो बाराकू नदीच्या किनाऱ्याने प्रवाहाच्या दिशेने जाऊ लागला. त्या नदीचे रुपांतर कुपर स्क्रीकमध्ये होईपर्यंत तो नदीच्या किनाऱ्याने गेला आणि तेथून दक्षिणेकडे अॅडेलेड येथे पोचला या प्रवासात त्याला लिचहार्टचा काहीच माग लागला नाही. पण खंडाचा सर्व अंतर्भाग म्हणजे वाळवंट आहे ही कल्पना त्याने खोडून काढली.

१८५८ व १८५९ मध्ये जॉन मॅगडूअल स्टूअर्ट याने अॅडेलेडपासून उत्तरेकडे दोन छोटया मोहीमा काढल्या. जॉन स्टुअर्ट, स्टुर्टच्या शेवटच्या मोहिमेत सामील झाला होता १८६० मध्ये त्याने काही मदतनीस बरोबर घेऊन दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत संपूर्ण खंड तुडवून जायचे ठरविले या प्रवासात त्याला अॅलिस स्प्रिंग्जच्याजवळ मॅकडोनल पर्वतश्रेणीच्या खोऱ्यात सुपीक जमीन आढळली ऑस्ट्रेलिया खंडाच्या भौगोलिक मध्याजवळ एका बारक्या टेकडीजवळ त्याने एक दगडाचा गडगा रचला आणि त्यात ब्रिटिशाचे निशाण रोवले. आपल्या जुन्या नेत्याच्या स्मरणार्थ माऊंट स्टुर्ट असे नाव दिले. उत्तर किनारा ६४० किलोमीटर्स राहिला असता स्टुअर्टला परतावे लागले कारण त्याचे लोक स्कर्व्हीने आजारी पडले राहिलेले वाळवंट तुडवून जाणे कठीण झाले आणि स्थानिक रहिवाशांनीही त्रास दिला


याच सुमारास खंड ओलांडण्याची एक मोठी मोहीम मेलबोर्न येथून काढण्यात आली रॉबर्ट ओहारा बर्क हा पोलीस अधिकारी या मोहिमेचा नेता होता त्याला अशा मोहिमांचा पूर्वानुभव

भव काहीच नव्हता आपली प्रेयसी, नटी ज्युलिया मॅथ्यूस हिच्यावर छाप टाकण्यासाठी त्याने ही मोहीम हाती घेतली होती असे म्हणतात त्याच्या मोहिमेत सतरा लोक सामील झाले होते वाळवंटातल्या प्रवासासाठी उपयोगी पडावेत म्हणून हिंदुस्थानातून पचवीस उंट मागवले होते या सर्व जथ्याने ऑगस्ट १८६० मध्ये मेलबोर्न सोडले आणि ते हळूहळू मेनिंदे येथे पोहचले. तोपर्यंत मोहिमेचा उपनेता जॉर्ज लॅन्डेल्स याने भांडणामुळे राजीनामा दिला, आणि त्याच्या जागी मोहिमेचा खगोलशास्त्रज्ञ विल्यम जॉन विल्स याला नेमण्यात आले

मेनिंदे येथून विल्स, बर्क व इतर सहा जण कूपर स्क्रीककडे पुढे गेले आणि तेथे उरलेल्याची वाट पहात सहा आठवडे थांबले. पुढे जाण्यासाठी बर्क उतावीळ झाला होता पुढचे हजार किलोमीटर अंतर सपूर्ण अज्ञात प्रदेशातून काटायचे होते तरीही तो निघाला कूपर स्क्रीकजवळच्या मुक्कामाजवळ चार माणसाना मागे ठेवण्यात आले आणि त्याना तीन महिने तेथेच थांबण्याबद्दल आज्ञा देण्यात आली बर्कने आपल्याबरोबर विल्स, जॉन किंग, चार्ल्स ग्रे यांना घेतले त्यानी आपल्याबरोबर सहा उंट, एक घोडा आणि बारा आठवडे पुरेल इतकी अन्नसामुग्री घेतली.

मार्च १८६१ मध्ये ते सर्वजण कारपेंटारियाच्या आखाताजवळ पोहोचले पण पुढच्या दलदलीमुळे त्याना उघड्या समुद्रापर्यंत पोहोचता आले नाही प्रवासाचे तीन महिने सपले होते आणि अन्नपुरवठा सपत आला होता. परतीचा प्रवास सुरू झाला. चार्ल्स ग्रेने एकदा अन्न चोरले. म्हणून त्याला चाबकाने मारण्यात आले तो काही दिवसातच मृत्यू पावला. बाकीचे लोक कूपर स्क्रीकजवळील मुक्कामाजवळ पोहोचले. तेव्हा तेथे कोणीच नव्हते

तेथील लोक केवळ सात तासापूर्वीच मेनिंदेकडे जाण्यासाठी तेथून निघाले होते ! त्यांच्या मागोमाग जाऊन त्यांना गाठण्याऐवजी बर्कने दिशा बदलून दक्षिणेकडे व तेथून अडेलेडला जायचे ठरविले. काही दिवस ते भटकत राहिले अन्न काहीच नव्हते. उपासमार होत होती त्यातच विल्स मृत्यू पावला. त्यानंतर दोन दिवसांनी बर्कचे मरण ओढवले. जॉन किंग मात्र वाचला त्याने काही कंदमुळे खाल्ली व स्थानिक आदिवासींनी त्याला थोडेफार अन्न दिले या लोकांची काहीच बातमी येत नाही हे पाहून मेलबोर्नहून डब्लू. ए होविट याला मदतनीसासह पाठविण्यात आले होते. त्यांना जॉन किंग सापडला तो मृत्यूपंथाला लागला होता आणि त्याचे शरीर म्हणजे हाडांचा सापळा झाला होता.




**मॅकिन्ले व वॉरबर्टनच्या मोहिमा**

हॉविटने एकदर चार मोहिमात भाग घेतला. त्यांपैकी पहिली बर्कचा आणि विल्सचा शोध लावण्यासाठी काढली होती. दुसऱ्या मोहिमेत जॉन मॅकिन्ले हा नेता होता आणि ती अॅडेलेडपासून काढली होती तिसऱ्या मोहिमेत विल्यम लान्सबरो हा नेता होता व त्यात कारपेंटारियाच्या आखातापासून त्यानी दक्षिणेकडे प्रवास केला. होता. चौथ्या मोहिमेत फ्रेड्रिक वॉल्कर हा त्याचा नेता होता. त्यावेळी पूर्व किनाऱ्यावरील रॉकहॅमटन येथून त्याने पश्चिमेकडे प्रवास केला होता अशाच एका प्रवासात मॅकिन्लेला ग्रेचे मृत शरीर सापडले या सर्व मोहिमामुळे क्विन्स-लॅंडच्या अतर्भागात चागले पाणी असलेली व चांगल्या जमिनीची कुरणांची जमीन मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे याचा शोध लागला.

मॅक्डुअल स्टुअर्टची प्रकृती बरी नव्हती व पूर्वीच्या मोहिमेत अपयश आले होते तरी अॅडेलेड येथून निघून उत्तर किनाऱ्यावर पोहोचण्याचा त्याचा निर्धार कायम होता. १८६१ च्या सुरुवातीला सरकारी पाठिंबा मिळवून आणि भरपूर साहित्यसामुग्री बरोबर घेऊन तो पूर्वीच्याच रस्त्याने उत्तरेकडे निघाला उत्तर किनारा ४८० किलोमीटर राहिला असता प्रचड दलदलीने त्याचा रस्ता अडवला व त्याला परतावे लागले त्याचवर्षी त्याने पुन्हा प्रयत्न केला. पूर्वी दलदलीपाशी तो जेथे अडला होता तेथून निरनिराळ्या दिशानी त्याने मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला शेवटी डाले वॉटर्स येथून त्याला मार्ग मिळाला आणि तो अॅडेलेड नदीच्या प्रवा-हाच्या दिशेने निर्धाराने पुढे गेला शेवटी सध्याच्या डार्विन बद-राच्या जागेजवळ २४ जुलै १८६२ रोजी त्याचा जथा पोहोचला ते सर्व थकले होते तरी मोहीम यशस्वी झाल्याबद्दल त्यांनी

आनंदोत्सव साजरा केला. परंतु परतीचा प्रवासही बराच त्रास-दायक ठरला बरेच घोडे मेले. स्थानिक रहिवाशांनी त्रास दिला. आणि स्टुअर्ट आजारी पडून आंधळा झाला दोन घोड्यावर बांधलेल्या स्ट्रेचरवरून त्याला न्यावे लागले ते ॲडेलेडला परतले तेव्हा त्याचे भव्य स्वागत करण्यात आले स्वागताचा आणि प्रेमाचा इतका वर्षाव करण्यात आला की मोहिमेतील दमलेले लोक या स्वागताला वैतागले ! सहा मोहिमांत भाग घेतल्यामुळे स्टुअर्टची तब्येत बिघडली होती. तो इंग्लंडला परतला आणि जून १८६६ मध्ये वयाच्या ४१ व्या वर्षी मरण पावला

स्टुअर्टने ऑस्ट्रेलिया खंड जेथे ओलांडले त्या पोर्ट डार्विनजवळ आणि ॲडेलेड नदीच्या मुखाजवळ थोड्याच वर्षांत वसाहती स्थापन झाल्या

१८७० मध्ये दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या सरकारने ॲडेलेडपासून डार्विनपर्यंत टेलिग्राफची तार टाकण्यासाठी एक लाख २० हजार पौंड मंजूर केले, डार्विन बंदरातील तार जावा बेटापर्यंत आलेल्या समुद्रातील तारेशी जोडली जाणार होती त्यामुळे ॲडेलेडहून थेट इंग्लंडशी तारेचे दळणवळण प्रस्थापित होणार होते. स्टुअर्ट ज्या मार्गाने उत्तरेकडे गेला त्याच मार्गाने ही तार टाकण्यात येणार होती ही तार एकूण ३१७६ किलोमीटर लांबीची झाली. ती ज्या क्षेत्रातून टाकायची होती तेथील बहुतेक प्रदेश निर्मनुष्य होता तार टाकण्यासाठी दक्षिण, मध्य व उत्तर असे तीन विभाग पाडण्यात आले तिन्ही विभागातील काम एकाच वेळी सुरू कर-करण्यात आले. काम कठीण होते व अडचणी अनंत होत्या. तरीही दोनच वर्षांत ते पूर्ण झाले २१ ऑक्टोबर १८७२ या दिवशी

लंडनहून पहिला तारेचा संदेश ॲडेलेडला पोहोचला लंडन, ॲडे-लेड व सिडनी या तिन्ही ठिकाणाहून उद्घाटन समारंभ साजरा करण्यात आला. या सर्व योजनेची सूत्रे चार्ल्स टॉड या दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या पोस्ट मास्तर जनरलकडे होती कामगिरी यशस्वी-रीत्या पार पाडल्याबद्दल त्याला सरदारकी देण्यात आली ही तार टाकल्यामुळे एक मोठा फायदा झाला तारेच्या लाइनवर दर ३२० किलोमीटर अंतरावर ठाणी बांधण्यात आली तारेची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी तेथे नोकरवर्ग ठेवण्यात आला नव्या संशोधकाना या ठाण्यापासून आपली मोहीम सुरू करण्याची व दुसऱ्या एखाद्या ठाण्यापर्यंत संपवण्याची सोय उपलब्ध झाली त्यामुळे संशोधन मोहिमातील धोके व हाल बऱ्याच प्रमाणात कमी झाले

या नवीन सोयीचा फायदा अर्नेस्ट गिल्स याने पहिल्याप्रथम घेतला फिन्के नदीजवळील तारलाइनवरचे ठाणे त्याने ऑगस्ट १८७२ मध्ये सोडले तेथून पश्चिम किनाऱ्यावर पोहोचण्याचा त्याचा विचार होता. पण लवकरच अमेडेस सरोवराच्या सुकलेल्या खाऱ्या पृष्ठभागामुळे त्याचा मार्ग अडला आणि त्याला हा प्रयत्न सोडून द्यावा लागला. एप्रिल १८७६ मध्ये मेजर पीटर वॉरबर्टन अलिस स्प्रिंग्ज येथील तारलाइनच्या ठाण्याजवळून निघाला त्याला पश्चिम किनाऱ्याकडेच जायचे होते थोड्याच दिवसात एका प्रचंड कोरड्या वाळवटात तो सापडला. त्याच्या जथ्यातले बरेच लोक आजारी पडले. अन्नासाठी त्याना आपले उंट मारावे लागले तरीही ते पुढे जातच राहिले. बहुतेक प्रवास त्यानी रात्रीच्या वेळी केला. शेवटी एकदाचे ते पश्चिम किनाऱ्याजवळ रोबर्न येथे पोहो-चले त्यावेळी त्याची खूपच उपासमार झाली होती व सर्वचजण

मृत्यूपथाला लागले होते त्याच वर्षी अर्नेस्ट गिल्सने पुन्हा एक मोहीम काढली पण त्याला गिब्सन वाळवंटामुळे परत फिरावे लागले त्याचप्रमाणे डब्ल्यू सी गुज हा वॉरबर्टनच्या मागोमाग एका आठवड्याने ' ॲलिस स्प्रिंग्ज ' येथून निघाला होता वाळ-वंटामुळे त्यालाही परतावे लागले

१८७४ मध्ये जॉन फॉरेस्ट आणि अलेक्झांडर फॉरेस्ट हे दोघे भाऊ पश्चिम किनाऱ्यावरच्या गिराल्टन बंदरापासून पूर्वेकडे जायला निघाले ते दोघेजण संशोधन मोहिमासाठी प्रसिद्ध झालेले होते $\frac{५}{३}$ रस्ता कापून आल्यानंतर वेल्ड स्प्रिंग्जजवळ त्यांना स्थानिक रहिवाशाच्या हल्ल्याला तोंड द्यावे लागले संपूर्ण गिब्सन वाळवंट ते ओलांडून गेले या वाळवंटात तहानेने त्यांचा जीव अनेकदा व्याकूळ झाला एकदा ऐनवेळी थोडा पाऊस पडला म्हणून त्यांचे जीव वाचले प्रवासाच्या शेवटी शेवटी त्यांची चाल मंद झाली. तार लाइनीच्या ठाण्यावर ते १ नोव्हेंबर १८७४ मध्ये पोचले या त्यांच्या प्रवासाला सात महिन्यापेक्षा जास्त दिवस लागले

अर्नेस्ट गिल्सला यापूर्वी दोनदा अपयश आले होते तरीही तो १८७५ मध्ये पुन्हा एकदा मोहिमेवर निघाला यावेळी तो तार-लाइनवरील बेलताना ठाणे येथून निघाला आणि पर्थला पोहो-चला त्याच्या त्या प्रवासात तो कालगुर्ली येथील सोन्याच्या खाणीजवळून गेला पुढच्याच वर्षी त्याने पश्चिमेकडून पूर्वेकडे तारलाइनपर्यंत प्रवास केला व त्यात तो यशस्वी झाला यावेळचा त्याचा मार्ग फॉरेस्ट बंधूच्या प्रवासमार्गाच्या उत्तरेकडून गेला होता

या सर्व प्रवासामुळे नकाशावरील मोकळ्या जागाचा तपशील

भरता आला पण त्यातून इतकेच सिद्ध झाले की पश्चिम ऑस्ट्रेलियाचा हा बराचसा अंतर्भाग निर्जल व रुक्ष वाळवटाचा आहे. व तेथे वसाहती करणे शक्य नाही. मात्र अलेक्झांडर फॉरेस्टने १८७९ मध्ये खंडाच्या उत्तर-पश्चिम कोपऱ्यात प्रवास केला तेव्हा त्याला कुरणाच्या जमिनीचा विस्तृत प्रदेश सापडला. फिटझ्रॉय व व्हिक्टोरिया या नद्यांच्या परिसरात हा सुपीक प्रदेश होता.

★

प्रकरण बारावे

# दरोडेखोरीचा शेवट

ऑस्ट्रेलियात पूर्वीपासून गुन्हेगार वसाहती स्थापन झाल्या होत्या त्यातील अनेक गुन्हेगार जगलात निसटत आणि आपला जुना चोरी दरोडेखोरीचा धदा सुरू करत. ऑस्ट्रेलियात सोने सापडले तेव्हा या माजी गुन्हेगाराच्या दरोड्यांना उत आला. दरोडे घालून ते रानात पळून जात व त्याना शोधून काढणे अशक्यच असे. परतु १८६१ पासून दरोडेखोरांच्या एका नवीनच वर्गाचा उदय झाला हे नवीन दरोडेखोर माजी गुन्हेगार नव्हते ती स्वतत्र शेतकऱ्यांची तरुण मुले असत आणि मोठ्या कुरणाच्या मालकानी अन्याय केल्यामुळे त्याच्याशी ते मारामारी करून कायद्याच्या भीतीमुळे जगलात पळून जात व दरोडेखोर बनत चबळ नदीतील डाकूशी त्यांचे साम्य जाणवते सुरुवातीस त्याचे लक्ष व आक्रमण कुरणाच्या धनाढ्य मालकावर होत असे. पण नतर जगलात शिरुन ते दरोडेखोरी सुरू करत. त्यामुळे सर्वत्र दहशत निर्माण झाली होती व त्याचा बदोबस्त कसा करावा हे समजत नव्हते त्यांपैकी काही दरोडेखोराची माहिती मिळवू. सुरुवातीस फ्रँक गार्डिनर हा दरोडेखोर बराच कुप्रसिद्ध झाला.

घोड्याच्या चोरीबद्दल त्याला दोनदा शिक्षा झाली होती बाथरस्टपासून यास्ट पर्यंत तो दरोडे घालीत होता त्याचा पहिला साथीदार जॉन पिस्ले याला लवकरच पकडले व फाशी दिले पण गार्डिनरने नवीन साथीदार जमवले जून १८६२ मध्ये फ्रॅंक गार्डिनर व जॉनी गिल्बर्ट याच्या टोळीने सोने आणणाऱ्या सैनिकी जथ्यावर फोर्ब्ज गावानजिक हल्ला केला आणि बारा हजार पौंडाचे सोने व चलनी नोटा पळविल्या. लवकरच गार्डिनर दिसेनासा झाला. त्याच्या जागी बेनहॉल हा टोळीचा नेता बनला पोलिसानी सतत त्रास दिल्यामुळे तो गुन्हेगारीकडे वळला होता हॉल, गिल्बर्ट आणि त्याचे साथीदार यानी तीन वर्षांपर्यंत हैदोस घातला त्यानी बँकावर दरोडे घातले. टपालगाड्यावर दरोडे टाकले एकटयादुकटया प्रवाशाना लुबाडले आणि मेंढपाळांच्या वस्त्यावर दरोडे टाकले एकदा तर त्यांनी एका मॅजिस्ट्रेटलाच पळवले आणि पैसे मिळविण्यासाठी त्याला ओलीस ठेवले पोलिसां-बरोबरच्या एका चकमकीत १८६३ मध्ये गिल्बर्टने एका पोलिस अधिकाऱ्याला ठार केले त्याच्याच टोळीतील जॉन डून याने त्याच वर्षी लेक जॉर्जजवळ एका पोलिसाला ठार केले मध्यतरी गुप्त झालेला गार्डीनर क्विन्सलॅन्ड मध्ये १८६४ साली सापडला. तो सभावित बनून तेथे हॉटेल चालवीत होता. त्याला ३२ वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली पण आठ वर्षानतर ऑस्ट्रेलिया सोडून जायच्या अटीवर त्याची सुटका झाली तो अमेरिकेत१८९५ साली मृत्यू पावला हॉल, गिल्बर्ट आणि डन याना फरारी म्हणून घोषित करण्यात आले होते त्याना पाहिल्यावरोबर गोळी घालावी अशा आज्ञा होत्या मे १८६५ मध्ये हॉल आणि गिल्बर्ट पोलिसा-बरोबरच्या चकमकीत मारले गेले त्याच्याच साथीदारानी फितूर

होऊन त्याची माहिती दिली होती उन काही महिन्यानंतर सापडला व त्याला फाशी दिले

दक्षिणेकडे मोनॅरो आणि रिव्हरिना जिल्ह्यांत मॉर्गन—'काळा पहाड—' आपल्या क्रूरपणाबद्दल प्रसिद्ध झाला १८६५ मध्ये त्याचे डोके आणून देणारास एक हजार पौंडाचे बक्षीस लावले होते. मॉर्गन आता व्हिक्टोरिया प्रांतात शिरला तेथे त्यानी मेंढपाळ वस्त्या व प्रवासी यांच्यावर दरोडे घातले, गुरे ठार केली, आणि गवताच्या गंजींना आगी लावल्या त्याचा शेवट अचानक झाला. एका गवळणीकडून त्याला निरोप पाठवून बोलावून घेण्यात आले आणि एकदम घेरून ठार करण्यात आले.

न्यू साऊथ वेल्सच्या उत्तर भागात फ्रेडरिक वार्ड या तुरुंगातून पळालेल्या गुन्हेगाराने धुमाकूळ घातला होता तो स्वत ला 'कॅप्टन थंडरबोल्ट' म्हणवत असे. आपण स्त्रियांचा आदर ठेवतो व आपल्या सावजाना दया दाखवतो असे त्याचे म्हणणे होते त्याच्याबरोबर त्याची मिश्र वंशाची पत्नीही असे. ती वारल्यावर वार्ड बराच निराश झाला. नंतर लगेचच पोलिसाबरोबरच्या एका चकमकीत तो मारला गेला

अॅन्ड्र्यूज जॉर्ज स्कॉट हाही एक वैशिष्ट्यपूर्ण दरवडेखोर होता तो स्वत ला कॅप्टन मूनलाइट म्हणवून घेत असे. तो एका आयरिश धर्मोपदेशकाचा मुलगा होता काही दिवस तो एका बँकेत कारकुनीचे काम करत होता मे १८६९ मध्ये व्हिक्टोरिया प्रांतात मार्श येथे एक बँक लुटली गेली व हजार पौंड गेले. लुटारू बुरखाधारी होता मॅनेजरने शपथपूर्वक सांगितले की तो लुटारु स्कॉटच होता कारण स्कॉटने येथे कारकून म्हणून काम केले होते मॅनेजरवर विश्वास न ठेवता त्यालाच पकडण्यात आले होते

पण नंतर स्कॉटही पकडला गेला, आणि त्याच्याजवळ दरोड्या-तील मालही मिळाला त्याला शिक्षा झाली तुरुंगातील चांगल्या वर्तणूकीमुळे १८७९ मध्ये त्याची सुटका झाली. नंतर काही दिवस त्याने धर्मोपदेशकाचे काम केले. त्यानंतर काही कारण नसताना एकाएकी तो जंगलात गेला व पाच सहकारी जमवून त्याने दरोडे-खोरी सुरू केली. त्याच्या टोळीला वॅगावॅगाजवळ घेरण्यात आले त्या चकमकीत एक पोलिस आणि टोळीतील दोन दरोडेखोर ठार झाले पुढे त्याच्यावर भरलेल्या खटल्यात स्कॉटने सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली तेव्हा त्याच्या दोन जोडीदारांना फाशी न होता तुरुंगवासाची शिक्षा झाली स्कॉट व त्याचा एक सहकारी यांना फांशी दिले ऑस्ट्रेलियाच्या सर्व दरोडेखोरांमध्ये नेड केली हा दरोडेखोर सर्वात कुप्रसिद्ध होता त्याचे वडील हे पूर्वीचे गुन्हेगारच होते तो लहान असतानाच त्याचे वडील वारले. त्याच्या कुटुंबातील इतरजण घरातल्या किरकोळ चोऱ्यासाठी नेहमी पकडले जात. पण त्याच्या आईला चोरीच्या आरोपावरून तुरुंगवासाची शिक्षा होईपर्यंत त्याने विशेष गुन्हे केले नव्हते त्यानंतर त्याने दरोडेखोरी सुरू करण्याचा निर्णय घेतला असावा डॅन हा आपला धाकटा भाऊ घेऊन तो उत्तर व्हिक्टोरियाच्या डोंगराळ प्रदेशात लपून राहू लागला त्याला दोन साथीदारही मिळाले त्याला पकडण्यासाठी पोलिसतुकडी गेली तेव्हा तिघा पोलिसांना त्याने ठार केले त्यामुळे त्याच्या टोळीतील चौघानाही फरारी म्हणून घोषित करण्यात आले

डिसेंबर १८७८ मध्ये त्याने युरोवा येथील बँकेवर धाडसी दरोडा घातला त्यावेळी त्याने बरेच लोक पकडले आणि शहरा-जवळच्याच एका मेंढपाळवाडीजवळ त्यांना पकडून ठेवून पैसे

उकळले दोन महिन्यानंतर त्याची टोळी न्यू साऊथ वेल्स प्रातात शिरली सरहद्दीजवळच्या जेरिडेरिजे गावावर त्याच्या टोळीने धाड घातली. या गावात दोनच पोलीस होते त्या पोलिसाना पोलिसचौकीतच त्याने कोंडून ठेवले. आणि गावातील बँक सावकाश लुटली. त्याला त्यात २१४० पौंड सापडले कित्येक दिवस भूमिगत राहिल्यानतर त्याच्या टोळीने पुन्हा दरोडेखोरी सुरू केली त्यानी एका पोलिसाना खबर देणाऱ्याचाही खून केला दुसऱ्या दिवशी ग्लेनरोवान या खेड्यावर त्याने दरोडा घातला आणि गावातील एका हॉटेलात सर्व रहिवाशाना कोंडून ठेवले नतर पोलिसाना घेऊन येणारी एक आगगाडी उलथवण्याचा त्याचा प्रयत्न फसला तो उतरला होता त्या हॉटेलला पोलिसांनी वेढा घातला त्याचा एक सहकारी पोलिसाच्या गोळीला बळी पडला पहाटेच्या वेळी नेड केली सर्वांगावर चिलखत घालून तो हॉटेलच्या बाहेर पडला व गोळीबार करू लागला हे चिलखत त्याने झिजलेल्या नागराच्या फाळापासून बनविलेले होते पोलिसानी त्याच्या असुरक्षित पावला-वर गोळीबार केला तो जखमी झाला व पोलिसाच्या हातात सापडला दुसऱ्या दिवशी हॉटेलला आग लावण्यात आली त्या आगीत नेड केलीचा भाऊ व साथीदार जळून मेले नेड केलीवर खटला भरण्यात आला आणि चार महिन्यानतर त्याला फाशी देण्यात आले

★

प्रकरण तेरावे

# ऑस्ट्रेलियाचे राज्यसंघटन

१८८० सालापर्यंत संशोधनाचे युग संपले खंडातील काही तुटक कोपरे अज्ञात राहिले होते त्यांचे संशोधनही चालू होतेच पण ऑस्ट्रेलिया राष्ट्र या पदवीस पोचला नव्हता त्यासाठी राष्ट्रीय भावना निर्माण व्हावयास हवी होती राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया नेहमीच संथ व किचकट असते

१८८० पर्यंत ऑस्ट्रेलिया एक संघटित राज्य म्हणून निर्माण झाले नव्हते व्हिक्टोरिया, क्विन्सलॅन्ड, न्यू साऊथ वेल्स, दक्षिण ऑस्ट्रेलिया, पश्चिम ऑस्ट्रेलिया वगैरे निरनिराळ्या सहा वसाहतींत ऑस्ट्रेलिया खंड वाटले गेले होते त्यांची निष्ठा इंग्लंडशी होती. पण एकमेकांशी त्यांचा संबंध नव्हता प्रत्येक वसाहतीचे स्वतंत्र सैन्य होते इतर सर्व बाबतींत प्रत्येक वसाहत स्वतंत्र होती प्रत्येक वसाहतीत कायदेमंडळे होती आणि त्यांचे स्वतःचे कायदे होते. त्यांचे काही कायदे व नियम परस्परविरुद्धही होते सर्व वसाहतींत एकजिनसीपणा असावा म्हणून अनेकदा वसाहतींच्या प्रतिनिधींच्या बैठकीही घेतल्या होत्या. पण वसाहती वसाहतीत परस्परांचा संशय, द्वेष व मत्सर फार असल्याने त्या यशस्वी झाल्या नाहीत.

ही गोंधळाची परिस्थिती संपवायची असेल तर सर्व वसाहतींची कोणत्यातरी प्रकारची संघटना असली पाहिजे असे शहाण्या लोकाना वाटू लागले. १८८९ मध्ये न्यू साऊथ वेल्स प्रांताचा मुख्यमंत्री सर हेन्री पार्क्स याने या कामी पुढाकार घेतला सर्व वसाहतींच्या प्रतिनिधींच्या अनेक बैठका झाल्या. फेडरल सरकारच्या घटनेचा मसुदा तयार झाला. इतक्यात १८९६ मध्ये पार्क्स मृत्यू पावला त्याच्या मृत्यूने फेडरेशनचे काम थोडे लाबले पण एडमंड बर्टन या तरुण वकिलाने पुढाकार घेतला सगळीकडे दौरे व भाषणे करून फेडरेशनचे महत्त्व त्याने पटवून दिले शेवटी १ जानेवारी १९०१ या दिवशी ऑस्ट्रेलियन संघराज्याची घोषणा झाली एडमंड बर्टन संघराज्याचा पहिला पंतप्रधान झाला वसाहतींचा राज्यकारभार राहणार होता वसाहतींना आता राज्ये म्हणण्यात येऊ लागले सुरुवातीला तरी सामान्य माणसाला संघराज्य झाल्यामुळे काहीच फरक जाणवला नाही. संघराज्याची लोकसभा अस्तित्वात आली व राजधानी मेलबोर्न ठरविण्यात आली. संरक्षण, परराष्ट्रीय धोरण, पोस्ट आणि कस्टमच्या जकाती, या बाबी संघराज्याकडे गेल्या. वसाहतीतील दैनंदिनी जीवन तसेच चालू राहिले

विसाव्या शतकाची पहिली दहा वर्षे ऑस्ट्रेलियाला शांततेची व भरभराटीची गेली. इंग्लंडहून लॉर्ड किचनेरसारखे काही पाहुणे येत तेव्हा काही खळबळ माजे एरवी कसे शांत शांत होते. इंग्लंडच्या नाविक सामर्थ्याला तुलना नसल्याने बाह्य आक्रमणाचा धोका नव्हता अजून ऑस्ट्रेलिया राष्ट्र म्हणून संघटित झाले नव्हते

पण ८ ऑगस्ट १९१४ साली युरोपमध्ये युद्ध सुरू झाले आणि

ऑस्ट्रेलियाचा पतप्रधान फिशर याने इंग्लंडला आपला संपूर्ण पाठिंबा जाहीर केला. त्या दिवसापासून ऑस्ट्रेलियन राष्ट्रीयत्व तयार होऊ लागले पहिल्या महायुद्धात ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडच्या सैन्याने इजिप्त आणि फ्रान्समधील लढायात भाग घेतला भूमध्य समुद्रातील दार्दानेल्स सामुद्रधुनीत एप्रिल १९१५ मध्ये दोस्ताचे जे सैन्य उतरले त्यात ऑस्ट्रेलियाचे सैन्य अग्रभागी होते ही मोहीम फसल्यामुळे जानेवारी १९१६ मध्ये तेथून सैन्य मागे घेण्यात आले या निरर्थक लढाईत ऑस्ट्रेलियाचे पाच हजार, आठशे सैनिक ठार झाले आणि १९ हजार जखमी झाले जर्मनाची एमडेन ही बोट ऑस्ट्रेलियाजवळ आली असता तिच्यावर हल्ला करून ती बुडविण्यात आली

महायुद्धाच्या उरलेल्या कालावधीत ऑस्ट्रेलियाचे सैन्य जर्मनाशी फ्रान्समध्ये व पॅलेस्टाईनमध्ये लढत होते नोव्हेंबर १९१८ मध्ये जेव्हा युद्ध थाबले, ऑस्ट्रेलियाचे तीन लाख तीस हजार सैन्य दोस्ताच्या बाजूने लढाईत उतरले होते त्यापैकी साठ हजार सैनिक ठार झाले होते आणि एक लाख ६६ हजार सैनिक जखमी झाले होते

पहिल्या महायुद्धानतर ऑस्ट्रेलियाचा खुपच जलद विकास झाला. प्रचड आकाराच्या शेतवाड्या मोडण्यात आल्या व त्या जमिनी माजी सैनिकाना देण्यात आल्या कमी केलेल्या जकातीमुळे उद्योगधद्याना उत्तेजन मिळाले १९२९ च्या मदीचा फटका ऑस्ट्रेलियालाही बसला पण १९३२ पर्यंत ऑस्ट्रेलिया त्यातून सावरला होता महायुद्ध व आर्थिक सकट यामुळे ऑस्ट्रेलियन जनता एकत्र आली आणि ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रीयत्वाचे बीजारोपण झाले १८३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यावेळी

ऑस्ट्रेलियन सैन्य पुन्हा पॅलेस्टाईन येथे पाठविण्यात आले. या सैन्याला इटालियन आणि जर्मन सैन्याशी उत्तर आफ्रिकेच्या वाळवटात लढाई द्यावी लागली बार्डिया, ट्रोब्रूक, बेनगाझी येथील लढायात दोस्ताच्या बाजूने ऑस्ट्रेलियन सैन्य लढले होते.

डिसेंबर १९४१ मध्ये पर्लहार्बरमधील अमेरिकन आरमारावर हल्ला करून जपान महायुद्धात उतरले आता महायुद्ध ऑस्ट्रेलियाच्या अंगणात येऊन पोचले फेब्रुवारी १९४२ मध्ये सिंगापूर पडल्यावर तेथील संपूर्ण ऑस्ट्रेलियन विभाग जपान्याच्या तावडीत सापडला व युद्धकैदी बनला ऑस्ट्रेलियावर आक्रमण होण्याची भीती वाटू लागली. डार्विन आणि ब्रुम या शहरावर बाँबहल्ले झाले आणि एक जपानी पाणबुडी सिडनी बंदरातही घुसली ऑस्ट्रेलियाचा पतप्रधान कर्टीन याने घोषणा केली की आता इंग्लंड ऑस्ट्रेलियाचे रक्षण करण्यास असमर्थ आहे अमेरिकाच फक्त आपल्याला वाचवू शकेल अमेरिकन सेनापती जनरल मॅक-ऑर्थर याच्या नेतृत्वाखाली अमेरिकन विमानदल, नौदल, व भूदल ऑस्ट्रेलियामध्ये गोळा झाले सर्व ऑस्ट्रेलिया आता युद्धा-साठी ठाम उभा राहिला जपान्यानी न्यू गिनी व सालोमन बेटे ताब्यात घेतली होती मिडवे बेटाजवळील प्रवाळ समुद्रात अमे-रिकन नौदलाने जपान्याचा पराभव केला हळूहळू न्यू गिनीमधून जपान्याना हुसकावण्यात आले युरोपमधील युद्ध मे १९४५ मध्ये संपले जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी यावर टाकलेल्या दोन अणुबाँबमुळे पॅसिफिक महासागरातील युद्ध संपले

या दुसऱ्या महायुद्धाच्या काळातच ऑस्ट्रेलियनाची एकी झाली आणि सर्व ऑस्ट्रेलिया एक राष्ट्र म्हणून उभा राहिला दुसऱ्या महायुद्धामुळे ऑस्ट्रेलियाला दोन धडे मिळाले. ऑस्ट्रेलियाला यापुढे

ब्रिटनच्या संरक्षणावर अवलंबून राहता येणार नाही आणि ऑस्ट्रेलियाचा खरा व नैसर्गिक मित्र अमेरिकाच आहे हा पहिला धडा ऑस्ट्रेलियाच्या दृष्टीने त्याचे हितसंबंध युरोपमध्ये नसून ते दक्षिणपूर्व आशियाच्या शेजारी राष्ट्रात गुंतलेले आहेत हा दुसरा धडा. १९४५ नंतर ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रीय धोरण याच दोन तत्त्वावर आधारलेले आहे. १९५० मध्ये ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड व अमेरिका यांच्यामध्ये संयुक्त संरक्षणाचा लष्करी करार झाला आहे तो ॲन्झस (ANZUS) करार या नावाने ओळखला जातो. दक्षिणपूर्व आशिया करार संघटना (Seato) या संयुक्त संरक्षणाच्या करारात ऑस्ट्रेलिया सामील झाला आहे याशिवाय कोलंबो प्लॅन (१९५०) '**आशियन व पॅसिफिक को-ऑपरेशन कॉन्सिल**' या सारख्या शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाणाच्या करारात ऑस्ट्रेलिया सामील झाला आहे.

युद्धानंतर ऑस्ट्रेलियाला औद्योगिक व विकास करावयाचा होता व आपल्या नैसर्गिक संपत्तीचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचा होता. त्यासाठी कष्ट करणारे व श्रमणारे हात हवे होते ऑस्ट्रेलियात कायमची वस्ती करायला येण्यासाठी सरकारने लोकांना निमंत्रण दिले. पण फक्त गोऱ्या लोकांना ! काळ्या लोकांना किंवा आशियायी लोकांना ऑस्ट्रेलियात स्थायिक व्हायला अजूनही मज्जावच आहे दुसऱ्या महायुद्धानंतर वीस लक्ष युरोपियन ऑस्ट्रेलियात कायमचे राहण्यासाठी आले. त्यातील बहुसंख्य ब्रिटिश होते. पण इतर युरोपियन राष्ट्रातूनही खूप लोक आले १९४७ पासून १९६८ पर्यंत ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या ७५ लाखावरून एक कोटी वीस लाख झाली. पुढच्या वीस वर्षात ती दोन कोटी होईल असा अंदाज आहे १९६८ जनगणनेप्रमाणे ती

लोकसख्या १ कोटी २८ लाख होती

सिडनी आणि मेलबोर्न शहरे कल्पनेबाहेर वाढली आहेत ऑस्ट्रेलियाची लोकसख्या शहरातच एकवटली आहे. औद्योगिक उत्पादन कितीतरी पटींनी वाढले आहे. तेथील नैसर्गिक सपत्तीचा अदाज अजून आलेला नाही रोज नवी नवी सपत्ती सापडत आहे. या देशात शिसे जस्त, खनिज लोखड, बॉक्साईट, मॅगेनिज, चादी, टिन व टगस्टन याचेही प्रचड साठे आहेत अलिकडेच निकेल, फॉस्फेट, खनिजतेल, व नैसर्गिक वायू याचे मोठे साठे सापडले आहेत १९८० पर्यंत खनिज तेलाच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया स्वयपूर्ण होईल.

दुसऱ्या महायुद्धानतर ऑस्ट्रेलिया आत्मविश्वास असलेले प्रौढ राष्ट्र बनले आहे. पूर्वीप्रमाणे ऑस्ट्रेलिया दूरच्या प्रदेशात असलेले वसाहतींचे ठाणे राहिलेला नाही जेट विमानामुळे सर्व जग ऑस्ट्रेलियाला जवळ आले आहे मातृभूमीवर अवलंबून असण्याची व एकाकी पडल्याची भावना आता नष्ट झाली आहे ऑस्ट्रेलियातील जीवनमान जगातील श्रीमत देशाप्रमाणे आहे औद्योगिक कलहाबाबत ऑस्ट्रेलियाने जगापुढे आदर्श घालून दिला आहे. येथील विकासाचा वेग आश्चर्यजनक आहे बेकारी अजिबात नाही आणि देशाने लोकशाही हे तत्त्व स्वीकारले आहे.

इतर क्षेत्रातही खूपच प्रगती झाली आहे विश्वविद्यालये उदय पावत आहेत व शैक्षणिक दर्जा उचावला आहे बुद्धिवत वर्ग ऑस्ट्रेलियाचे कठोरपणे आत्मपरीक्षण करत आहे पूर्वी ऑस्ट्रेलियात कसलीच टीका टिपणी सहन होत नसे. आता ऑस्ट्रेलियन लेखक मुक्तपणे आपले विरोधी विचारही स्पष्ट करू शकतो. चित्रकलेत ऑस्ट्रेलियन शैलीचा विकास झाला आहे. सगीत,

नृत्य, ललित लेखन व नाट्य या सर्वांमध्ये खास ऑस्ट्रेलियन शैलीचे दर्शन होऊ लागले आहे.

अशा तऱ्हेने ऑस्ट्रेलिया जगातील एक पुढारलेले, सुसंस्कृत, व संपन्न राष्ट्र म्हणून उदयास आलेले आहे. ऑस्ट्रेलियाचे टीकाकार या देशाला नशीबवान देश असे खुशाल म्हणोत प्रत्येक ऑस्ट्रेलियनाला आपल्या राष्ट्राचा अभिमान वाटतो आणि त्या राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल त्याची खात्री असते

★

REFBK-0022000